
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | सोमवार, २८ जून २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २५९ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपले प्राचीन धर्मग्रंथ ज्ञानाची भांडारे असून जगातील सर्व समस्यांची उत्तरे त्यात आहेत. प्रभू श्रीरामचंद्रांनी घालून दिलेला रामराज्याचा आदर्श, भगवान श्रीकृष्णांनी श्रीमद्भगवद्गीतेत सांगितलेला कर्मयोगाचा आदर्श विश्वकल्याणासाठीच आहे. सम्राट चंद्रगुप्त व विक्रमादित्य या मातीतच जन्मले. परंतु आम्ही हे सर्व विसरून गेलो आहोत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आपली मानसिक व बौद्धिक गुलामगिरी होय.

**प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# पुण्यात रेव्ह पार्टीवर पोलिसांचा छापा; खडसेंच्या जावयासह सात जणांना अटक

## मादकपदार्थ, हुक्का जप्त, आरोपींना दोन दिवसांची पोलिस कोठडी

◆ **पुणे, २७ जुलै**

पुणे पोलिसांनी रविवारी पहाटे एका सदनिकेत सुरू असलेल्या रेव्ह पार्टीवर छापेमारी करीत मादकपदार्थ व हुक्का जप्त केला आहे. याप्रकरणी माजी मंत्री एकनाथ खडसे यांच्या जावयासह सात जणांना अटक करण्यात आली आहे. आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना दोन दिवस पोलिस कोठडी ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

छाप्यात रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवालकर यांच्यासह सात जणांना ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली. पोलिस कारवाई राजकीय हेतून प्रेरित तर नाही, याचा तपास केला जावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांनी केली आहे.




पुण्यातील खराडी भागात सुरू असलेल्या रेव्ह पार्टीवर छापा टाकून पोलिसांनी सात आरोपींना अटक केली.

रोहिणी खडसे या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला विभागाच्या प्रदेशाध्यक्ष आहेत. पोलिसांच्या गुन्हे शाखेने महाराष्ट्रातील पुणे शहरातील उच्चभ्रू भागात असलेल्या स्टुडिओ अपार्टमेंटमध्ये रेव्ह पार्टी सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही छापेमारी केली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

छापेमारीत गांजा, दारू आणि हुक्का जप्त करण्यात आला. खराडी परिसरात रेव्ह पार्टी सुरू असल्याची माहिती आम्हाला मिळाली होती. त्यानुसार आमच्या गुन्हे शाखेने छापेमारी केली, असे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)

### कारवाईच्या हेतूवर एकनाथ खडसेंना शंका

या छापेमारीत गांजा, दारू आणि हुक्का जप्त करण्यात आला. पाच पुरुष व तीन महिलांना आम्ही ताब्यात घेतले आहे. त्या सर्वांची रवानगी कोठडीत केली असून, या प्रकरणी गुन्हे दाखल केले, असे अधिकाऱ्याने सांगितले. पोलिसांच्या कारवाईमागे राजकीय हेतू आहे का, याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी या छापेमारीवर प्रतिक्रिया व्यक्त करताना एकनाथ खडसे यांनी केली.


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी तामिळनाडूतील गंगाईकोंडा चोलपूरम् मंदिराला भेट देऊन आदी तिरुवथिराई उत्सवात सहभाग घेतला. हे बृहदेश्वर शिवमंदिर एक हजार वर्षांपूर्वी बांधण्यात आले.

## महत्त्वाचे

### आठ कंपन्या विकण्याच्या तयारीत केंद्र सरकार

**नवी दिल्ली** : देशात सरकारी कंपन्यांच्या विक्रीच्या योजनेला वेग येण्याची शक्यता आहे. एका अहवालानुसार, केंद्र सरकारने आठ सरकारी कंपन्या विकण्याची तयारी केली आहे. यामध्ये बीईएमएल लिमिटेड, शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, एचएलएल लाइफकेअर लिमिटेड, प्रोजेक्ट्स अँण्ड डेव्हलपमेंट इंडिया, इंडियन मेडिसिन्स फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन यांचा समावेश आहे. याशिवाय आयडीबीआयचे खाजगीकरण २०२५ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. उर्वरित कंपन्यांची विक्रीही याच आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत केली जाऊ शकते.

### लोणावळ्यामध्ये तरुणीवर कारमध्ये अत्याचार

**पुणे** : लोणावळ्यात एका २३ वर्षीय तरुणीचे २५ ते ३० वयोगटातील तीन जणांनी अपहरण करून तिच्यावर कारमध्ये सामूहिक बलात्कार केला. याप्रकरणी एका संशयिताला ताब्यात घेतले असून तो तरुणीच्या ओळखीतील आहे. तरुणीच्या तक्रारीनुसार २५ जुलै रोजी रात्री नऊच्या सुमारास ती लोणावळ्यातील नारायणीधाम मंदिराजवळील तुंगार्ली येथून एकटी पायी चालत जात असताना तीन अनोळखी तरुणांनी तिला जबरदस्तीने कारमध्ये बसवले. तिघांनी तिचे हात बांधून धावत्या कारमध्ये तसेच कार थांबवून २६ जुलै रोजी पहाटेपर्यंत वारंवार अत्याचार करून कारबाहेर फेकून दिले.

### पाकिस्तानमध्ये टिकटॉक क्रिएटरची विष देऊन हत्या

**इस्लामाबाद** : पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील घोटकी जिल्ह्यात शनिवारी टिकटॉक क्रिएटर सुमिरा राजपूत यांचे तिच्या घरी रहस्यमय परिस्थितीत निधन झाले. तिच्या १५ वर्षांच्या मुलीने दावा केला की, काही लोक सुमिराला त्यांच्याशी लग्न करण्यास भाग पाडत होते. सुमिराने नकार दिल्यावर तिला विषारी गोळ्या देऊन मारण्यात आले.

# मनसामाता मंदिरात चेंगराचेंगरी, सहा ठार

## हरिद्वारमधील घटना ● २५ जखमी

◆ **हरिद्वार, २७ जुलै**

येथील मनसामाता मंदिराच्या दिशेने जाणाऱ्या पायऱ्यांवर प्रचंड गर्दी झाल्यानंतर मंदिर परिसरात रविवारी सकाळी झालेल्या चेंगराचेंगरीत किमान सहा जण ठार, तर २५ जण जखमी झाले. त्यातील पाच जणांची प्रकृती गंभीर आहे. या चेंगराचेंगरीच्या न्यायालयीन चौकशीचा आदेश देण्यात आला.

हरिद्वारमधील मनसामाता मंदिरात प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी झालेल्या चेंगराचेंगरीत सहा जण ठार झाले, असा दुजोरा गढवालचे विभागीय आयुक्त विनय शंकर पांडे यांनी दिला. भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे गोंधळ आणि दहशत निर्माण झाली. चेंगराचेंगरीची माहिती मिळताच, पोलिस आणि प्रशासकीय पथके घटनास्थळी दाखल झाली.

चेंगराचेंगरीनंतर ३५ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी नऊ जणांचा मृत्यू झाला. ही चेंगराचेंगरी सकाळी नऊ वाजता झाली. रविवार असल्याने शिवालिक टेकड्यांच्या माथ्यावर ५०० फूट उंचीवर असलेल्या मंदिरात मोठी गर्दी उसळली होती. घटनास्थळावरील दुसऱ्या एका चित्रफितीत मुले आणि महिलांसह लोकांची मोठी गर्दी मंदिरात येताना दिसत होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चेंगराचेंगरीत झालेल्या जीवितहानीवर तीव्र दुःख व्यक्त केले. (वृत्तसंस्था)



### अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाई : मुख्यमंत्री धामी

या प्रकरणाच्या न्यायालयीन चौकशीचा आदेश देण्यात आल्याची माहिती उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी दिली. सकाळी मनसामाता मंदिरात एका अफवेमुळे चेंगराचेंगरी झाली. आम्ही या घटनेच्या दंडाधिकारी चौकशीचा आदेश दिला आहे. अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे धामी म्हणाले.

# शैक्षणिक संस्थांच्या सुरक्षेत निष्काळजीपणा नको

## शिक्षण मंत्रालयाने राज्य सरकारांना जारी केल्या सूचना

◆ **नवी दिल्ली, २७ जुलै**

शिक्षण मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी एक निर्देश जारी केला आहे. यामध्ये, शालेय मुले आणि तरुणांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी तात्काळ उपाययोजना निश्चित करण्यास सांगितले आहे.

त्यात स्पष्टपणे म्हटले आहे की राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सर्व शैक्षणिक संस्था आणि विद्यार्थी आणि तरुणांची वारंवार ये-जा असलेल्या ठिकाणांचे नियतकालिक सुरक्षा ऑडिट करावे लागेल. शिक्षण मंत्रालयाने असेही निर्देश दिले आहेत की आपत्कालीन परिस्थितीत, विद्यार्थी आणि तरुणांसाठी तक्रार नोंदवण्याची यंत्रणा सोपी आणि सुव्यवस्थित असावी. तसेच, त्यांच्या तक्रारींवर लवकरात लवकर कारवाई करावी. कोणताही धोकादायक अपघात, अपघाताची शक्यता किंवा अपघातास कारणीभूत ठरू शकणारी कोणतीही घटना २४ तासांच्या आत कळवावी. असे न करणाऱ्या संस्थांवर कडक कारवाई केली जाईल. तसेच, विलंब किंवा निष्काळजीपणा आढळल्यास संस्थांवर प्रशासकीय कारवाई केली जाईल.

### विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचीही काळजी घ्या

या सूचनांमध्ये, शिक्षण मंत्रालयाने विद्यार्थ्यांच्या केवळ शारीरिक सुरक्षेचीच नव्हे तर त्यांच्या मानसिक सुरक्षेचीही काळजी घेण्यास सांगितले आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि भावनिक आरोग्याला आधार देण्यासाठी वातावरण तयार करण्याचे निर्देश संस्थांना देण्यात आले आहेत. (वृत्तसंस्था)

# ऑपरेशन सिंदूरवर होणार वादळी चर्चा!

◆ **नवी दिल्ली, २७ जुलै**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात पहिला आठवडा गोंधळातच वाया गेला. मात्र, सोमवारपासून पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर या मुद्यांवर संसदेत वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे. कारण, सत्ताधारी आघाडी आणि विरोधी पक्ष राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणाच्या अत्यावश्यक बाबींमध्ये गुंतलेल्या दोन मुद्यांवर एकमेकांवर प्रखर हल्ला करण्याची तयारी करीत आहेत.




लोकसभा आणि राज्यसभेतील चर्चेदरम्यान भाजपाच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडी व विरोधी पक्ष आपले मुद्दे मांडतील अशी अपेक्षा आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर या मुद्यावर बोलतील, अशी माहिती सूत्रांनी दिली. गरज भासल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यात हस्तक्षेप करून दहशतवादाच्या विरोधात सरकारची भूमिका अत्यंत कठोर असल्याचा संदेश देऊ शकतात. (वृत्तसंस्था)

### काँग्रेसच्या वक्त्यांमध्ये थरूर यांच्या निवडीवर शंका

वक्तव्यांमध्ये शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, जदयूचे संजय झा, तेदेपाचे हरीश बालयोगी यांचा समावेश आहे. दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारच्या कारवाईला उत्साही पाठिंबा देणाऱ्या अनुभवी लोकसभा सदस्य शशी थरूर यांचे काँग्रेस पक्षासोबत संबंध बिघडले आहेत. त्यामुळे अमेरिकेसह इतर देशांना भेट देणाऱ्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करणारे शशी थरूर यांची काँग्रेसकडून वक्ते म्हणून निवड केली जाईल का, यावर एक मोठा प्रश्नचिन्ह आहे.

### टीसीएस १२ हजार कर्मचाऱ्यांची करणार कपात

**बंगळुरू** : देशातील सर्वात मोठी आयडी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस अर्थात् टीसीएसने एकूण कर्मचाऱ्यांपैकी दोन टक्के कर्मचाऱ्यांची कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनी एआय अर्थात् कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अधिक प्रमाणात करणार असल्याने त्यांनी कर्मचारी कपात करणार असल्याचे म्हटले आहे. टीसीएसचे मुख्य कार्यकारी अधिकारी के. कृतिवासन यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, वर्षभरात त्यांची कंपनी एकूण १२ हजार कर्मचाऱ्यांची कपात करणार आहे. यात बहुतांश कनिष्ठ आणि वरिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांचा समावेश राहणार आहे.

# भारताचे २०३५ मध्ये स्वत:चे अंतराळ स्थानक

**हैदराबाद, २७ जुलै**

भारत स्वत:च्या अंतराळ स्थानकाची उभारणी २०३५ पर्यंत करणार आहे आणि अवकाश यानाचे पहिले प्रारूप २०२८ मध्ये पृथ्वीच्या कक्षेत स्थिर केले जाईल, अशी माहिती भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात् इस्रोचे प्रमुख व्ही. नारायणन यांनी एका कार्यक्रमात दिली.

जी. पी. बिर्ला स्मृती व्याख्यानात बोलताना नारायणन म्हणाले, भारताच्या गगनयान मोहिमेचे अनावरण २०२७च्या पहिल्या तिमाहीत होण्याची आहे.

पुढील तीन वर्षांत उपग्रहांची संख्या तिपटीने वाढविण्याची गरज आहे. इस्रोने यावर्षी बारा मोहिमांचे नियोजन केले आहे. येत्या ३० जुलै रोजी यातील नासा आणि इस्रो सिंथेटिक ॲपर्चर रडार अर्थात् निसार भारताच्या जीएसएलव्ही एफ-१६ रॉकेटने प्रक्षेपित करेल. चांद्रयान-३ च्या यशानंतर जपानला भारताशी भागीदारी करण्याची इच्छा होती. त्यानुसार इस्रो आणि जपानची अवकाश संस्था जाक्सा एकत्रितपणे चांद्रयान-५ मोहिमेवर काम करीत आहेत. आम्ही एकत्रितपणे उपग्रह तयार करीत आहोत. जपानमधून त्यांचे अनावरण केले जाईल. चांद्रयान-३मधील लँडरचे वजन १६०० किलो होते. आता ते ६६०० किलो असेल.

## बांगलादेश सीमेवरील जवानांना मिळाले 'बॉडी कॅमेरे

**नवी दिल्ली** : घुसखोर बांगलादेशींना हद्दपार करण्याचे दृश्य आणि पुरावे रेकॉर्ड करता यावेत तसेच कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांवर गुन्हेगारांकडून हल्ला केल्याच्या घटनाही नोंदवता याव्यात, यासाठी भारत-बांगलादेश आंतरराष्ट्रीय सीमेचे रक्षण करणाऱ्या सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना पाच हजारांपेक्षा जास्त बॉडी कॅमेरे पुरवले जात आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ४०९६ किमीच्या सीमेवरील काही निवडक सीमा चौक्या (बीओपी) देखील बेकायदेशीर बांगलादेशींच्या बोटांचे ठसे आणि आयरीस (डोळे) स्कॅन करण्यासारख्या बायोमेट्रिक्स कॅप्चर करण्यासाठी उपकरणे सुसज्ज केली जात आहेत. जेणेकरून हा डेटा विदेशी नोंदणी कार्यालयाला (एफआरओ) शेअर करता येईल.

# माया, मोह त्यागूनी स्वीकारले शिवनाम...

◆ **नवी दिल्ली, २७ जुलै**

जैन धर्मात कोट्यवधी रुपयांची संपत्ती सोडून सन्यासी बनल्याच्या अनेक बातम्या तुम्ही पाहिल्या असतील. भौतिक सुखांच्या मागे धावणाऱ्या या जगात असा निर्णय घेणे भारतात नवीन नाही. मात्र, जपानमधील एका अब्जाधीशाने आपल्या कोट्यवधींच्या साम्राज्याचा त्याग करून शिवभक्त बनण्याचा निर्णय घेतल्याने सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. टोकियोमध्ये १५ सौंदर्य उत्पादनांच्या दुकानांचे मालक असलेले ४१ वर्षीय होशी ताकायुकी आता 'बाला कुंभ गुरुमुनी' या नावाने ओळखले जात आहेत.




होशी ताकायुकी हे आता भगव्या वस्त्रांत दिसणारे शिवभक्त आहेत. त्यांनी आपला भरभराटीचा व्यवसाय सोडून आध्यात्मिक प्रवासाला सुरुवात केली आहे. एकेकाळी टोकियोमध्ये १५ यशस्वी सौंदर्य उत्पादनांचे मोठे मालक असलेले ताकायुकी, आता उत्तराखंडमध्ये भगवान शिवाच्या उपासनेत लीन आहेत. त्यांनी २० जपानी अनुयायांसह नुकतीच कावड यात्रा केली, ज्यात ते पवित्र गंगाजल घेऊन अनवाणी चालताना दिसले. त्यांच्या यात्रेदरम्यान, त्यांनी देहरादूनमध्ये कावड यात्रेकरूंसाठी दोन दिवसांचे अन्न शिबिरही आयोजित केले होते.

### मागील जन्माचे रहस्य आणि आध्यात्मिक वळण

ताकायुकींचा आध्यात्मिक प्रवास २० वर्षांपूर्वी तामिळनाडूमध्ये सुरू झाला. तिथे त्यांना नाडी ज्योतिषाची ओळख झाली, जी प्राचीन ताडपत्रांवरून जीवनाचा अर्थ लावते. या वाचनातून त्यांना कळले की, त्यांनी मागील आयुष्य हिमालयात घालवले होते आणि हिंदू अध्यात्माचे पालन करणे हिच त्यांची नियती होती.

ताडपत्रांवर स्पष्ट लिहिले होते की 'तुमचे मागील आयुष्य उत्तराखंडमध्ये गेले होते'. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना एक स्वप्न पडले, ज्यात त्यांनी स्वतःला उत्तराखंडमधील एका गावात पाहिले. या अनुभवाने त्यांचे आयुष्य पूर्णपणे बदलून टाकले. देवभूमीशी विशेष नाते असल्याचे गुरुमुनींना वाटते.

### शिवमंदिरांचे बांधकाम, आश्रम उघडण्याची योजना

या अनुभवानंतर, ताकायुकींनी आपले व्यावसायिक साम्राज्य अनुयायांकडे सोपवून बालकुंभ गुरुमुनी हे नवीन नाव स्वीकारले. त्यांनी टोकियोमधील आपले घर पूर्णपणे शिवमंदिरात रूपांतरित केले आणि जपानमध्ये आणखी एक मंदिरही बांधले. आता त्यांची योजना पुद्दुचेरीमध्ये ३५ एकर जमिनीवर एक विशाल शिव मंदिर बांधण्याची आहे, तसेच लवकरच उत्तराखंडमध्ये एक आश्रम उघडण्याचीही त्यांची तयारी आहे. (वृत्तसंस्था)

# २०२६ मध्ये अर्थव्यवस्थेचा वेग असेल ६.५ टक्क्यांवर

## ● रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीच्या सदस्याचे मत

**नवी दिल्ली, २७ जुलै**

भारतीय अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे आणि चालू आर्थिक वर्षात ६.५ टक्क्यांपेक्षा जास्त विकास दर गाठण्यात कोणतेही आव्हान असणार नाही, असे रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीचे सदस्य नागेश कुमार यांनी रविवारी सांगितले.

सर्व अर्थव्यवस्थांमध्ये भारतीय अर्थव्यवस्था जगासाठी एक उज्ज्वल स्थान आहे. खरं तर, जागतिक अर्थव्यवस्थांपैकी एक तृतीयांशपेक्षा जास्त देश कर्जाच्या संकटात आहेत. औद्योगिक अर्थव्यवस्थांवर खूप दबाव, उच्च चलनवाढ आणि आर्थिक विकास मंदावलेला आहे, असे ते म्हणाले. परंतु, भारतीय अर्थव्यवस्था निर्यात किंवा व्यापारापेक्षा कमी, देशांतर्गत वापर आणि गुंतवणुकीवर जास्त चालत असल्याने भारताची वाढ सतत वेगाने होत आहे, असे कुमार म्हणाले. चालू वर्षात आणि पुढील वर्षी भारतीय अर्थव्यवस्थेने ६.५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ साध्य करण्याचे कोणतेही आव्हान मला दिसत नाही, असे कुमार म्हणाले. येत्या काही वर्षांत अशा प्रकारची वाढीची गती कायम राहील. परंतु, कालांतराने ती ७ ते ७.५ टक्क्यांपर्यंत मजबूत होईल, असे ते म्हणाले.

मागील आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ६.५ टक्के राहण्याचा अंदाज आहे. चालू आर्थिक वर्षातही देशाची अर्थव्यवस्था त्याच दराने विस्तारेल. सध्याचा चलनवाढीचा दर सुमार दोन टक्के आहे आणि हे मुख्यत्वे पतधोरण समिती किंवा रिझर्व्ह बँकेने स्वीकारलेल्या धोरणाचा परिणाम आहे आणि आता ते लक्ष्य मर्यादेत आले आहे, असे कुमार यांनी महागाईवरील प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

### अमेरिकेसोबत व्यापार करार झाल्यास फायदा

अमेरिकेसोबत द्विपक्षीय व्यापार करार झाल्यास आपल्याला त्या देशातील कामगार केंद्रित क्षेत्रातील विशाल बाजारपेठेत प्रवेश मिळेल. आपल्याकडे मुबलक कामगार संसाधने असल्याने त्याचा फायदा होणार आहे, असे कुमार यांनी अमेरिकेसोबतच्या प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार कराराबद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. भारताला कृषी क्षेत्र, दुग्धव्यवसाय क्षेत्र आणि इतर काही क्षेत्रे खुली करण्याबाबत काही चिंता असल्याचेही स्पष्ट केले.

## महत्त्वाचे...



## मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आर्थिक बचत करणे आवश्यक : डॉ. इक्बाल

**सुपर अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची कार्यशाळा**

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २७ जुलै-

समाजाला आर्थिक नियोजन करण्याचे व मुलाबाळांच्या भवितव्यासाठी जागरूक रहावे. मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आर्थिक बचत करणे आवश्यक आहे. समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी संस्थेने कोणतीही कसर सोडणार नाही, असे प्रतिपादन सुपर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे चेअरमन डॉ. आसिफ इक्बाल यांनी केले.

चिरागअली ट्रस्ट आणि सुपर अर्बन को-ऑप. सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने इम्पिरिअल गार्डन येथे आयोजित बक्कर कसाब/खाटीक समाजाच्या व्यवसायसंबंधी प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी मेळाव्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. त्यांनी हज व उमरासाठी बचत करणाऱ्या विविध योजनांचे सादरीकरण केले. व्याजमुक्त कर्ज योजना, बचत योजना व इतर वित्तीय उपाय योजनांचीही त्यांनी माहिती दिली. खाटीक समाजांना कर्ज बाजारीतून कर्जमुक्त करून 'जकात देणारा समाज' घडवण्याचा निर्धार चिरागअली ट्रस्टचे अध्यक्ष अॅड. महिबुब कोथिंबिरे यांनी यावेळी व्यक्त केला. अध्यक्षस्थानी शेख समीउल्लाह हे होते. यावेळी बक्कर कसाब एज्युकेशन असोसिएशनचे अध्यक्ष अ. समद माडी, समाजाचे अध्यक्ष बिलाल बेपारी, अबुबकर कामले, हाजी युनुस कामले, व्हा. चेअरमन मुनाफ कामले, सेक्रेटरी अ. कुदुस कामले, ट्रस्टी इरफान अलमेलकर, रियाज शहाजी, मुस्ताक चौधरी, इस्तीयाक शहाजी, मोइन कामले हे ट्रस्टचे इतर सदस्यही उपस्थित होते. इतिहासतज्ज्ञ वक्ते सरफराज शेख आणि बक्कर कसाब एज्युकेशन कमिटीचे सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सीए मौलाना शेख, जुबेर शेख, मोहसिन शेख, रेहान शेख, याकुब शेख, अली हसन, डॉ. इक्बाल धोटेघर, मुर्तुज धोटेघर, अल्ताफ कुडले, वाईज सय्यद यांनी परिश्रम घेतले.

## अमेरिकन जनरल कुरिल्लांना पाकिस्तानचा सर्वोच्च लष्करी सन्मान

**इस्लामाबाद :** पाकिस्तानने अमेरिकेच्या सेंट्रल कमांडचे प्रमुख जनरल मायकेल कुरिल्ला यांना देशाचा सर्वोच्च लष्करी सन्मान निशान-ए-इम्तियाज प्रदान केला आहे. इस्लामाबादमधील राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी हा पुरस्कार प्रदान केला. जनरल कुरिल्ला यांना प्रादेशिक शांतता वाढवण्यासाठी आणि पाकिस्तान-अमेरिका लष्करी संबंध मजबूत करण्यासाठी हा सन्मान देण्यात आला. जनरल कुरिल्ला यांनी पाकिस्तानचे अध्यक्ष झरदारी आणि लष्करप्रमुख असीम मुनीर यांची भेट घेतली. या सन्मानाद्वारे पाकिस्तान अमेरिकेप्रती आपली निष्ठा व्यक्त करत आहे.

# दादूला राजचे अनोखे बर्थडे सरप्राईज!

### मातोश्रीवर जाऊन दिल्या शुभेच्छा

### शिवसेना पक्षप्रमुख म्हणत केली पोस्ट

तभा वृत्तसेवा । जमीर काझी
मुंबई, दि. २७ जुलै-

मराठी भाषेच्या मुद्यावरून तब्बल दोन दशकानंतर एकत्र आलेल्या उद्धव आणि राज या ठाकरे बंधुंच्या मनोमिलनाचा दुसरा अंक रविवारी पहावयास मिळाला. त्यासाठी निमित्त ठरले ते दादूचे अर्थात उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाचे. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मातोश्रीवर जाऊन त्यांना शुभेच्छा देत शिवसेनाप्रमुखाच्या खोलीत बसून सविस्तर चर्चा केली.त्यानंतर एक्सवर माझे मोठे बंधू व शिवसेना पक्षप्रमुख असा उल्लेख करीत त्यांच्या समवेतच्या भेटीचा फोटो पोस्ट केला.

राज यांनी तब्बल २० वर्षानंतर उद्धव यांना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्यातर जवळपास ६ वर्षांनंतर मातोश्रीवर पाऊल ठेवले., त्यांच्या या अनपेक्षित कृतीमुळे दोन्ही पक्षाचे नेते व सैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून राज्यात चर्चेचा विषय बनला. भविष्यातही दोघे बंधू राजकीयदृष्ट्या एकत्र राहतील, यांची ही स्पष्ट नांदी असल्याचे सांगण्यात आले. विशेषतः कागदोपत्री दोन सेना अस्तित्वात असताना उद्धव यांचा शिवसेना पक्षप्रमुख म्हणून उल्लेख करीत राज यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विषय आपल्यापरीने संपविल्याचे राजकीय वर्तुळातून समजले जात आहे.



### मला कैकपटीने आनंद

आज आनंदाचा दिवस असून राज घरी आल्यामुळे त्यामध्ये कैकपटीने वाढ झाली. म हाराष्ट्राच्या मनात आहे, तेच घडत आहे.शिवसेना एकच असल्याने त्यांनी माझा पक्ष प्रमुख म्हणून उल्लेख केला त्यामध्ये विशेष काही नाही,

**- उद्धव ठाकरे (माजी मुख्यमंत्री)**

पहिलीपासून हिंदी विषय अनिवार्य करण्याचा राज्य सरकारच्या निर्णयाविरुद्ध ठाकरेंची सेना व मनसे एकत्र आली.त्यांच्या मोर्चाच्या इशारानंतर त्याबाबतचा जीआर सरकारने रद्द केल्यावर ५ जुलैला दोन्ही भावांनी विजयी मेळावा घेतला होता. त्यानंतर आज पुन्हा उद्धव यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त दोघे भाऊ एकत्र आले.

### अशी झाली भेट

राज ठाकरे यांनी बाळा नांदगावकर यांच्या मोबाईल वरून संजय राऊत यांना फोन करून आपण उद्धव यांना शुभेच्छा देण्यासाठी मातोश्रीवर येत असल्याचे सांगितले. त्यानंतर ते निवडक नेत्यांसमवेत १२.०५ वाजता मातोश्रीवर पोहचले. याठिकाणी शिवसैनिकांनी फटाक्याची आतषबाजीकरीत त्यांचे जल्लोषात स्वागत केले. उद्धव यांनी स्वतः प्रवेशद्वारात येऊन त्यांचे स्वागत करीत आत नेले. त्यानंतर तेथे उभारलेल्या छोट्याशा व्यासपीठावर उभे राहत दोघांनी अलिंगन दिले. राज यांनी गुलाब पुष्पाचा मोठा बुके देत त्यांना शुभेच्छा दिल्या.त्यानंतर दोघे शिवसेनाप्रमुखाच्या खोलीत जाऊन सुमारे २० मिनिटे चर्चा केली. बाळासाहेबांची प्रतिमा व ते ज्या खुर्चीवर बसत असत त्याला अभिवादन केले. लहानपणाच्या आठवणी व व्यंगचित्रकलेबाबत गप्पा मारल्या. दुपारी १२.२५ च्या सुमारास ते मातोश्रीतून बाहेर पडले. त्यानंतर थोड्याच वेळात राज यांनी भेटीच्या फोटोसह 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरुन्ही मोठ्या भावाला शुभेच्छा दिल्या. त्यामध्ये 'माझे मोठे बंधू, शिवसेना पक्षप्रमुख श्री. उद्धव ठाकरे' असा करीत बाळासाहेबांचे निवासस्थान असलेल्या मातोश्रीवर जाऊन शुभेच्छा दिल्या असल्याचा उल्लेख केला. राज ठाकरे यांनी उद्धव यांना निवडणूक आयोगाने दिलेल्या पक्षनावाचा उल्लेख न करता थेट शिवसेना असा उल्लेख करत उद्धव ठाकरे यांना 'शिवसेना पक्षप्रमुख' म्हटले आहे. यामुळे खरी शिवसेना कोणाची याची अधिकृत घोषणाच राज यांनी उद्धव यांना वाढदिवसाचे सर्वात मोठे गिफ्ट दिल्याचे मानले जात आहे.

### भाऊ भावाला भेटणे ही आनंदाची बाब

उद्धव ठाकरे यांचा आज उद्धव यांचा वाढदिवस आहे त्यांना भेटण्यासाठी राज ठाकरे गेले ही आनंदाची बाब आहे. आमच्याही उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा आहेत. वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा द्यायला जाणे, यात राजकारण पाहणे योग्य नाही.महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे विधानसभेच्या निवडणुकीत दिसले आहे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दिसेल. मात्र काही पक्षांच्या नेत्यांच्या मनात काय आहे?, हे महाराष्ट्राच्या मनातलं आहे असे म्हणणे योग्य नाही. हे फार मोठे स्टेटमेंट होईल

**- देवेंद्र फडणवीस ( मुख्यमंत्री)**

### ज्युनिअर ठाकरेही एकत्र

सकाळी उद्धव व राज ठाकरे यांची मातोश्रीवर भेट झाली. त्यानंतर त्यांचे पुत्र आ. आदित्य व राज यांचे पुत्र अमित ठाकरे हेही संध्याकाळी वरळीतील एका कार्यक्रमात एका व्यासपीठावर आले. आदित्य यांच्या मतदारसंघात आयोजिलेल्या एका कार्यक्रमात दोघांनी गळाभेट घेतली.

## राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचा पूर्ण अधिकार : मुख्यमंत्री

### मंत्री संजय शिरसाट आणि माधुरी मिसाळ यांच्यातील वादावर केली भूमिका स्पष्ट

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. २७ जुलै-

महायुतीतील सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट व राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यातील वादाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचा पूर्ण अधिकार आहे,मात्र धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असल्यास त्याबाबत कॅबिनेट मंत्र्यांना कल्पना द्यावयास हवी, असे सांगतानाच याबाबत काही अडचण असल्यास आपसात बोलावे किंवा माझ्याशी चर्चा केली पाहिजे, अशा शब्दात त्यांना खडसावले आहे.

राज्यमंत्री मिसाळ या आपल्याला न विचारता परस्पर अधिकाऱ्यांच्या बैठका घेत आहेत. हे योग्य नाही, त्यांनी आपल्याला त्याबद्दल पहिल्यांदा कळविले पाहिजे, अशी नाराजी संजय शिरसाट यांनी त्यांना पत्र लिहून कळविली होती. त्यावर मिसाळ यांनी राज्यमंत्र्यांना बैठक घेण्याचे अधिकार आहेत, त्याबद्दल कळविण्याची गरज नाही, असे पत्राद्वारे प्रत्युत्तर दिले. त्यांच्यातील या पत्रव्यवहारामुळे मंत्रिमंडळात सर्व काही आलबेल नसल्याची टीका विरोधकांकडून करण्यात येत होती. याबाबत आज मुख्यमंत्र्यांकडे पत्रकारांनी विचारणा केली असता. ते म्हणाले, पत्र लिहून कोणीही वाद निर्माण करु नये. मंत्र्यांनी आपापसात बोलावे आणि मंत्र्यांना काही अडचणी असतील तर त्यांनी मला येऊन सांगावे, त्यातील अडचण दूर करता येईल. मंत्री आणि राज्यमंत्री दोघेही शासनाचे भाग आहेत, सर्व अधिकार मंत्र्यांकडे असतात . मंत्री जे अधिकार देतात ते राज्यमंत्र्यांचे अधिकार असतात, यात कुठलाही संशय नाही.

### रेव्ह पार्टी सुरु होती : मुख्यमंत्री

पुण्यात रेव्ह पार्टीवर पोलिसांनी छापा टाकला. या रेव्ह पार्टीवरील कारवाईत एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे. याबाबत विचारणा केली असता फडणवीस म्हणाले, मी पण ही माहिती माध्यमातून घेतली आहे, मी सकाळपासून विविध कार्यक्रमांमध्ये फिरतो आहे. त्यामुळे मला ब्रीफिंग घेता आलेलं नाही. मात्र, जे माध्यमात दिसलं त्याप्रमाणे पुणे पोलिसांनी एका रेव पार्टीवर कारवाई केली आहे. त्यामध्ये काही लोक सापडले आहे. त्यामध्ये काही ड्रग्स वगैरे सापडले आहेत. पोलीस अधिकाऱ्यांकडून पूर्ण ब्रीफिंग घेतल्यानंतर यावर बोलू शकेल. मात्र प्राथमिकदृष्ट्या असा प्रकारचा गुन्हा त्या ठिकाणी घडल्याचा दिसून येत आहे.

## 'महा स्माईल्स' मोहिमेमुळे विदर्भातील निष्पाप चेहऱ्यांवर पुन्हा फुलणार हसू

तभा वृत्तसेवा,
मुंबई, दि. २७ जुलै-

बालकांच्या चेहऱ्यावरील दुभंगलेले ओठ (क्लेफ्ट) व फाटलेले टाळू (पॅलेट) या जन्म जात विकारावर उपचार आणि जनजागृती करून या बालकांच्या निरागस चेहऱ्यावर हसू फुलविणे, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ध्येय आहे. यासाठी त्यांनी विदर्भातील अशा बालकांवर उपचार आणि जनजागृतीची गरज ओळखत त्यांनी स्वयंसेवी संस्थांना आवाहन केले.

मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला 'स्माईल ट्रेन इंडिया' ही स्वयंसेवी संस्था आणि बजाज फिनसर्वच्या शेफाली बजाज यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. 'स्माईल ट्रेन इंडिया' ही आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था आणि बजाज फिनसर्व यांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून आता ही मोहीम पूर्णपणे मोफत राबविली जाणार आहे. 'महा स्माईल्स क्लेफ्ट जनजागृती आणि उपचार मोहीम' ही केवळ वैद्यकीय मोहीम नसून, हजारो बालकांना नवजीवन देणारी एक आशावादी चळवळ ठरणार आहे. नागपूरात ३१ जुलै सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन हॉस्पिटल, खापरी, येथून होणार आहे. या पहिल्यावहिल्या उपक्रमा अंतर्गत पुढील ९० दिवसांत तीन विशेष मोबाईल व्हॅन विदर्भातील संपूर्ण ११ जिल्ह्यात फिरून लोकांमध्ये क्लेफ्ट विकाराविषयी माहिती देणार आहेत.

# क्रीडा

## पद्मनगर अकादमीच्या परविन शेख हिची आंतरराष्ट्रीय बास्केटबॉलसाठी निवड

सोलापूर, दि. २७ जुलै-

येथील पद्मनगर बास्केटबॉल अकादमीच्या परविन शेख हिची आंतरराष्ट्रीय बास्केटबॉलसाठी निवड झाली. ग्रीन फिल्ड आंतरराष्ट्रीय इंडस्ट्रियल त्रिवेंद्रम, केरळ येथे स्टीफन जेकब मेमोरियल आंतरराष्ट्रीय मास्टर्स बास्केटबॉल स्पर्धा आयोजित केली आहे. त्यात तिची निवड झाली आहे. भारतातील ही पहिली आंतरराष्ट्रीय मास्टर्स बास्केटबॉल स्पर्धा असून विविध आंतरराष्ट्रीय संघ यामध्ये सहभागी होणार आहेत. सध्या ती नायगाव मुंबई येथील क्रीडा विभागात पोलीस कर्मचारी म्हणून कार्यरत आहे. तिचे नायगाव क्रीडा कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. तिला प्रशिक्षक श्रीधर गायकवाड, प्रबुद्ध चिंचोलीकर, संस्थेचे अध्यक्ष आनंद वल्लाकाटी, श्रीशैल गुरव, स्वाती कोठे, सुशील नाटकर, बंटी क्षीरसागर विशाल बनसोडे, श्रीधर ताटीपामूल, अश्विन येद्रू यांनी शुभेच्छा दिल्या.



## सोलापूरच्या संध्याराणी बंडगर हिला विजेतेपद

### वर्ल्ड मास्टर्स टेनिस अजिंक्यपद स्पर्धा : देसाई उपांत्यपूर्व फेरीत

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, २७ जुलै-

जिल्हा लॉन टेनिस संघटना यांच्या वतीने आयोजित व आयटीफ, एआयटीए, एमएसएलटीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एमएसएलटीए एसडीएलटीए आयटीएफ एमटी ४०० वर्ल्ड मास्टर्स टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत ४५ वर्षावरील महिला गटात अंतिम फेरीत अव्वल मानांकित येथील संध्याराणी बंडगर हिने दुसऱ्या मानांकित बंगळूरच्या स्मिता रवींद्रचा ६-२, ६-४ असा पराभव केला. येथील राजीव देसाई यांनी ६० वर्षावरील गटातील एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यांनी भारताच्याच सूरज झंझोटे यांचा ६-१, ६-० असा पराभव केला. एमएसएलटीए टेनिस सेंटर आणि इलीसीएम क्लब जामश्री कॉम्प्लेक्स सिद्धेश्वर पेठ येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत ५० वर्षावरील पुरुष गटात उपांत्यपूर्व फेरीत बिगर मानांकित शंकर सुब्रमण्यम याने चौथ्या मानांकित अवनीश रस्तोगीचा ७-५, ३-६, १०-७; असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. तिसऱ्या मानांकित आशिष पंतने मकतुमसाहेब काझीचा ७-५, ६-१ असा तर, कामुद्दीन खान याने मधुसूदन मुरलीधरचा ७-५, ६-४ असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

३५ वर्षावरील पुरुष गटात उपांत्यपूर्व फेरीत अव्वल मानांकित चांद शेख याने मनोलिन सेथुनाथला ६-३, ६-४ असे पराभूत केले. पुण्याच्या दुसऱ्या मानांकित अरुण भोसले याने आरुष शहाचा ६-२, ६-४ असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली. ६० वर्षावरील पुरुष गटात सुदेश सिंगने नवीन सोनीचे आव्हान ६-१, ६-३ असे मोडीत काढले.





## अॅथलेटिक्सच्या सिंथेटीक ट्रॅकचे आज पालकमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन

सोलापूर, दि. २७ जुलै-

नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर ४०० मीटर सिंथेटिक अॅथलेटिक्स ट्रॅकचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सोमवारी २८ जुलै रोजी ४.३० वाजता होणार असल्याचे जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी सांगितले. सर्व जिल्हा क्रीडा संघटना, क्रीडा शिक्षक संघटनेचे पदाधिकारी व क्रीडाप्रेमी नी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री. पवार यांनी केले आहे.

### क्रीडाप्रेमींचा निषेध

दरम्यान याचे निमंत्रण विविध वॉटसअॅप ग्रुप पडल्याचे सोलापुरातील विविध जिल्हा क्रीडा संघटना व क्रीडा शिक्षक संघटनेला कळाले आहे. जिल्हा क्रीडा कार्यालयाचे अशा पद्धतीने निमंत्रण मिळाल्यामुळे विविध जिल्हा क्रीडा संघटनेचे पदाधिकारी व क्रीडा शिक्षक संघटनांनी याची नाराजी व्यक्त करीत या घटनेचा निषेध व्यक्त केला आहे.

## एसव्हीसीएस हायस्कूलच्या मनस्वी माने हिची राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड

सोलापूर, दि. २७ जुलै-

अक्कलकोट रोडवरील एस.व्ही.सी.एस. हायस्कूल एमआयडीसीच्या इयत्ता आठवीमध्ये शिकणारी मनस्वी माने हिची राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड झाली. राज्यस्तरीय जलतरण डायव्हिंग स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीवर तिची निवड झाली. बेंगलुरु (कर्नाटक) येथे ४ ते ८ ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत ती भाग घेईल. तिचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक संतोषकुमार तारके यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



## सेंट थॉमस स्कूलच्या मुलांना उपविजेतेपद, मुली तृतीय

### सुब्रतो मुखर्जी करंडक शालेय फुटबॉल स्पर्धा

सोलापूर, दि. २७ जुलै-

सेंट थॉमस स्कूलच्या मुलांच्या संघाने सुब्रतो मुखर्जी शालेय शहर फुटबॉल स्पर्धेचे उपविजेतेपद संपादिले. मुलींना तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले.

१५ वर्षाखालील मुलांच्या गटात सेंट थॉमस संघाने आईएमएस स्कूलचा २- १ पराभव केला. १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने सहस्त्रार्जुन प्रशालेचा ३-० असा पराभव करून ही कामगिरी केली. या संघास क्रीडा शिक्षक राजेंद्र गायकवाड व सिल्व्हेस्टर जॉन यानी मार्गदर्शन केले. संघाचे सेंट थॉमस स्कूलचे मुख्याध्यापक फादर रोबिन, क्रीडा विभागाचे अमित येवलेकर व श्री. दामोदर यांनी अभिनंदन केले.



**उपविजयी संघ: मुले :** विक्रांत गीवारे, अथर्व जाधव, रुद्र घाडगे, आर्यन नागणे, अजीम मुलानी, ओमकार बाके, जयराज चोपडे, देवेश दहिया, हर्षल सांगवे, श्लोक कोळी, अभिनव गाडे, पुनीत आर्य, आर्यन क्षीरसागर, आरुष पारसे, आयुष मीणा, देवांग झिझुरडे.

**तृतीय संघ : मुली :** शिवानी पोखरकर, एकांशी निरंजन, प्रियल संघवे, सृष्टि सोनवने, सायली जाधव, रुचिका चुंगीवाडियार, अक्षरा तावसि, भक्ति सुतार, माही पुजारी, तेजस्वी आनंद ,तनिष्का पाटिल, तेजश्री झेंडेकर, अनुराधा माने, नसरीन ढालायत, हर्षित जोशी.

## आंतरराष्ट्रीय जंपरोप स्पर्धेसाठी जवाहर नवोदय विद्यालयाच्या चौघांची निवड

सोलापूर, दि. २७ जुलै-

पोखरापूर (ता. मोहोळ) येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या चौघांची आंतरराष्ट्रीय जंप रोप स्पर्धेसाठी निवड झाली. चैतन्य प्रदिपकुमार दिवटे, जान्हवी प्रफुल्ल दिवटे, अस्मिता दुर्योधन जाधव (तिघे मद्रे) आणि साक्षी सतीश शिंदे (मद्रे) हे निवड झालेले चार खेळाडू आहेत. भारतातून ४३ खेळाडूंची निवड झाली आहे. त्यात या चौघांचा सम विश आहे.

मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत त्यांनी सुवर्ण पदक पटकाविले. त्यानंतर राष्ट्रीय नाशिक येथे झाल्या. तेथेही या सर्व विद्यार्थ्यांनी सुवर्ण पटकाविले. या काम गिरीवर त्यांची निवड झाली. कावासाकी जपान येथे सुरू झालेल्या स्पर्धेत त्या सहभागी झाल्या आहेत. तीन ऑगस्टपर्यंत या स्पर्धा होणार आहेत. त्यांचे विद्यालयाचे प्राचार्य संजय कोठाडी, श्री. वाणी, श्री. ठकिरडे व क्रीडा शिक्षिका मुळीक यांनी अभिनंदन केले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# किल्ल्याचा प्रत्येक दगड ऐतिहासिक घटनेचा साक्षीदार

## 'मन की बात'मध्ये पंतप्रधान मोदींनी सांगितली शिवरायांच्या गडांची गौरवगाथा



◆ **नवी दिल्ली, २७ जुलै**

युनेस्कोने मराठ्यांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. या किल्ल्यांपैकी प्रत्येक किल्ल्याशी इतिहासाचे एक पान जोडलेले आहे आणि येथील प्रत्येक दगड ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या आपल्या रेडिओ कार्यक्रमातून ऐतिहासिक निर्णयाचे कौतुक केले.

'मन की बात'च्या १२४ व्या भागात बोलताना मोदींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या गौरवास्पद इतिहासाला उजाळा दिला. ते म्हणाले, या १२ किल्ल्यांपैकी ११ किल्ले महाराष्ट्रात आहेत, तर एक किल्ला तामिळनाडूमध्ये आहे. या प्रत्येक किल्ल्याचा स्वतःचा गौरवशाली इतिहास आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे आणि दूरदृष्टीचे कौतुक करताना मोदी म्हणाले, साल्हेरचा किल्ला, जिथे मराठ्यांनी मुघलांचा दारूण पराभव केला. शिवनेरी, जिथे छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला; इतका सुरक्षित किल्ला की शत्रू त्याला कधीही भेदू शकला नाही. समुद्राच्या मधोमध बांधलेला खांदेरीचा किल्ला हे एक अद्भुत आश्चर्य आहे. शत्रूंनी त्यांना रोखण्याचा खूप प्रयत्न केला, पण छत्रपती शिवाजी महाराजांनी अशक्य ते शक्य करून दाखवले.

**मोदींनी सांगितली रायगड भेटीची आठवण**

यावेळी नरेंद्र मोदी यांनी आपल्या रायगड भेटीची आठवणही सांगितली. प्रतापगड, जिथे अफझलखानाचा वध झाला, त्या पराक्रमाचा प्रतिध्वनी आजही किल्ल्याच्या भिंतींमध्ये घुमतो. विजयदुर्ग, जिथे गुप्त भुयारे होती, हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण आहे. काही वर्षांपूर्वी मी रायगडाला भेट दिली होती आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक झालो होतो. तो अनुभव माझ्यासाठी आयुष्यभराची प्रेरणा आहे, असे ते म्हणाले. पंतप्रधानांनी पुढे नमूद केले की, भारतातील किल्ल्यांनी अनेक हल्ले आणि नैसर्गिक आपत्त्यांचा सामना केला, परंतु त्यांनी आपला स्वाभिमान कधीही झुकू दिला नाही. देशाच्या इतर भागांमध्येही असे अद्भुत किल्ले आहेत. राजस्थानमधील चित्तोडगड, कुंभलगड, रणथंबोर, आमेर आणि जैसलमेरचे किल्ले जगप्रसिद्ध आहेत. कर्नाटकातील गुलबर्गा किल्लाही खूप भव्य आहे. चित्रदुर्ग किल्ल्याची विशालता पाहून आश्चर्य वाटते की, त्या काळात हा किल्ला कसा बांधला गेला असेल, असेही ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

**मराठा लष्करी स्थापत्यशैली, भारताचा सांस्कृतिक वारसा**

या महिन्याच्या सुरुवातीला जागतिक वारसा समितीच्या ४७ व्या सत्रात, भारताच्या २०२४-२५ साठीच्या मराठा लष्करी स्थापत्यशैली या नामांकनाला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाले. हा मान मिळवणारे हे भारतातील ४४ वे स्थळ ठरले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी तामिळनाडूच्या भेटीवर होते. अरियालूर जिल्ह्यातील गंगाईकोंडा चोलापूरम येथे मोदींचा रोड शो झाला. यावेळी रस्त्याच्या दुतर्फा हजारो नागरिकांनी गर्दी करीत पंतप्रधानांवर पुष्पवर्षाव केला.

**गुवाहाटी येथे गांजाचा साठा जप्त**

**गुवाहाटी:** वर्षभरात केलेल्या वेगवेगळ्या कारवायांमध्ये रेल्वे पोलिसांनी आतापर्यंत ३ कोटी ६७ लाख रुपये किंमतीच्या गांज्याचा साठा जप्त केला आहे. ३७०० किलो एवढा हा साठा आहे. आगरतळा, कटिहार, बागडोगरा, रंगपारा उत्तर आणि गुवाहाटी रेल्वे स्थानकांवरून हा साठा जप्त केला.

# थायलंड-कंबोडिया युद्धबंदीसाठी वाटाघाटी करण्यास सहमत

## डोनाल्ड ट्रम्प यांची माहिती, दोन्ही देशांच्या नेत्यांसोबत चर्चा

◆ **वॉशिंग्टन, २७ जुलै**

कंबोडियाचे पंतप्रधान हुन मानेट आणि थायलंडचे हंगामी पंतप्रधान फुम्थम वेचायचाइ यांच्यासोबत चर्चा झाली असून त्यांनी युद्धबंदीसाठी वाटाघाटी करण्यास सहमती दर्शविली असल्याची माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी त्यांच्या समाज माध्यम खात्यावरून दिली.

ट्रम्प यांनी म्हटले की, थायलंड आणि कंबोडिया तत्काळ युद्धबंदीसाठी वाटाघाटी करण्यास सहमत आहेत. दोन्ही देशांमध्ये तीन दिवस चाललेल्या प्राणघातक संघर्षात ५० पेक्षा अधिक लोक मारले गेले आणि १ लाख ३० हजारांहून अधिक लोक विस्थापित झाले. दोन्ही नेत्यांना इशारा दिला की, जर संघर्ष सुरूच राहिल्यास अमेरिका त्यांच्याविरोधात कठोर निर्णय घेईल. त्यांनी त्वरित युद्धबंदी आणि शांतता स्थापित करण्यासाठी सहमती दर्शविली. यानंतर कंबोडियाचे पंतप्रधान हुन मानेट यांनी सशस्त्र दलांमध्ये तत्काळ आणि बिनशर्त युद्धबंदीची इच्छा व्यक्त केली. मानेट म्हणाले की त्यांनी शनिवारी रात्री ट्रम्प यांच्याशी फोनवर सशस्त्र संघर्षांच्या मुद्यावर चर्चा केली. मी ट्रम्प यांना स्पष्टपणे सांगितले की कंबोडिया दोन्ही सशस्त्र दलांमधील तत्काळ आणि बिनशर्त युद्धबंदीच्या प्रस्तावाशी सहमत आहे. कंबोडियाचे उपपंतप्रधान, परराष्ट्र व्यवहार आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य मंत्री प्राक सोखोन यांना अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्याशी युद्धबंदी प्रस्तावावर चर्चा करण्याची जबाबदारी सोपवली आहे.

**सुरक्षा परिषदेचे तोडगा काढण्याचे आवाहन**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या आपत्कालीन बैठकीत सदस्य देशांनी दोन्ही देशांनी युद्ध थांबवून राजनैतिक तोडगा तोडगा काढण्याचे आवाहन केले. यावेळी कंबोडियाचे संयुक्त राष्ट्रांतील राजदूत म्हणाले, आम्हाला बिनशर्त युद्धबंदी हवी आहे. आमचा आक्रमकतेचा कोणताही हेतू नाही, आम्ही एक लहान देश आहोत, आमच्याकडे हवाई दलही नाही. दुसरीकडे थायलंडच्या राजदूतानेदेखील चर्चेसाठी तयार असल्याचे स्पष्ट केले होते. दरम्यान दोन्ही देशांच्या सीमेवर रविवारीदेखील चकमकी झडल्या. दोन्ही बाजूने गोळीबार सुरू असून अद्याप चर्चेस सुरुवात झालेली नाही. (वृत्तसंस्था)

# खाजगी रुग्णालये 'आयुष्मान भारत'पासून दूर का?

## शासनाकडून शुल्क उशिरा मिळत असल्याचे आयएमएचे उत्तर

◆ **नवी दिल्ली, २७ जुलै**

देशातील लोकांना आवश्यक ते उपचार सहज मिळावे यासाठी केंद्र सरकारने आयुष्मान भारत योजना आणली. मात्र, आजही देशातील बहुतांश खाजगी रुग्णालयात ही योजना अस्तित्वात नाही. किंबहुना ते ही योजना स्वीकारत नाहीत. यासंदर्भात आयएमएने आपले स्पष्टीकरण दिले आहे.

आयएमएचे म्हणणे आहे की, आयुष्मान योजनेंतर्गत देशातील ३१,४६६ रुग्णालये जोडलेली आहेत. त्यापैकी १४ हजार रुग्णालये खाजगी आहेत. मात्र, अजूनही देशातील बहुतांश खाजगी रुग्णालये या योजनेत सहभागी होऊ इच्छित नाहीत. कारण या योजनेंतर्गत मिळणारे शुल्क उशिराने प्राप्त होते आणि ते मिळविण्यासाठीची प्रक्रियाही फारच जटिल आहे. २०२१ ते २३ दरम्यानच्या काळात रुग्णालयांचे ३०० कोटी रुपये आजही देय आहेत. एकट्या केरळमध्ये रुग्णालयांचे ४०० कोटी आणि उर्वरित देशात १.२१ लाख कोटी रुपये येणे बाकी आहे. त्यासाठी रुग्णालयांना सरकार दरबारी खेटा घालाव्या लागतात. या प्रकारामुळे खाजगी रुग्णालये आयुष्मान भारत योजना लागू करण्यास इच्छूक नसतात. देय रक्कम मिळविण्याची प्रक्रिया अतिशय क्लिष्ट असल्याने रुग्णालय प्रशासन त्रासून जाते. त्यामुळे ते ही योजना लागू करत नाहीत. याचे सर्वात मोठे उदाहरण दिल्ली आहे. येथे एक हजाराहून अधिक खाजगी रुग्णालये आहेत पण, केवळ ६७ रुग्णालयेच आयुष्मान भारत योजनेचा भाग आहेत.

**४१ कोटी लोकांना दिले कार्ड**

आयुष्मान भारत योजना देशातील ४० टक्के लोकांना ५ लाखांपर्यंतचे उपचार मोफत देण्यास प्रतिबद्ध आहे. याद्वारे ५५ कोटी लोकांना फायदा होण्याचा अंदाज आहे. आतापर्यंत ४१ कोटी लोकांना आयुष्मान कार्ड देण्यात आले आहे. त्यातील सर्वाधिक ५.३३ कोटी कार्ड उत्तरप्रदेशात देण्यात आले असून त्यापाठोपाठ मध्यप्रदेश, बिहार आणि ओडिशा या राज्यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# पंतप्रधान मोदी जगात पुन्हा नंबर

◆ **नवी दिल्ली, २७ जुलै**

२०१४, २०१९ आणि २०२४च्या लोकसभा निवडणुकीतील विजयानंतर सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतलेले नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा जगातील सर्वाधिक लोकप्रिय लोकशाही नेत्यांमध्ये अव्वल स्थान पटकावले आहे.



'मॉर्निंग कन्सल्ट' या अमेरिकेतील नामांकित संशोधन संस्थेने या संदर्भातील सर्वेक्षण केले असून, त्यात तब्बल ७५ टक्के लोकांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर मोहोर उमटवली; तर १८ टक्के लोकांनी नरेंद्र मोदी यांच्या कार्यशैलीला विरोध केला आणि सात टक्के लोकांनी कोणतेही मत व्यक्त केले नाही.

पंतप्रधान मोदींनंतर दक्षिण कोरियाचे अध्यक्ष ली जे म्युंग आणि अर्जेंटिनाचे अध्यक्ष जेव्हिअर मिलेई अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानी आहेत. चौथ्या क्रमांकावर कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी असून ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान ऍन्थनी अल्बानिज पाचव्या क्रमांकावर आहेत. डोनाल्ड ट्रम्प आठव्या स्थानी आहेत. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी दहाव्या क्रमांकावर आहेत. (वृत्तसंस्था)



कर्नाटकात जोरदार पाऊस झाल्याने तुंगा नदीला मोठा पूर आला आहे. चिकमंगलूरजवळील शृंगेरी येथे नदी धोक्याच्या पातळीवरून वाहत असून पुरात मंदिर पूर्णपणे बुडाले आहे.

**चित्रपट वार्ता**

### चक्क आयटम साँग करणार अमृता सुभाष



**मुंबई** : 'परिणती-बदल स्वत:साठी' या चित्रपटातील पहिले गाणे नुकतेच प्रेक्षकांच्या भेटीला आले. दोन आत्मनिर्भर स्त्रियांच्या आयुष्याचा आणि त्यांच्या मैत्रीचा भावनिक प्रवास मांडणाऱ्या या चित्रपटाला स्त्रीप्रधान म्हणता येईल. सोनाली कुलकर्णी अ ाणि अमृता सुभाष यांच्या यात प्रमुख भूमिका आहेत. विशेष म्हणजे, यात अमृताने आयटम साँग केले आहे. वैशाली माडे आणि प्राजक्ता शुक्रे यांनी हे गीत गायले असून संगीतकार समीर साप्तीस्कर यांनी गीताला जबरदस्त चाल लावली आहे. अभिनयाच्या बाबतीत सरस असणाऱ्या दोन अभिनेत्री नृत्यातही आपली जादू दाखवणार आहेत. सोनाली कुलकर्णी तर नृत्यांत झळकली आहेच, पण अमृताने आयटम साँग करणे, ही तिच्याबाबतीत धाडसाची बाब असल्याचे म्हटले जात आहे. कारण ती गंभीर आणि आशयगर्भ भूमिकांसाठी ओळखली जाते.

### ऋतुजा बागवेने सुरू केले रेस्टॉरंट



**मुंबई** : आजकाल अनेक कलाकार चित्रपटांसोबतच अन्य व्यवसायातही नशीब अजमावताना दिसत आहेत. पुढील काळासाठी अर्थार्जनाची ती सोय म्हणूनही त्याकडे पाहिले जात आहे. यात एका मराठी अभिनेत्रीचीही भर पडली आहे. अभिनेत्री ऋतुजा बागवे हिने स्वत:चे रेस्टॉरंट नुकतेच सुरू केले आहे. तिने अंधेरीमध्ये 'फूडचं पाऊल' नावाने रेस्टॉरंट सुरू केले आहे. सुबोध भावेच्या हस्ते याचे उद्घाटन रविवारी पार पडले. येथे शाकाहारी आणि मांसाहारी असे दोन्ही पद्धतीचे जेवण मिळणार आहे. ऋतुजाने तिच्या बहिणीसोबत हे रेस्टॉरंट सुरू केले आहे.

### विजय देवरकोंडाच्या 'साम्राज्य'चा ट्रेलर प्रदर्शित



**हैदराबाद** : दक्षिणेतील अभिनेता विजय देवरकोंडाच्या आगामी 'किंगडम' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाचे नाव आता 'साम्राज्य' असे ठेवण्यात आले आहे. ही एका गुप्तहेराची कथा आहे, ज्याला त्याच्या कामासाठी त्याचे गाव, घर, आई सोडावी लागते. यात विजय मुख्य भूमिकेत असून ट्रेलरवरून हा चित्रपट ॲक्शनपट असल्याचे दिसून येत आहे. आधी दाक्षिणात्य भाषेत आणि आता हिंदीत हा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. येत्या ३१ जुलैला हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. विशेष म्हणजे, यात भाग्यश्री बोरसे ही मराठमोळी अभिनेत्रीही दिसणार आहे.

# आता भारताची स्वत:ची युद्धनीती

## ● शत्रूला मिळणार नव्या धोरणांतर्गत प्रत्यूत्तर ● अणुयुद्धांच्या धमक्यांना घाबरणार नाही

◆ **नवी दिल्ली, २७ जुलै**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने दहशतवादाविरोधात आक्रमक धोरण स्वीकारले आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये सीमेपलीकडे जाऊन दहशतवादी तळांना ध्वस्त करणे याचाच एक भाग होता. या दरम्यान भारताने आणखी कठोर पावले उचलली असून आता दहशतवादाच्या निपटाऱ्यासाठी भारत 'नवे युद्ध धोरण' स्वीकारण्याची योजना तयार करत आहे.

या नव्या धोरणाचे संकेत भारताने ऑपरेशन सिंदूरच्याच वेळी दिले होते, ज्या अंतर्गत भारतात होणारा कोणताही दहशतवादी हल्ला 'ॲक्ट ऑफ वॉर' म्हणजे देशाविरोधातील युद्ध मानले जाईल. चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ यांच्या नेतृत्वात नव्या योजनांना मूर्त रूप दिले जात आहे. हे नवे धोरण पद्धतशीरपणे लागू केले जाईल.





नव्या धोरणांतर्गत सामरिक संयमाला टाळून दक्षतेच्या कारवाईला प्राधान्य दिले जाणार आहे. म्हणजेच हल्ल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा आधीच कठोर पावले उचलली जातील, जेणेकरून दहशतवादी हल्ल्यांना निकामी केले जाऊ शकेल. यात प्रोॲक्टिव्ह डेटेरेंस, प्रिॲक्टिव्ह स्ट्राईक्स आणि प्रिवेंटिव्ह कारवाई अशा मुद्यांचा समावेश आहे.

वारंवार होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यानंतरही भारताकडून आतापर्यंत ठोस प्रत्युत्तर दिले जात नव्हते. केवळ राजनैतिक पातळीवर निषेध करण्यापलीकडे फारसे काही होत नव्हते. पण, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भाजप सरकारने उरी आणि बालाकोट हल्ले आणि पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर अंतर्गत थेट पाकिस्तानात घुसण्याचे धाडस केले. यामुळे पाकिस्तानला आता नवा हल्ला घडविण्यापूर्वी अनेकवेळा विचार करावा लागणार आहे. (वृत्तसंस्था)

**काय आहे नवे युद्ध धोरण....**

- 'फ्यूचर वॉरफेअर ॲनालिसिस ग्रुप' युद्धाची पद्धत समजून घेईल आणि यानुसार योजना तयार करेल.
- नवी प्रशिक्षण यंत्रणा, लष्कराचे आधुनिकीकरण आणि ऑपरेशनल योजनेची आखणी
- दहशतवादी हल्ल्यांचे उत्तर भारत स्वत:च्या अटींवर देईल. म्हणजे आपल्या हल्ल्याचा दिवस, तारीख, वेळ आणि ठिकाण लष्कर स्वत: निवडणार
- दहशतवाद्यांना आश्रय देणारे सरकार हल्ल्यासाठी उत्तरदायी राहील. दहशतवाद आणि त्यांना आश्रय देणाऱ्यात कोणताही भेद मानला जाणार नाही
- पाकिस्तानच्या अणुबॉम्बच्या धमकीला भारत भीक घालणार नाही. अणुसंयम बाळगण्यासोबतच सर्व प्रकारचे पर्याय वापरण्यास भारत मोकळा असणार आहे.

# स्वयंपाकावरून टोमणे मारणे क्रूरता नव्हे

## मुंबई उच्च न्यायालयाचा निवाडा

### २७ वर्षे जुन्या खटल्यात नवऱ्याला दिलासा

◆ **मुंबई, २७ जुलै**

मुंबई उच्च न्यायालयाने २७ वर्षे जुन्या खटल्यात एका नवऱ्याला दिलासा दिला. न्यायालयाने त्याला मुक्त करत कोणत्याही महिलेचे रंग, रूप आणि स्वयंपाक न करण्यावरून टोमणे मारण्याला क्रूरता संबोधता येणार नाही, असे स्पष्ट केले.

न्या. श्रीराम मोडक यांच्या खंडपीठाने म्हटले की, नवऱ्याने आपल्या पत्नीच्या रंगावरून आणि सासऱ्यांनी तिच्या स्वयंपाकाच्या पद्धतीवरून काही म्हणणे ही छळवणुकीच्या कक्षेतील बाब मानताही येईल. पण, हा इतका गंभीर प्रकार नाही ज्यासाठी त्यांना गुन्हेगारी कक्षेत आणावे लागेल.



**काय आहे प्रकरण?**

महाराष्ट्रातील सातारा येथे राहणाऱ्या सदाशिवला पत्नी प्रेमा हिला आत्महत्येसाठी प्रवृत्त करणे आणि क्रूरतेच्या प्रकरणात शिक्षा मिळाली होती. सत्र न्यायालयाने १९९८ मध्ये बायकोच्या मृत्यूनंतर त्याला दोषी ठरवण्यात आले. त्यानंतर सदाशिवने हायकोर्टात याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी करताना न्यायालयाने त्याला निर्दोष मानत तयाची सुटका केली. पत्नी प्रेमा हिने लग्नानंतर पाच वर्षांनी विहिरीत उडी घेत जीव दिला. तिने मृत्यूपूर्वी नातेवाईकांना सांगितले होते की, माझा नवरा मला रंगावरून टोमणे मारतो आणि दुसरे लग्न करण्याची धमकी देतो. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# अखेर मालदीवला झाली उपरती

मालदीवला अडीच हजार वर्षांचा समृद्ध इतिहास लाभला आहे. कधीकाळी बौद्ध आणि हिंदू धर्मीयांचे प्राबल्य असलेला इवलासा मालदीव आता मुस्लिमबहुल देश आहे. व्यापार आणि धर्मप्रसारासाठी जगभर आपली गलबते आणि मोठी जहाजे घेऊन फिरणारे अरब व्यापारी मालदीवमध्ये मुक्कामाला असत. हिंदी महासागरात वसलेल्या या बेटावर पाचव्या शतकापासून मानवाने वस्ती करायला प्रारंभ केला. श्रीलंका आणि दक्षिण भारतातील नागरिक मोठ्या संख्येने येथे येऊन वसले. श्रीलंकन नागरिकांची संख्या असल्याने बौद्ध धर्मीयांची संख्या बहुसंख्य होती. मालदीवमध्ये १४०० वर्षे बौद्ध नांदत होते. त्याच्यासोबत हिंदू असलेले तमिळही सुखात होते. पण, संयमी, मवाळ आणि सर्वांना सामावून घेणाऱ्या जमाती दिसल्या की प्रलोभने दाखवीत अथवा बलपूर्वक त्यांची संस्कृती नष्ट करण्याचा कुटिल खेळ अरबांनी सुरू केला होता. त्याला मालदीवमधील बौद्धही बळी पडले. आठव्या शतकात जे सिंधमध्ये घडले ते मालदीवमध्येही दिसून आले. बाराव्या शतकात मालदीवला पूर्णपणे इस्लाममध्ये परिवर्तित करण्यात आले. शेवटचा बौद्ध शासक धोवेमी यांनी ११५३ मध्ये इस्लाम स्वीकारला आणि स्वतःला सुल्तान मोहम्मद अल-अदिल म्हणून घोषित केले. तेव्हापासून येथे सुल्तान राज्य करू लागले. या देशात विविध प्रकारचे शंख मोठ्या प्रमाणात आढळतात. बहुमूल्य शंखांचा उपयोग चलन म्हणूनही केला जात असे. पंधरा वर्षे पोर्तुगीजांनीही येथे राज्य करून पाहिले पण त्यांना लवकरच हाकलण्यात आले. जवळच असलेला सिलोन अर्थात श्रीलंका डचांच्या ताब्यात होता. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात श्रीलंका ब्रिटिशांच्या ताब्यात आल्यानंतर मालदीवही ब्रिटिशांचाच अंकित बनला. १९६५ पर्यंत मालदीव ब्रिटिशांचा गुलाम होता. २६ जुलै १९६५ रोजी मालदीव स्वतंत्र होऊन इब्राहिम नासीर सुल्तान झाले. पण सुखाने नांदतील ते सुल्तान कसले? मोहम्मद फरीद दीदी यांनी सत्ता हाती घेऊन स्वतःला राजा म्हणून घोषित केले. तीन वर्षे गोंधळ माजल्यानंतर १९६८ मध्ये दीदीची हकालपट्टी करण्यात आली आणि सोबतच मालदीवच्या जनतेने राजेशाहीला लाथ मारून नोव्हेंबर १९६८ मध्ये प्रजासत्ताक मालदीव म्हणून घोषित केले. मौमून अब्दुल गयूम हे मालदीवचे सर्वाधिक लोकप्रिय अध्यक्ष होते. ते सहावेळा अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. गयूम यांच्याविरोधात नोव्हेंबर १९८८ मध्ये मोठा उठाव झाला होता. तेव्हा भारताने सैन्याची मदत पाठवून उठाव मोडून काढला होता. मुस्लिम देशांमध्ये लष्करी उठाव, मार्शल लॉ लागू करणे, सत्तेसाठी सत्ताधारी अथवा विरोधकांच्या हत्या घडविणे सामान्य गोष्टी असतात. आपले शेजारी अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश या देशांची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. २०२३ मध्ये झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पीपल्स नॅशनल काँग्रेसचे उमेदवार मोहम्मद मुईझ्झू विजयी झाले. सत्तेवर येताच त्यांनी भारताविरोधात पावले उचलायला प्रारंभ केला. त्यांचा ओढा चीनकडे जास्त होता. अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर मुईझ्झू प्रथम तुर्की आणि चीनच्या दौऱ्यावर गेले होते. एरवी निवडणुकीत विजयी झाल्यानंतर यापूर्वीच्या अध्यक्षांनी जवळचा सहकारी म्हणून भारताला भेट दिली होती. चीनच्या सहकार्याने मुईझ्झू यांनी भारताला कोंडीत पकडण्याचे प्रयत्न चालविले होते. निवडणुकीच्या काळातच प्रचारसभांमध्ये 'इंडिया गो आऊट'चा नारा देत ते सत्तेवर आले होते.

भारतीयांचा प्रभाव कमी करण्यासाठी आणि मालदीवमध्ये तैनात असलेले ८० भारतीय सैनिकांना परत बोलवावे यासाठी मुईझ्झू भारताला धमक्या देत होते. खरे तर त्यांना दीर्घकालीन चालत आलेली परिस्थिती पूर्णपणे बदलवून चीनच्या जवळ जायचे होते. एक स्वतंत्र आणि सार्वभौम देश म्हणून कुणाशी मैत्री करायची हा त्यांचा प्रश्न होता. पण, मालदीव सरकारमधील तीन उपमंत्र्यांनी काहीही कारण नसताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर वैयक्तिक पातळीवर टीका केली. मंत्र्यांच्या या वादग्रस्त वक्तव्यांमुळे भारतीयांमध्ये संतापाची लाट उसळली. बॉयकॉट मालदीवचा ट्रेंड सोशल मीडियावर फिरू लागला. पंतप्रधान मोदी यांनी टीकेला प्रत्युत्तर न देता लक्षद्वीपच्या समुद्र किनाऱ्यावर जात भारतीयांनी या बेटाला भेट द्यावी, असे आवाहन आपल्या कृतीतून केले. भारतीयांना मोदींनी दिलेला संदेश कळला आणि मग काय पर्यटकांनी मालदीवऐवजी लक्षद्वीपकडे मोर्चा वळविला. आम्ही लहान असू पण तुम्हाला आमच्यावर दादागिरी करण्याचा परवाना मिळाला नसल्याचे वक्तव्य अध्यक्ष मुईझ्झू यांनी करीत आगीत तेल ओतले. मालदीवमधील पर्यटन व्यावसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली. भारतीय पर्यटकांनी पाठ फिरविल्याने समुद्र किनारे ओस पडू लागली. हॉटेल्सची बुकिंग धडाधड रद्द होऊ लागली. भारतीय सरकारने काहीही प्रतिक्रिया दिली नव्हती पण जनतेच्या बहिष्कारामुळे आपण फार मोठी चूक केली हे मुईझ्झू यांच्या लक्षात आले. मोदींवर टीका करणाऱ्या तिन्ही उपमंत्र्यांची हकालपट्टी करण्यात आली. पण, बाण सुटला होता. मोईझ्झू नरमले असले तरी त्यांच्या मनातील भारतद्वेष सर्वांना दिसून आला. पुढे जे होईल ते केवळ व्यावहारिक पातळीवर होईल, त्यात पूर्वीसारखी आपुलकी, मित्रत्वाचे भाव नसतील याची जाणीव मोईझ्झू यांना भारताच्या प्रतिसादातून झाली. ज्या देशाने कधी कुणाची एक इंचही जमीन बळकावली नाही, जो शेजाऱ्यांना सातत्याने सर्वप्रकारचे सहकार्य करतो त्या भारतासोबत चीन, तुर्की, पाकिस्तान या देशांच्या प्रभावात येऊन संबंधात वितुष्ट आणणे म्हणजे चालत्या गाडीच्या चाकातील खिळा काढण्यासारखे होते. मालदीवची अर्थव्यवस्था पूर्णपणे पर्यटनावर अवलंबून आहे आणि या इस्लामिक देशाला भेट देणारे आणि त्यांच्या आर्थिक उत्पन्नात भर टाकणारे सर्वाधिक पर्यटक हे भारतीय असतात. भारताला डिवचल्याचा परिणाम असा झाला की अवघ्या पंधरा-वीस दिवसांमध्येच मालदीवला १५ कोटी रुपयांचा फटका बसला. जेमतेम पाच लाख लोकसंख्या असलेल्या या देशासाठी १५ कोटी रुपये म्हणजे फार मोठी रक्कम आहे. मालदीवचे सरकार आणि जनतेची अक्कल थोड्याच दिवसांत ताळ्यावर आली. भारताने मदत करणे थांबविल्यास देश दिवाळखोरीत निघाल्याशिवाय राहणार नाही आणि अशा संकटसमयी ना तुर्की, पाकिस्तान मदतीला येईल ना चीन याची जाणीव मुईझ्झू यांना झाली. त्यांनी भारताशी संबंध सुधारण्यास प्राधान्य दिले. मोदी सरकारनेही मनाचा मोठेपणा दाखविला. २०२४ मध्ये नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान झाल्यावर मुईझ्झू शपथग्रहण समारंभाला दिल्लीला आले होते. ऑक्टोबर २०२४ मध्ये अधिकृतपणे भारताच्या दौऱ्यावर आले होते. भारत हटावचा नारा देणारे मुईझ्झू यांचे धोरण आणि वागण्यातील व्यावहारिक बदल त्यांच्यासाठी अपरिहार्य असल्याची जाणीव भारतालाही आहेच. नेबरहूड फर्स्ट या धोरणाचा मालदीव हा भाग आहे. शेजारी आमच्यासाठी प्राधान्यस्थानी असल्याची भूमिका भारताने स्वीकारलेली आहे. २०२४ मध्ये 'इंडिया आऊट' म्हणणारे मुईझ्झू यांनी 'वेलकम इंडिया' ही मोहीम सुरू केली आहे. जास्तीत जास्त भारतीय पर्यटकांनी मालदीवला भेट द्यावी हे या मोहिमेमागील उद्दिष्ट आहे. इंग्लंडसोबत ऐतिहासिक व्यापार करार झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी २६ जुलैला मालदीवच्या दोन दिवसीय दौऱ्यावर दाखल झाले. मालदीवचा विकास व्हावा आणि त्याच्या क्षमता वाढविण्यासाठी भारत नेहमीच सहकार्य करण्यास तयार असल्याचे पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले. मालदीवच्या स्वातंत्र्यदिनाचे प्रमुख पाहुणे म्हणजे मोदी यांची उपस्थिती होती. भारताकडून आर्थिक मदत मिळावी, अशी मुईझ्झू यांची आशा पंतप्रधान मोदींनी पूर्ण केली. मालदीवला ४८५० कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा याप्रसंगी मोदींनी केली. केवळ आपले शेजारीच नव्हे तर जगातील प्रत्येक देशासोबत मैत्रीचे संबंध ठेवण्याला भारत प्राधान्य देतो. दुर्दैवाने भारतासारख्या विशाल हृदय असलेल्या देशासोबत मैत्रीऐवजी फटकून आणि शत्रुत्वाने वागणारे पाकिस्तान, चीन, बांगलादेश, नेपाळसारख्या देशांचा शेजार आपल्याला लाभला आहे. मालदीवने कुरापती काढूनही त्याला मोठ्या मनाने सहकार्य करण्याचे आणि शेजारी देश म्हणून बरोबरीने वागविण्याचे औदार्य भारताने दाखविले आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# उपराष्ट्रपतींचा राजीनामा!

क्रिकेट कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी खुद्द पंचानींच निवृत्तीची घोषणा करावी तसा काहीसा प्रसंग संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी घडला. उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे अध्यक्षही असतात. अधिवेशन सुरू झाल्यावर त्यांनी पहिल्या दिवशी संपूर्ण कामकाजात भाग घेतला, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकी बोलविल्या. दुसऱ्या दिवशीच्या कामकाजाचे नियोजन केले आणि रात्री वैद्यकीय कारणांसाठी आपण उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा देत असल्याचे घोषित केले. त्यांचा राजीनामा स्वीकारण्यात आला असून, लवकरच निवडणूक आयोग उपराष्ट्रपतिपदासाठी निवडणुकीची घोषणा करतील.

राष्ट्रपतींच्या निवडणुकीत सर्व राज्य विधानसभांचे आमदार मतदान करीत असतात. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत फक्त संसदेच्या दोन्ही सभागृहांचे खासदार मतदान करीत असल्याने भाजप नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा उमेदवार निवडून येण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

संसदेच्या दोन्ही सभागृहांत सरकारजवळ बहुमत असल्याचे या निवडणुकीत काही चुरस असेल असेही मानले जात नाही. निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केल्यावर सत्ताधारी पक्ष आपल्या उमेदवाराचे नाव घोषित करेल असे समजते.

**राजीनाम्याचे कारण** : जगदीप धनकड यांचा दोन वर्षांचा कार्यकाळ बाकी असताना त्यांनी राजीनामा का दिला याबाबत राजधानीत उलटसुलट चर्चा सुरू असली तरी त्यांनी स्वतः सांगितलेले कारण खरे मानले पाहिजे. मागील काही काळात त्यांची प्रकृती जरा नाजूक झाली होती. त्यांनी वैद्यकीय सल्ला स्वीकारीत पायउतार होण्याचा निर्णय घेतला असे दिसते.

**एक चकमक** : राष्ट्रपती-उपराष्ट्रपती यांच्यात मतभेद होण्याच्या घटना तशा नव्या नाहीत. डॉ. शंकरदयाल शर्मा उपराष्ट्रपती असताना त्यांची राजीव गांधी सरकारशी चकमक झडली होती. विषय होता बोफोर्सचा. प्रश्नोत्तराचा तास सुरू झाला होता. सरकारच्या उत्तराने प्रश्न विचारणाऱ्या विरोधी खासदाराचे समाधान होत नव्हते. डॉ. शर्मा यांनी त्यात हस्तक्षेप करीत तत्कालीन मंत्री पी. चिदंबरम् यांना नेमके उत्तर देण्यास सांगितले. याने चिदंबरम् चिडले. यातच डॉ. शर्मा आणि पी. चिंदबरम् यांच्यात शाब्दिक चकमक झडली. या चकमकीने दुखावलेले डॉ. शर्मा आपल्या निवासस्थानी निघून गेले. शेवटी त्यांची मनधरणी करण्यात आली. चिदंबरम् यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची माफी मागितल्यानंतर डॉ. शर्मा राज्यसभेत परतण्यास राजी झाले आणि डॉ. शर्मा यांच्या राजीनाम्याचा प्रसंग थोडक्यात टळला.

**झैलसिंग-राजीव संघर्ष** : माजी राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग व तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्यातील संघर्ष जगजाहीर झाला होता. झैलसिंग यांनी तर राजीव गांधी यांना बरखास्त करून वसंतदादा पाटील यांना पंतप्रधान करण्याची पूर्ण तयारी केली होती. राष्ट्रपतींना पंतप्रधानांना बरखास्त करण्याचा अधिकार आहे ही एकच बाब झैलसिंग यांच्या डोक्यात 'फिट' बसली होती. पण, हा अधिकार कोणत्या परिस्थितीत वापरला जाऊ शकतो याची त्यांना जराही कल्पना नव्हती. काही नेत्यांनी त्यांना याची जाणीव करून दिल्यानंतर झैलसिंग यांनी राजीव गांधी यांना पंतप्रधानपदावरून बरखास्त करण्याचा विषय सोडून दिला. मात्र, दोन्ही नेत्यांमधील संबंध कायम तणावाचे राहिले.

**डॉ. राजेंद्रप्रसाद-पं. नेहरू** : प्रथम राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद व प्रथम पंतप्रधान पं. नेहरू यांच्यात हिंदू कोड बिल व सोमनाथ मंदिर जीर्णोद्धार या दोन मुद्द्यांवर जबरदस्त मतभेद निर्माण झाले होते. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी सोमनाथ मंदिर जीर्णोद्धाराच्या कार्यक्रमास जाऊ नये असे नेहरू यांनी त्यांना पत्र पाठवून सुचविले होते. पण, राजेंद्रबाबूंनी पंतप्रधानांची विनंती फेटाळून सोमनाथला जाण्याचा निर्णय घेतला. त्या कार्यक्रमात त्यांनी भाषण केले आणि आकाशवाणीने देशाच्या राष्ट्रपतींचे भाषण ऐकविलेच नाही. नंतर मात्र आकाशवाणीने आपली चूक सुधारली होती.

**जत्ती विरुद्ध मोरारजी** : १९७७ मध्ये सत्तेवर आलेल्या जनता सरकारच्या प्रारंभीच तत्कालीन उपराष्ट्रपती बी. डी. जत्ती विरुद्ध मोरारजी देसाई सरकार असा संघर्ष तयार झाला होता. तत्कालीन राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांचे निधन झाल्याने जत्ती कार्यवाहक राष्ट्रपती होते. मोरारजी सरकारने सात राज्यांच्या विधानसभा बरखास्त करण्याचा निर्णय घेतला व तो मंजुरीसाठी जत्ती यांच्याकडे पाठविला. जत्ती त्या दस्तावेजावर सही करण्यास नकार देत होते. मात्र, जनमताचा रेटा वाढताच जत्ती यांनी माघार घेतली आणि तो संघर्ष टळला.

राष्ट्रपती-उपराष्ट्रपती व सरकार यांच्यात काही प्रसंगी मतभेद निर्माण होणे ही काही नवी बाब नाही. मात्र या प्रसंगात तसे मतभेद झाले असल्याचे सध्या तरी दिसत नाही. धनकड यांची प्रकृती वारंवार ढासळत असल्याचे स्पष्टपणे दिसत होते. त्यांचा राजीनामा हा त्याचाच परिणाम असावा.

**सिंदूरवर चर्चा** : ऑपरेशन सिंदूरवर होणारी चर्चा एका वेगळ्याच कारणाने रखडली. या चर्चेला पंतप्रधानांनी उत्तर द्यावे अशी विरोधी पक्षांची मागणी होती तर यावर सरंक्षणमंत्री उत्तर देतील अशी सत्ताधारी पक्षाची भूमिका होती. ऑपरेशन सिंदूरवर देशाच्या संसदेत तातडीने चर्चा होणे आवश्यक होते. या चर्चेने साऱ्या बाबी देशासमोर आणल्या असत्या. अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प हे दररोज नवे नवे दावे करीत आहेत, त्याला एकप्रकारे पूर्णविराम मिळाला असता. ट्रम्प प्रशासनाने त्यांच्या पहिल्या सहा महिन्यांच्या कार्यकाळाचा जो आढावा सादर केला आहे त्यात भारत- पाकिस्तान युद्ध रोखण्यात ट्रम्प यांनी बजावलेल्या कामगिरीचा ठळक उल्लेख करण्यात आला आहे. राष्ट्रपती ट्रम्प दररोज या युद्धाबाबत नव नवी माहिती समोर आणीत आहेत. भारत-पाक युद्धात परस्परांची विमाने पाडली जात होती. त्यांची संख्या पाच होती असे सांगत असताना त्यांनी ही विमाने कुणाची होती हे मात्र सांगितलेले नाही. भारत-पाकिस्तान आण्विक युद्धाच्या अगदी जवळ पोहोचले होते असाही दावा ट्रम्प यांनी केला आहे.

या साऱ्यावर पूर्णविराम दिला जाण्याची गरज आहे आणि यासाठी संसदेपेक्षा अधिक चांगले व्यासपीठ असू शकत नाही. वास्तविक भारत-पाक चकमकीनंतर सरकारने संसदेचे एक लहान विशेष अधिवेशन बोलावून ऑपरेशन सिंदूरची माहिती संसदेत ठेवली असती तर कदाचित राष्ट्रपती ट्रम्प यांना रोज नव नवे दावे करण्याची संधीच मिळाली नसती. पण, ट्रम्प असे काही करू शकतात याचा अंदाज सरकारला आला नसावा.

**संसद ठप्प** : दरम्यान, संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा पहिला आठवडा कामकाज ठप्प होण्यात गेला. विरोधी पक्षांनी बिहारमधील मतदारयाद्यांचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्ष हा मुद्दा सोडण्याची चिन्हे सध्या तरी नाहीत. त्यामुळे ऑपरेशन सिंदूर व एक न्यायाधीश न्या. वर्मा यांच्या सरकारी निवासस्थानी काही कोटी रुपये सापडल्याचे प्रकरण संसदेत चर्चेस येऊ शकेल वा नाही यावरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, ब्रिटन व मालदीव या दोन देशांच्या दौऱ्यावरून आता परतले असल्याने, त्यांच्या पुढाकाराने सत्तापक्ष व विरोधी पक्ष यांच्यात काही तरी समझोता होईल व संसदेतील गतिरोध दूर होईल अशी आशा करूया.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# भारतीय अध्यात्म आणि विज्ञान

स्वामी विवेकानंदांनी आधुनिक भारताची संकल्पना मांडून देशवासीयांमध्ये नवी चेतना जागविली. विवेकानंदांचे अध्यात्म विज्ञानाशी एकरूप झालेले होते. शिकागोच्या धर्मपरिषदेत त्यांनी हिंदू धर्माला ग्लानी आल्याचे कबूल करतानाच कणखर आणि आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पेरले. आज स्वामी विवेकानंदांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आधुनिक भारतावर आणि प्रामुख्याने तरुणाईवर येऊन पडली आहे. या दिशेने भारत अग्रेसरसुद्धा झाला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वामी विवेकानंदांच्या विज्ञानवादाचा आयुष्यभर पुरस्कार केला. भारतीय अध्यात्म आणि विज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. 'अध्यात्म म्हणजे 'स्व'चा शोध तर विज्ञान म्हणजे सत्याचा शोध घेणे होय.' आणि या दोन्ही बाबी एकमेकांना पूरक आहेत. भारतीयांच्या प्रत्येक परंपरा आणि चालीरीतींच्या मुळाशी विज्ञानच आहे आणि हे अनेकदा सिद्धसुद्धा झालेले आहे. अध्यात्माने सूक्ष्म जगाची कल्पना मांडली आहे. आणि या सूक्ष्म जगाचा शोध घेणे हाच विज्ञानाचा मूळ हेतू आहे. वेद, पुराणे आणि इतर धार्मिक ग्रंथांमध्येसुद्धा विज्ञानाची महती सांगितली आहे. रामदास स्वामी यांच्या दासबोधातातही याबाबत अनेक वचने आली आहेत. संत कबीर, संत तुकाराम यांच्या ईश्वरवादातही अध्यात्महसोबतच विज्ञानही दडलेले आहे. मात्र, आपण केवळ त्यांच्या ओव्यांचा वरवर विचार करतो. त्यातील सत्य उलगडण्याचा प्रयत्न पाहिजे त्या प्रमाणात होत नाही! हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख धर्मासारख्या विविध भारतीय आध्यात्मिक परंपरांमध्ये आत्मज्ञान आणि मुक्तीसाठी वेगवेगळे मार्ग सांगितले आहेत. परंतु, या सर्वांचा मूळ उद्देश एकच आहे. अर्थातच भौतिक जगाची कवाडे भेदून मोक्ष प्राप्त करणे हेच अंतिम उद्दिष्ट अध्यात्माने मनुष्य जीवनाचे मानले आहे.

प्राचीन भारताने खगोलशास्त्र, गणित, आयुर्वेद आणि धातुशास्त्र आदी क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात प्रगती साधली होती. परंतु, नंतर खुळचट समजुती चिकटल्या आणि मूळ हेतू बाजूला पडून देशाची कधीही भरून न निघणारी हानी झाली. परंतु, आता आधुनिक भारताने इतिहासातील चुकांमधून धडा घेतला आहे आणि अध्यात्माबरोबरच विज्ञानातही यशोशिखर गाठले आहे. विज्ञान बाह्य जगाचा अभ्यास करते तर अध्यात्म आंतरिक जगाचा, असाही एक समज आहे. याच आधारावर विनोबा भावे यांनी अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालून 'सर्वोदय' ही संकल्पना मांडली. या संकल्पनेचा मूळ उद्देश नैतिक मूल्यांवर आधारित समाजनिर्मिती हा होता. काही विचारवंत विज्ञानाला वस्तुनिष्ठ आणि अध्यात्माला व्यक्तिनिष्ठ मानतात. हे खरे असले तरी या दोन्हींचा मूळ उद्देश एकच आहे. अशाही परिस्थितीत अध्यात्म विज्ञानापेक्षा श्रेष्ठ ठरते कारण अध्यात्मात संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची कामना केली जाते. संत ज्ञानेश्वर माउलीने विधात्यापुढे जे पसायदान मागितले त्यात संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची मागणी केलेली आहे. एकूणच अध्यात्म ही भारतीयांनी जगाला दिलेली सर्वांत मोठी देणगी होय. भौतिकवादी नागरिक नेहमी विज्ञानाला सर्वश्रेष्ठ मानतात. ज्या गोष्टी विज्ञानाच्या चौकटीत बसत नाही अशा गोष्टी मग या लोकांना चुकीच्या वाटू लागतात. जिथे मनुष्याची कल्पना शक्ती संपते तिथूनच खऱ्या अर्थाने भारतीय अध्यात्म सुरू होते. विज्ञान ही बाब प्राकृत आहे. तर अध्यात्म प्रकृतीच्याही पल्याड जाऊन प्राप्त होणारी अवस्था आहे! विज्ञानात ज्या बाबी बसत नाही आणि तरीही त्या घडल्या तर मग त्याला चमत्काराचे नाव दिले जाते. वास्तविक त्यामागेसुद्धा विज्ञानच असते. फक्त ते मनुष्याच्या आकलनापलीकडील असते आणि त्यामुळेच त्याला चमत्कार म्हटले जाते. या सर्व बाबींचे निराकरण अध्यात्माद्वारेच होऊ शकते. भारतीय अध्यात्माने सूक्ष्म देहाची संकल्पना मांडलेली आहे. मात्र, विज्ञानात ही बाब अद्याप सिद्ध झालेली नाही. किंबहुना मनुष्याने ती स्थिती अद्याप तरी प्राप्त केलेली नाही. परंतु, केवळ एवढ्याच सबबीवर सूक्ष्म देहाची कल्पना नाकारणे हा मूर्खपणा ठरेल. कारण, जगात कुठलीही बाब विनाकारण अस्तित्वात येत नाही. त्यामागे नक्कीच कोणती तरी शक्ती असते.

डोळ्यांनी दिसते तेवढेच सत्य नसते. जे डोळ्यांनी दिसत नाही तेच अंतिम सत्य असते आणि नेमका याचाच शोध अध्यात्माद्वारे घेतला जातो. दिसते ते क्षणभंगुर असते आणि जे दिसत नाही तेच अविनाशी आणि सर्वशक्तिमान असते, ही बाब विज्ञानालाही मान्य आहे. आज मनुष्य भौतिकवादात अडकून पडलेला आहे. परंतु, बऱ्याच पुढारलेल्या देशांमधील नागरिकांना भारताचा अध्यात्मवाद भुरळ घालत आहे. त्यामुळेच ते भारतात येऊन भारतीय परंपरा, चालीरीती आणि संस्कृतीचा अभ्यास करीत आहेत.

९८८१७१६०२७

## कानोसा


अमोल पुसदकर

# आर्थिक समृद्धीचा मार्ग

"यावत जीवेत सुखम जीवेत, ऋणम् कृत्वा घृतं पिबेत, भस्मिभूतस्य शरीरस्य, पुनरागमनं कुतः" असे विचार नास्तिकवादी ऋषी चार्वाक यांनी व्यक्त केलेले होते. परंतु भारतीय माणसाने या विचारांवर कधीही श्रद्धा ठेवली नाही. आम्हाला कोणाचा एक रुपया जास्तीचा नको आणि कोणाची आमच्यावर उधारी सुद्धा राहायला नको असे म्हणणारे लोक होते. मी कोणाची उधारी घेऊन मरणार नाही अशा पद्धतीचा बाणा अनेक लोकांचा होता. परंतु भारतीय रिझर्व्ह बँकेने सादर केलेल्या आकडेवारीवरून असे लक्षात येत आहे की भारतीयांचे बचतीचे प्रमाण घटलेले आहे. भारतीय माणसाचा ओढा हा कर्ज घेऊन जीवनाला आवश्यक गोष्टींची पूर्तता करण्यामागे तसेच चैनीच्या वस्तू खरेदी करण्यामागे दिसून येत आहे.

**पूर्वी लोक त्याच गोष्टी खरेदी करायचे ज्यांची त्यांना आवश्यकता होती, परंतु आता शेजाऱ्याने घेतले आहे, नातेवाईकांनी घेतले आहे म्हणून मी पण घेतले पाहिजे अशा पद्धतीची विचारसरणी अनेकांची दिसून येते. त्यामुळे अनेक गोष्टींचा संग्रह वाढलेला आहे. त्यांची पूर्तता करण्यासाठी कर्ज घ्यावे लागत आहे. कर्ज घ्यायचे नसेल तर क्रेडिट कार्ड हा सुद्धा एक पर्याय लोकांजवळ उपलब्ध आहे. त्यामुळे क्रेडिट कार्डवर वस्तू खरेदी करणे आणि त्याचे पैसे भरत राहणे असे सुद्धा प्रकार सर्वत्र दिसून येतात. यावरून 'उद्या कोणी पाहिलेला आहे' अशा पद्धतीची भावना सुद्धा लोकांची दिसून येते. ज्यांच्या घरची कार महिन्यातून एकदाच बाहेर निघते त्यांनी पण सामाजिक संकेत म्हणून ती विकत घेतली आहे. घरातील अनेक वस्तू अशा आहेत की ज्यांचा कुठलाही नियमित वापर नसताना सुद्धा आज त्या संग्रही आहेत. त्याकरिता पैसे खर्च केले गेलेले आहेत. कपड्यांचेही तसेच आहे. अनेक कपडे अनेक दिवसपर्यंत वापरले जात नाहीत, परंतु घेतले मात्र जातात. चप्पल आणि बुटांचेही तसेच आहे. अनेकांना नवीन घेतल्यावर चार दिवस वापरली आणि त्यानंतर वापरण्याचा योग आला नाही असे पण दिसून येते.**

आज लोक कर्जाचे हप्ते भरण्यासाठी जगत आहेत का असाही प्रश्न निर्माण होतो. माझे एक मित्र मला म्हणाले की, मला आता तब्येत चांगली ठेवावी लागेल. मी म्हणालो का बरं? तर ते म्हणाले, आता दोन कोटींचे कर्ज घेतलेले आहे. त्यामुळे ते फेडण्यासाठी आणखी काही वर्ष काम करण्याची आवश्यकता आहे. म्हणजे "शरीरमाद्यम् खलू धर्म साधनम्" ही भावना नाही तर "कर्ज साधनम्" ही भावना आहे. आरोग्य हा माझा मूलभूत अधिकार आहे. यासाठी मी प्रयत्न करीन ही भावना नाही तर कर्जाचे हप्ते फेडायचे आहेत त्यासाठी मला उत्तम स्वास्थ्य ठेवणे आवश्यक आहे ही भावना झालेली



आहे. महागाई वाढली आहे. भविष्यकाळात ती आणखी वाढणारच आहे. परंतु आमच्या गरजा याही जर वाढत राहिल्या तर आम्हाला काळानुसार, फॅशननुसार वेगवेगळ्या गोष्टींचा संग्रह करीत जावा लागणार आहे. त्यामुळे ज्या पैशांची कधीकाळी बचत व्हायची तो पैसा आता कोणीतरी आमच्याकडून हिरावून घेणार आहे हे सुद्धा सत्य आहे. अनेक वेळा सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये मंदी येते. ज्यांचे भले मोठे पगार आहेत असे लोक नोकरीवरून काढले जातात. त्यापैकी अनेक नैराश्यामध्येही जातात. त्यावेळेस सर्वसामान्य माणसाला असा प्रश्न पडतो की या माणसाला इतका मोठा पगार होता व इतके वर्ष झाले हा नोकरी करत आहे मग याला निराशेच्या गर्तेत जाण्याचे कारण काय आहे. तर ते कारण असे आहे की याने आपल्या पगाराला पाहून मोठी कर्ज घेतलेली असतात. मोठे घर घेतलेले असते, मोठी कार घेतलेली असते. असे अनेक मोठे खर्च केलेले असतात व हे सर्व कर्जावर केलेले असतात. त्यामुळे नोकरी गेली तरी आहे त्या पैशांमध्ये आम्ही दोन-चार वर्ष आरामात जगू शकतो, या भावनेपेक्षा घेतलेल्या अमाप कर्जामुळे कर्जाचे हप्ते कसे फेडले जातील या चिंतेने ते नैराश्यात जातात असे लक्षात आलेले आहे. अंथरूण पाहून पाय पसरण्याचे दिवस आता संपलेले आहेत. पसरलेल्या पायांना झाकण्यासाठी अंथरुणाचा शोध सुरू असतो.

आपल्या प्राचीन धर्मशास्त्रांमध्ये पैशाला अतिशय महत्त्वाचे मानलेले आहे. परंतु पैसा खर्च करताना तो रसायनासारखा खर्च करावा असे म्हटलेले आहे. म्हणजे साखरेचा चमचा मोठा, त्याच्यापेक्षा लहान चहाचा. परंतु सुवर्ण भस्म जर औषधामध्ये टाकायचे असेल तर त्यासाठी लागणारा चमचा हा तर खूपच लहान राहील. तशा पद्धतीचा चमचा हा औषधशाळेत रसायनांसाठी वापरण्यात येतो. त्यामुळे पैसे खर्च करताना व्यक्तीने रसायनांच्या चमच्याने खर्च करावे म्हणजे अगदी थोडे थोडे खर्च करावे असे सांगितलेले आहे. परंतु आज चंगळवाद वाढलेला आहे. चैनीची प्रवृत्ती वाढलेली आहे. दिवसभरात जर मला कंटाळा येत असेल तर मग मी काय केले पाहिजे तर चला खरेदीला जाऊ, काहीतरी खरेदी केले पाहिजे, त्याच्यामध्ये वेळ घालवला पाहिजे अशा पद्धतीची प्रवृत्ती आहे. यामुळे देशातील बचतीचे प्रमाण कमी होत आहे. कमी झालेल्या बचतीचा परिणाम हा आरोग्य, मुलांचे शिक्षण, लग्न, निवृत्ती इत्यादींकरिता जो पैसा साठवला जायचा त्या बचतीवर झालेला आहे. त्यामुळे आज जरी चार दिवस सुखाचे वाटले तरी पण भविष्यकाळात समस्या उद्भवू शकतात हे लक्षात घेतले गेले पाहिजे. आपल्या देशामध्ये महिला या फार पुरातन काळापासूनच बचत करीत असायच्या. उद्योगधंदा, नोकरी यामध्ये कुठलेही संकटाचे प्रसंग आले तर त्यावेळेस महिला स्वतःजवळच्या बचतीतून त्या आपल्या संसाराला मदत करायच्या. छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याला कैदेत असताना जिजामाता यांनी त्यांच्या खर्चाच्या पैशातून वाचविलेल्या पैशातूनच स्वराज्याचे काम चालविले होते याचे स्मरण आपण ठेवले पाहिजे.

पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळामध्ये भारताने ज्यावेळेला पोखरण येथे अणू विस्फोट केला त्यावेळेस अमेरिकेतसह काही देशांनी आपल्यावर आर्थिक निर्बंध टाकले. तरीही त्यावेळेस भारत डगमगला नाही. कारण करोडो भारतीयांची अल्पबचत त्यावेळेस सरकारला मदत करणारी ठरली. आज सरकार पायाभूत सुविधांसाठी विदेशाकडून कर्ज घेत असते तर सर्वसामान्य माणूस हा चैनीच्या वस्तू, प्रवास आणि इतर गोष्टींसाठी कर्ज घेत असतो. देशाची अल्पबचत ही सरकारसाठी मोठी आशादायक व पाठिंबा देणारी असते.

तुमचा पगार किंवा उत्पन्न कितीही कमी असले तरीही बचतीची सवय तुम्हाला आहे किंवा नाही हे महत्त्वाचे आहे. तुम्ही थोडे थोडे जरी पैसे जमा केले तरी भविष्यकाळात त्यातून एक मोठा निधी निर्माण होईल की जो तुमच्या भविष्यकालीन गरजांसाठी एवढेच नव्हे तर तुमच्या मुलांसाठी सुद्धा कामात येऊ शकेल. घरोघरी केली जाणारी अल्पबचत ही जसा कुटुंबाचा आधार आहे तसाच तो राष्ट्राचाही आधार आहे. खर्च केल्यानंतर उरलेले पैसे वाचविणे हे योग्य नाही तर भविष्यासाठी आवश्यक तेवढे पैसे दरमहा जमा करणे व उरलेल्या पैशातून खर्च करणे ही योग्य पद्धत आहे. बचतीतूनच प्रत्येक पिढी भावी पिढीला काहीतरी त्यांच्या भविष्यासाठी भेट देऊन जात असते. आम्ही आमच्या खर्चाच्या मर्यादा आखल्या पाहिजेत व आपले भविष्य आर्थिकदृष्ट्या सक्षम केले पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### आमचे श्रेष्ठत्व आणि राजकीय मंडळी

इंग्रजांमुळे समतेचे महापुरुष बनवले हे नक्की; कारण म्हणूनच बहुजनांना शिक्षण मिळाले, समतेचा अर्थ उमगला, आधुनिक सुधारणा वास्तवात आणल्या गेल्या. सध्या काय आहे? तर दीड लाख रु. महिन्याला वेतन असणारी जनसेवक म्हणविणारी मंडळी संसदेच्या भोजनालयात चहा १ रु., जेवण २ रु., मांसाहार २५ रु. देऊन मजा करीत आहेत. ६७४० जाती, थोर पुरुष यांच्या अगदी अलगद वाटण्या कोणी केल्या? आपणच ना? ज्यांनी जातिभेद, धर्मभेद, गरीब-श्रीमंत, प्रांतभेद निर्माण केले ते निष्कर्षवादी आपल्याला कमकुवत बनवून द्वेष रुजवून गेले आणि त्याच द्वेषाला आम्ही गोंजारतो आहोत. दगडापासून सर्वांमध्ये ईश्वर वास करतो या विचारांचे आम्ही रोहिदास, गोरा, सावता, वाल्मीक, नरहरी, चोखा, नामदेव यांना चांभार, कुंभार, माळी, कोळी, सोनार, महार, शिंपी अशी विशेषणे लावली. काय त्यांच्यात देवत्व नव्हते का? आदिवासी असो वा ब्राह्मण, बुद्ध असो वा मराठा, धनगर असो वा माळी किंबहुना मातंग सुद्धा या सर्व जातीत देवत्व नाही का? यालाच म्हणतात जातीचे राजकारण. जे राजकीय मंडळी स्वतःच्या स्वार्थासाठी भेदाभेद करून श्रेष्ठत्व मिरवीत बसली. इंग्रज गेले तेव्हाच गुलामी संपली मग आता कशासाठी गुलामी हवी? ज्याचे हातावर पोट आहे तो गरीब नसून जनतेच्या पैशावर मजा मारणारेच गरीब!

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### श्रावणातील पहिला सण नागपंचमी

नागपंचमी हा श्रावण मासातील पहिला सण! हा सण श्रावण शुद्ध पंचमी या दिवशी साजरा केला जातो. यावर्षी नागपंचमी २९ जुलै या दिवशी आहे. या दिवशी स्त्रिया उपवास करतात, नवीन वस्त्रे, अलंकार परिधान करून नागदेवतेची पूजा करतात आणि त्याला दुधाचा नैवेद्य दाखवतात. नागदेवतेचे पूजन केल्यामुळे सर्पभय उरत नाही आणि विषबाधा होण्याचे संकट टळते. नागपंचमीच्या दिवशी भाजी कापणे,



चिरणे, तळणे, तसेच भूमी उकरणे, नांगरणे यासारख्या कृती करणे निषिद्ध आहे; या मागचा उद्देश नागपंचमीच्या दिवशी चुकूनही नागाला इजा पोहोचू नये हा आहे. सर्प किंवा नागदेवता हे शेतकऱ्यांचे मित्र आहेत. कारण ते शेतीतील पिकांचे, उपद्रवी प्राणी, कीटकांपासून रक्षण करतात.

स्त्रियांनी नागाच्या आकृत्यांचे भावपूर्ण पूजन केल्याने नागदेवता प्रसन्न होतात आणि शक्ती मिळते. नागपंचमीच्या दिवशी बहिणीची हाक ईश्वराच्या चरणी पोहोचते. त्यामुळे बहिणीने भावाच्या उन्नतीसाठी ईश्वराला प्रार्थना करावी आणि सुख समृद्धीचा आशीर्वाद मिळवावा. पूर्वीच्या काळी माहेरवाशिणी माहेरी यायच्या. शेतातील वारुळाची पूजा करायच्या. नागपंचमीपासून झाडाला दोरी बांधून श्रावण महिनाभर मैत्रिणींसोबत झोके घेत निसर्गासोबत हिरव्यागार श्रावणाचा आनंद लुटायच्या. आता हे फक्त ग्रामीण भागात थोड्या प्रमाणात आहे. म्हणून नागपंचमी हा सण नागदेवतेप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच श्रावणातील आनंद लुटण्याचा देखील दिवस आहे.

**वर्षा आवदे**/नागपूर

### लाडक्या बहिणींच्या निधीवर भावांचा डल्ला

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेवर पुरुषांनीही डल्ला मारल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या योजनेत गैरप्रकार करून १४ हजार २१८ पुरुषांनी या योजनेचा लाभ घेत सरकारचे २१ कोटी ४४ लाख रुपये लाटले आहेत. याआधी सरकारी कर्मचारी असलेल्या महिलांनी या योजनेचा लाभ घेऊन आर्थिक फसवणूक केल्याची बाब उघड झाली होती. सरकारची आर्थिक फसवणूक करणाऱ्या अशा महिलांवर कसलीही कारवाई झाली नाही. त्यांच्याकडून पैशांचीही वसुली करण्यात आली नाही. ही योजना गरीब महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी आहे हे माहीत असूनही यात गैरप्रकार करून सरकारची आर्थिक फसवणूक करणाऱ्या या महाभागांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कारवाई करायला हवी.

ज्या पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतला त्यांच्याकडून पैशांची वसुली करायला हवी. केवळ या पुरुषांवरच नाही तर ज्या महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेत गैरप्रकार करून सरकारची आर्थिक फसवणूक केली आहे त्यांच्याकडूनही पैशांची वसुली करावी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पिण्याच्या पाण्यासाठी आणखी एका बालिकेचा बळी

### इलेक्ट्रिक मोटारीची पिन काढताना करंट लागून बालिकेचा मृत्यू

**सोलापूर, दि. २६ जुलै -**
शहरात पिण्याच्या पाण्यासाठी रविवारी आणखी एका बालिकेचा बळी गेला. शहरातील एमआयडीसी परिसरातील निलम नगरात पिण्याचे पाणी भरून ठेवण्यासाठी इलेक्ट्रिक मोटार ची पिन काढताना करंट लागून १३ वर्षिय बालिकेचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी सकाळी आठच्या सुमारास घडली. समृध्दी सिध्देश हिरेमठ (वय १३, रा. निलम नगर, सोलापूर) असे बालिकेचे नाव आहे.



रविवार हा निलम नगर परिसरात पिण्याचे पाणी येण्याचा दिवस होता. रविवारी सकाळी नळाला पाणी आल्याने पाणी भरण्यासाठी हिरेमठ यांच्या घरी इलेक्ट्रिक मोटार लावण्यात आली होती. सकाळी आठच्या सुमारास पाणी भरून झाल्यानंतर सुरु असलेली पाण्याची इलेक्ट्रिक मोटार बंद करून तिची पिन काढताना समृध्दी हिरेमठ ही अचानक करंट लागून ती खाली पडून बेशुध्द झाली. त्यामुळे शेजारी राहणारे राघवेंद्र कल्लुरे यांनी बेशुध्दावस्थेतील समृध्दी हिस उपचारासाठी शासकी रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. अक्षय इमडे यांनी समृध्दी हिस मृत घोषित केले. सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## ▶▶ महत्वाचे...

### घराच्या गच्चीवरून पडून २० वर्षीय तरूणी जखमी

**सोलापूर, दि. २७ जुलै -**
घराच्या गच्चीवरून पडून २० वर्षिय तरूणी जखमी झाली. सावली उमाजी दिंडोरे (वय २०, रा. जय बजरंग नगर, मजरेवाडी, सोलापूर) असे जखमी तरूणीचे नाव असून तिच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. २७ जुलै रोजी सकाळी नऊच्या सुमारास सावली ही राहत्या घराच्या गच्चीवर पाण्याची टाकी चेक करीत असताना अचानक तिचा तोल जाऊन खाली पडली. त्यामुळे तिच्या डोक्यास गंभीर मार लागून ती बेशुध्द पडली. तिला बेशुध्दावस्थेत उपचारासाठी खासगी रुग्णालयातून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली.

### दुचाकीच्या धडकेने पादचारी महिला जखमी

**सोलापूर, दि. २७ जुलै -**
शहरातील रूपाभवानी मंदीराच्या रोडवर दुचाकीच्या धडकेने पादचारी महिला जखमी झाली. मंदा अनिल थोरात (वय ५५, रा. न्यु बुधवार पेठ, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. २७ जुलै रोजी पहाटे सहाच्या सुमारास मंदा थोरात या राहत्या घरातून रूपाभवानी मंदीराच्या रोडकडे पायी चालत जात होत्या. त्यावेळी हनुमान नगर रिक्षा स्टॉपजवळ पाठीमागून भरधाव आलेल्या दुचाकीस्वाराने थोरात यांना पाठीमागून जोरात धडक दिली. यामध्ये मंदा थोरात यांना जबर मार लागल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### गाय आडवी आल्याने पडून दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. २७ जुलै -**
७० फुट रोडवरील अभि बार समोर रस्त्यावर गाय आडवी आल्याने पडल्याने दुचाकीस्वार जखमी झाला. कृष्णा रामु मादास (वय ३१, रा. हनुमान मंदीर, चेतन हॉटेलच्या बोळता, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. २६ जुलै रोजी रात्री कृष्णा मादास हा जुना वालचंद कॉलेज येथून दुचाकीवरून राहत्या घरी जात होता. त्यावेळी ७० फुट रोडवरील अभि बार समोरील रस्त्यावर दुचाकीसमोर गाय आडवी आली. त्यामुळे म ादास याची दुचाकी घसरून मादास हा खाली पडून जखमी झाला. त्यामुळे त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आले आहे.

### ऑक्सी प्लांटमध्ये शॉक लागून तरूण जखमी

**सोलापूर, दि. २७ जुलै -**
मंगळवेढा येथील एमआयडीसीमधील ऑक्सि प्लांटमध्ये शॉक लागून हत्तूर वस्ती येथील तरूण जखमी झाला. ही घटना रविवारी दुपारी घडली. कमलेश्वर कृष्णा स्वामी (वय ३२, रा. हत्तूरे वस्ती, सोलापूर) असे जखमी तरूणाचे नाव आहे. रविवारी दुपारी कमलेश्वर स्वामी हे मंगळवेढा येथील एमआयडीसीमधील ऑक्सी प्लांट कंपनीत काम करीत होते. त्यावेळी अचानक स्वामी यांस विजेचा शॉक लागल्याने त्या स्वामी यांचा चेहरा भाजून जखमी झाले. त्यामुळे त्यांच्यावर मंगळवेढा येथील खासगी रुग्णालयात उपचार करून अधिक उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### दुचाकी स्लिप होऊन खड्ड्यात पडल्याने तरूणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २७ जुलै -**
सोलापूर ते तुळजापूर रस्त्यावरील सुरतगाव ब्रिजच्या अलीकडे दुचाकी स्लिप होऊन खड्ड्यात पडल्याने तरूणाचा मृत्यू झाला. प्रतिक संजय भाला (वय २९, रा. मसई गल्ली, हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. २६ जुलै रोजी सायंकाळी प्रतिक भाला हा दुचाकीवरून सोलापूर ते तुळजापूर असे जात होता. त्यावेळी सुरतगाव ब्रिजच्या अलीकडे प्रतिक याची दुचाकी स्लीप होऊन तो रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात पडला. त्यामध्ये प्रतिक हा गंभीर जखमी होऊन बेशुध्द पडला. त्यामुळे बेशुध्दावस्थेत प्रतिक यास उपचारासाठी तामलवाडी टोळ नाक्यावरील रुग्णवाहिकेतून सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी डॉ. ओंकार तलकोक्कुल यांनी प्रतिक यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील चौकीत नोंद करण्यात आली.

## ● जिल्ह्यात 'दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान' झाले सक्सेस!

# १३ हजार दिव्यांगांना दिले घरपोच प्रमाणपत्र

- ▶▶ लवकरच राष्ट्रपती पुरस्कारासाठी प्रस्ताव जाणार
- ▶▶ ९०० दिव्यांगांनी पोस्टकार्डद्वारे जिल्हाधिकाऱ्यांचे मानले आभार
- ▶▶ मित्र संस्थेचे अध्यक्ष अभिजित राऊत यांची माहिती

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**
दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने शासनाच्या वतीने विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. दिव्यांगांसाठी असलेल्या शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ घेण्यासाठी दिव्यांगत्व वैद्यकीय प्रमाणपत्र अनिवार्य असते. जिल्ह्यातील प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला शासकीय योजनेचा लाभ मिळावा या उद्देशाने 'दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान' दिव्यांगत्व प्रमाणपत्र विशेष मोहीम जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी राबविली आणि १३ हजार ५२१ दिव्यांगांना प्रमाणपत्र घरपोच दिल्याने ९०० जणांनी पोस्टकार्डद्वारे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे आभार मानले आहेत.



दरम्यान, हे अभियान सक्सेस झाल्याने याचा प्रस्ताव लवकरच आम्ही राष्ट्रपती पुरस्कारासाठी पाठविणार असल्याची माहिती मिशन इन्स्टिट्युट फॉर ट्रेनिंग, रिसर्च ॲन्ड ॲक्शन (मित्र) संस्थेचे अध्यक्ष अभिजित राऊत यांनी दै. तरूण भारतशी बोलताना दिली.




जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून व जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या प्रमुख मार्गदर्शनात जिल्हयातील दिव्यांग व्यक्तींची डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि जिल्हा सामान्य रुग्णालयातील दिव्यांग प्रमाणपत्र मंडळातील तज्ञांमार्फत दिव्यांगत्वाचे वैद्यकीय प्रम ाणपत्राकरीता तालुका स्तरावर १९ ऑगस्ट ते २६ सप्टेंबर २०२४ या कालावधीत तपासणी व निदान विशेष मोहिम कार्यक्रमाचे तालुका पातळीवर २५ शिबिरांचे आयोजन करून १८ हजार ४२१ दिव्यांग व्यक्तींची प्राथमिक तपासणी व निदान करण्यात आले. यातील १३ हजार ५२१ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना ठराविक ९० दिवसात दिव्यांगत्व वैद्यकीय प्रमाणपत्र, स्वावलंबन कार्ड, रेल्वे सवलत प्रमाणपत्र, विविध कल्याणकारी योजनांचे माहिती पत्रक देण्यात आले. अभियानाच्या पहिल्या टप्प्यात जिल्हयातील सर्व दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी तसेच आत्मनिर्भर करण्यासाठी मित्र संस्था आणि जिल्हा प्रशासन यांचेमार्फत विविध शासकीय सेवेतील कर्मचारी, सामजिक संस्था, त्यांचे पालक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर अशा ३ हजार ७४२ व्यक्तींना १६ प्रशिक्षण कार्यशाळेद्वारे प्रशिक्षित करून, त्यांच्या सहकार्याने ज्या व्यक्तींजवळ नविन दिव्यांगत्व प्रमाणपत्र नाहीत अशा दिव्यांग व्यक्तींची प्राथमिक माहिती प्राप्त करून घेतली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे अभियानाच्या दुस-या टप्प्यात जिल्हयातील सर्व तालुक्यातील समग्र शिक्षा अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या १ हजार १० बालकांचे बुध्दीगुणांक प्राथमिक तपासणी शिबीर जिल्ह्याच्या ब्लॉक व क्लस्टर स्तरावर ४३ विविध ठिकाणी तज्ञ मानसशास्त्रज्ञांमार्फत ३१ जुलै ते १४ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आले.

अभियानाच्या तिस-या टप्प्यात दिव्यांग प्रमाणपत्र मंडळातील तज्ञांमार्फत दिव्यांगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्राकरीता तालुकास्तरावर १९ ऑगस्ट ते २६ सप्टेंबर २०२४ या कालावधीत तपासणी व निदान विशेष मोहिम कार्यक्रमाचे तालुका पातळीवर २५ शिबिरांचे आयोजन करून १८ हजार ४२१ दिव्यांग व्यक्तींची प्राथमिक तपासणी व निदान करण्यात आले. यातील प्राथमिक तपासणी व निदान झालेल्या १३ हजार ५२१ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना या प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

**असे झाले तालुकानिहाय प्रमाणपत्रांचे वितरण :** पंढरपूर तालुक्यात ९३० दिव्यांगांना प्रमाणपत्र घरपोच दिली. याच धर्तीवर अक्ककोट ८३०, बार्शी ८१९, माळशिरस १५४२, सांगोला १५७२, करमाळा ९४७, मोहोळ १००२, माढा/कुर्डुवाडी ११७५, मंगळवेढा ८५४, दक्षिण सोलापूर १११९ आणि उत्तर सोलापूर ८०३ अशी एकूण ११ हजार ६३३ आणि ओपीडी प्रमाणपत्र १८८८ अशी जिल्हाभरात एकूण १३ हजार ५२१ दिव्यांग व्यक्तींना प्रमाणपत्रे वितरित झाली आहेत. या दिव्यांगांमध्ये अस्थिव्यंग, कर्णबधीर, मेडिसीन, बौध्दिक दिव्यांगत्व, अंध/ अल्पदृष्टी, बहु दिव्यांगत्व आदींचा समावेश आहे.

**दिव्यांग बांधवांनी कार्डद्वारे आपल्या भावना मांडल्या :** जिल्ह्यातील ९०० दिव्यांग बांधवांनी पोस्टकार्डद्वारे जिल्हाधिकारी यांना आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. यामध्ये त्यांनी लिहिले आहे की, आपण हे 'दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान' राबवून यशस्वी केल्याने आम्हाला घरपोच प्रमाणपत्र मिळाली आणि त्या प्रमाणपत्राचा फायदा आम्हाला भविष्यात होणार आहे. शासनाच्या सवलतींचा लाभ मिळणार आहे, नोकरीसाठीही फायदा होणार आहे. काहीनी घरकुलाची तर काहींनी नोकरीची अपेक्षा केली आहे. प्रत्येकांनी आपापले विचार, भावना पोस्टकार्डद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे मांडल्या आहेत.
– **अभिजित राऊत,** अध्यक्ष, मिशन इन्स्टिट्युट फॉर ट्रेनिंग, रिसर्च ॲन्ड ॲक्शन (मित्र)

## ● धक्का लागल्याच्या कारणावरून

# १३ वर्षीय मुलाकडून १५ वर्षीय मुलाची मान दाबून पिरगाळली

- ▶ मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल
- ▶ टेंभुर्णी येथील न्यु इंग्लिश स्कूलमधील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जुलै -**
धक्का लागल्याच्या कारणावरून १३ वर्षिय मुलाकडून मान दाबून पिरगाळल्याने १५ वर्षिय मुलाचा मृत्यू झाला. ही घटना टेंभुर्णी येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये २४ जुलै रोजी घडली असून याबाबत टेंभुर्णी पोलिस ठाण्यात १३ वर्षिय मुलाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्वप्नील मन्मथ शिंदे (वय १५, रा. कंदर, ता. करमाळा) असे मरण पावलेल्या मुलाचे नाव आहे. याबाबत अर्जुन भिमराव शिंदे (वय ७३, रा. कंदर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कंदर येथील १३ वर्षिय मुलाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत स्वप्नील व आरोपी १३ वर्षिय मुलगा हे टेंभुर्णी येथील न्यु इंग्लिश स्कुलमध्ये शिकण्यास आहेत. २४ जुलै रोजी दुपारी तीनच्या सुमारास शाळेतील मधली सुट्टी संपल्यानंतर स्वप्नील व आरोपी १३ वर्षिय मुलगा जिन्यातून पहिल्या मजल्यावर



जात होते. त्यावेळी दोघांमध्ये धक्का लागल्याच्या कारणावरून भांडणे चालू झाली होती. त्या भांडणामध्ये दोघांनी एकमेकांच्या गच्चीला धरून एकमेकांना चापटा मारल्या व शिवीगाळ केली. त्यावेळी आरोपी १३ वर्षिय मुलाने स्वप्नील याची मान जाणिवपूर्वक उजव्या हाताच्या बगलेत दाबून धरून मान पिरगळली.त्यामुळे स्वप्नील याचा मृत्यू झाला. त्यामुळे स्वप्नील याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी १३ वर्षिय मुलाविरुध्द टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक धापटे पुढील तपास करीत आहेत.

## महिलेला मारहाण करुन विनयभंग


**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जुलै -**
प्रॉपर्टीच्या हिस्स्यावरून महिलेला मारहाण करून तिच्या अंगावरील कपडे फाडून विनयभंग करणाऱ्या मायलेकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन तिची जाऊ व तिच्या मुलाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता व आरोपी हे एकाच घरातील आहेत. २५ जुलै रोजी साडेआकराच्या सुमारास यातील पिडीता या घरी असताना तिची जाऊ व तिचा मुलगा हे घरी आहे. पिडीतेला तु इथे रहायचे नाही, तुला प्रॉपर्टीम धील हिस्सा मिळणार नाही असे सांगितले. त्यावेळी पिडीता या मी घर सोडून जाणार नाही असे म्हणाल्यानंतर तिची जाऊ व तिचा मुलगा याने पिडीतेस शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. तसेच पिडीतेचे अंगावरील कपडे फोडून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले. महिला पोलिस उपनिरीक्षक राधा जेऊघाले पुढील तपास करीत आहेत.

# सेवानिवृत्त शिक्षकाकडून १६ लाखांची खंडणी उकळून आणखी १५ लाखांची मागणी

### दोघांवर गुन्हा दाखल; एकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जुलै -**
बाळे येथील सेवानिवृत्त शिक्षकाकडून १६ लाखांची खंडणी उकळून आणखी १५ लाख रूपयांची खंडणी मागणाऱ्या दोघांविरुध्द फौजदार चावडी पोसिल ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत दिपक प्रल्हाद भोसले (वय ५८, रा. प्लॉट नं. ५, लक्ष्मी नगर, चंडक प्रशालेजवळ, बाळे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अभिजित रमेश जाधव आणि दत्तात्रय उर्फ दिपक तुकाराम माने (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिपक भोसले हे सेवानिवृत्त शिक्षक असून ते गेल्या ५ ते ७ वर्षापासून बाळे कॉर्नर येथील अक्षय फुलारी याच्या अभिषेक हेअर स्टाईल या हेअर सलून दुकानात दाढी-कटींग करण्यासाठी जात होते. दिपक भोसले यांनी अक्षय याच्या मागणीवरून त्यास हात उसने पैसे दिलेले असून दिलेल्या पैशांपैकी १ लाख ३० हजार रुपये येणे बाकी आहेत. ते पैसे देण्यास अक्षय हा टाळाटाळ करीत आहे. १२ ऑक्टोबर २०२३ रोजी अक्षय याने दिपक भोसले यांची ओळख दत्तात्रय माने याच्याशी करून दिली व उरलेले पैसे दत्तात्रय माने हा देईल असे सांगितले होते. त्यावेळी भोसले यांनी अक्षय यास पैशाचा व्यवहार हा तुमचा व माझा झाला आहे असे म्हणाल्यावर दत्तात्रय माने याने भोसले यांच्या अंगावर धावून येऊन विनाकारण वाद घातला होता.

दत्तात्रय माने याने भोसले यांना अक्षय यास पैसे मागितले तर तुम्ही माझ्या बायकोच्या अंगावर गेला अशी तुमच्याविरुध्द पोलिस चौकीत तक्रार करण्याची धमकी दिली होती. त्यामुळे भोसले हे घाबरून गेले होते. याचा फायदा घेत दत्तात्रय माने याने भोसले यांना १ लाख रुपयांची मागणी केली होती. भोसले हे घाबरलेले असल्यामुळे १३ ऑक्टोबर २०२३ ते २५ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत थोडे थोडे करून १ लाख रुपये माने यास दिले. तसेच १३ ऑक्टोबर २०२३ ते ३० जून २०२५ या कालावधीत अभिजित जाधव, दत्तात्रय माने यांनी भोसलेविरुध्द महिलेची खोटी केस केलेली आहे. ती केस काढून घेतो, नाही तर तुमच्या नोकरीवर गंडांतर आणतो असे धमकावून वेळोवेळी सोलापूरात विविध ठिकाणी बोलावून भोसले यांच्याकडून १६ लाख १० हजार रुपये काढून घेतले. तसेच १४ जुलै २०२५ रोजी अभिजित जाधव याने दिपक भोसले यांना हत्याराचा धाक दाखवून, तसेच हायकोर्टातील केस मागे घेण्यासाठी म्हणून आणखी १५ लाख रुपयांची मागणी केली. म्हणून याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक डी पाटील पुढील तपास करीत आहेत.

# शेती व्यवसाय वाचविण्यासाठी भारताने आता इस्त्राईल पॅटर्न राबवावा!

- ● कृषीभूषण रामचंद्र जगताप यांचा आशावाद
- ● शेतीव्यवसाय टिकविण्यासाठी आता 'हाच पर्याय'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**
गेल्या काही पिढ्यांपासून शेती व्यवसाय प्रचंड अडचणीत आला आहे. सध्या निसर्गाचा बिघडलेला समतोल, शेतीकामात वाढलेली मजुरी, शेती मालाला हमीभाव नसणे, सरकारची तुटपुंजी मदत यामुळे बळीराजा चांगलाच जाम झाला आहे. यामुळे आता आपली पारंपरिक शेती पध्दत सोडून इस्त्राईलच्या धर्तीवरच भारताने बळीराजाच्या शेतीची काळजी घेतली तरच आपल्याही बळीराजाची आर्थिक उन्नती होईल आणि शेती व्यवसायही टिकून राहील, असा आशावाद कृषीभूषण रामचंद्र जगताप यांनी खास दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना व्यक्त केला.


रामचंद्र जगताप
कृषीभूषण

जगताप यांना राज्य शासनाकडून कृषीभूषण पुरस्कार मिळाल्यावर त्यांनी त्यांच्या काही सहकाऱ्यांसमवेत इस्त्राईलचा दौरा केला. या अभ्यास दौऱ्यात त्यांनी त्या ठिकाणची शेती आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला. इतकेच नाहीतर त्या ठिकाणच्या काही कृषी अधिकाऱ्यांशीही चर्चा करून शेतीविषयक माहिती जाणून घेतली. त्यांना मिळालेल्या माहितीनुसार इस्त्राईल सरकारच्या कृषी विभागाचे कर्मचारी शेतकऱ्यांच्या



शेतातील मातीचे परीक्षण करून या जमिनीत हेच धान्य, हीच फळबाग घ्यावी, असे निर्देश देतात. बि-बियाणे, खते शेतकऱ्यांना जागेवरच मिळतात. यानंतर शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले टोमॅटो, वांगी, द्राक्ष, दाळिंब व इतर धान्य शासनाकडून हमीभावाने विकत घेतले जाते.

या शेतकऱ्यांच्या शेतातून शासनाचे कर्मचारी त्यांचा उत्पादित माल मॉलकडे घेवून जातात आणि त्या शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसेही लागलीच टाकतात. या उत्पादनाचे नैसर्गिक आपत्तीने नुकसान झाले तरी शासन त्या शेतकऱ्यांना ठरलेलाच भाव देते आणि नुकसानीची जबाबदारी शासन घेते. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला जागेवरच पैसे मिळत असल्याने त्यांना बाजारपेठेत जायचीही गरज नाही. नवनवे शेतीप्रयोग करण्यासाठी शेतकऱ्यांना त्यांच्या बँका शेतात जावून कमी व्याजाने कर्ज देतात. जर यंत्रसामुग्री शेतकऱ्यांना हवी असेल तर तीही घरपोच मिळते. यामुळे शेतकऱ्यांची मोठी आर्थिक बचतही होते.

वीज बंद पडली तर कंपनीला फोन करायची गरज नाही. त्या-त्या विभागातील वीज कर्मचाऱ्यांना फोन लावला की काही वेळात ते स्वत: येवून दुरूस्त करून जातात. एकंदरीत, इस्त्राईल देशात सर्व यंत्रणा शेतकऱ्यांना विनामुल्य आणि वेळेत सेवा देतात, येथे गटशेतीला तर अधिक प्राधान्य दिले जाते. यामुळे या देशातील शेतकरी कधीही आत्महत्या करीत नसल्याचेही जगताप यांनी नमूद केले. आपल्याकडे खते-बियाणे दरवर्षी महागतात, मशागतीच्या ट्रॅक्टरचा भाव वाढतो... हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा पाय अधिक खोलात जात आहे. यामुळे इस्त्रायलच्या धर्तीवरच आपल्या देशातील शेतीचे धोरण ठरवावे, अशी अपेक्षाही जगताप यांनी शेवटी नमूद केली.

**इस्त्राईलचे शेतकरी करतात १२ तास काम**
इस्त्राईल देश अगदी छोटा असला तरी त्या ठिकाणचे शेतकरी अत्यंत कष्टाळू आहेत. प्रत्येक शेतकरी १२ तास आपल्या शेतात काम करतो. तर दररोज १ तास देशसेवेसाठी देतो. त्या भागात फळतोडणी, पेरणी, पॅकिंग व इतर शेतीकामास अत्यंत ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी आहे. पशुधन आहे आणि दुग्धव्यवसायही त्यांचा तेजीत असतो. दुधाचाही हमीभाव ठरलेला असतो. शासनाची गाडी शेतकऱ्यांच्या दारात येवून दूध घेवून जाते आणि त्याचे पैसे बँक खात्यावर थेट जातात. अशीही माहिती जगताप यांनी दिली.

**शासनाचा बळीराजाबरोबर करार**
शेतकऱ्यांच्या शेती किंवा प्लॉटवरील उत्पादित मालाचा शासन आणि बळीराजा असा अधिकृत करार केला जातो. शेतकऱ्यांचा माल जागेवरच विकला जात असल्याने त्या शेतकऱ्यांना वाहतूक, हमाली–तोलाई असा खर्च होत नाही. इतकेच नाहीतर भावही कमी मिळत नाही. हा माल घेवून जाण्यापूर्वी शासन आणि शेतकरी यांच्यात करार होतो आणि निसर्गाने मालाचे नुकसान झाले तर शासन स्वत: नुकसानीची जबाबदारी घेते; हेही विशेषच आहे.

# शाळकरी मुलीला पळवून नेऊन तिचा विनयभंग

### युवकाविरुध्द ॲट्रॉसिटी व पोक्सोचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जुलै -**
शाळकरी मुलीला पळवून नेऊन तिचा विनयभंग करणाऱ्या युवकाविरुध्द ॲट्रॉसिटी व पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत बालिकेच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन आशिष उर्फ अजय उमेश सालपे (वय १९, रा. पडगाजी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी सालपे या आरोपीस अटक केली आहे.

यातील पिडीता ही २२ जुलै रोजी शाळेत जाते असे सांगून घरातून गेली होती. ती परत घरी न आल्यामुळे तिच्या नातेवाईकांनी तिच्या बेपत्ता होण्याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. २५ जुलै रोजी यातील पिडीतेकडे पोलिसांनी चौकशी केली असता तिला सिध्देश्वर मंदीरजवळून आशिष सालपे याने दुचाकीवरून सोलापूर फिरवून आणतो असे



सांगून गाडीवर बसवून विविध ठिकाणी फिरविल्याचे सांगितले. त्यानंतर रात्री आशिष सालपे याने मडकी वस्तीजवळील लोखंडी ब्रिजजवळील रस्त्याजवळ असलेल्या झुडपामध्ये नेऊन पिडीतेचा विनयभंग केला व सालपे हा निघून गेला.

पिडीता ही रात्रभर तिथेच सर्व्हिस रोडवर रडत बसली. त्यावेळी एका रिक्षातून पिडीता ही नवी वेस पोलिस चौकीजवळ आली व तेथून ११२ ला कॉल करून पोलिसांना बोलावून घेतले. त्यानंतर पोलिसांसोबत पिडीता ही जेलरोड पोलिस ठाण्यात आली असल्याचे सांगितले. यावरून सालपे याच्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात विनयभंग, ॲट्रॉसिटी व पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस आयुक्त राजन माने तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जीवनाचा सर्वंकष विचार ज्या ग्रंथामध्ये आहे, तो भागवत ग्रंथ होय : हभप डॉ. बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ जुलै-**

सृष्टीची उत्पत्ती व प्रलयाचा विचार ज्या ग्रंथात केलेला आहे, तो ग्रंथ म्हणजे भागवत पुराण होय. भारतीय संस्कृतीमध्ये या ग्रंथास अनन्य महत्त्व आहे. कारण, या ग्रंथात संपूर्ण मानवी जीवनाचा विचार केला गेला आहे. या ग्रंथाचे विशेष म्हणजे एकूण १८ पुराणांध्ये श्रीमद् भागवत पुराण हे महापुराण म्हणून ओळखले जाते. कारण, या पुराणामध्ये एकूण १० विशेष लक्षणे सांगितली आहेत. परंतु, इतर पुराणामध्ये फक्त ५ लक्षाणाचा विचार सांगितलेला आहे, असे निरुपणकार श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी आज सांगितले.



**श्रावणमास प्रवचनमाला भाग - २**

ते आज श्रावणमास प्रवचनमालेतील दुस-या दिवशीचे श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावर निरुपण करीत होते. या श्रीमद्भागवत पुराणामध्ये एकूण १८ हजार श्लोक आहेत व त्या श्लोकामध्ये जीवनोपयोगी तत्वज्ञान दडलेले आहे. बोलीभाषेत सहजगत्या मिश्किलपणे आपण बोलून जातो, तुझं 'पुराण' नकोस सांगू मला..! तेव्हा संकुचित वृत्तीने या पुराण शब्दाकडे पाहिले जाते. या संबंधात डॉ. जयवंत महाराजांनी अनेक व्यावहारिक उदाहरणे ही सांगितली. या पुराणामध्ये द्वितीय स्कंधातील अध्यायात एकूण १० लक्षणाचा विचार सांगितला आहे. १) सर्ग- यामध्ये विश्वाची उत्पत्ती सांगितली असून सृष्टीतील पंचमहाभूतांचा विचार ही यात सांगितलेला आहे. २) विसर्ग- यामध्ये सृष्टीतील पंचमहाभूतांच्या विचाराबरोबरच सृष्टीतील प्रलयाचा ही विचार सांगितलेला आहे. ज्याची उत्पत्ती होते त्याचा विनाश हा होतच असतो. ३) स्थानम्- यामध्ये सृष्टीला स्थैर्य प्राप्त करण्याचे विचार सांगितलेले आहेत. ४) पोषणम्- यामध्ये भगवंताची भक्तावर असलेली कृपा याचा विचार सांगितलेला आहे. उदाहरणार्थ भगवंताची उद्धवावर असलेली कृपा. ५) उतय- जीवाला आपल्या कर्माद्वारे बांधून टाकणाऱ्या वासना होय यांचा विचार यामध्ये आहे. ६) मन्वंतर- यामध्ये मनूच्या कालगणनेचा विचार सांगितलेला आहे. ७) ईशानुकथा- यामध्ये ईश्वराच्या तसेच भक्ताच्या कथा सांगितलेल्या आहेत. ८) निरोध- प्रलयकाली जीवाचे उपाधी सहित ईश्वरामध्ये विलीन होणे हा निरोध होय याचा विचार भागवतामध्ये आहे. ९) मुक्ती- यामध्ये अद्वैत अवस्था हीच मुक्ती म्हटले जाते. यामध्ये चार मुक्तीचा विचार सांगितलेला असून जीव-ब्रह्म ऐक्याची स्थिती सांगितलेली आहे. १०) आश्रय- यामध्ये आधाराचे महत्त्व सांगितलेले आहे. तत्त्वज्ञानामध्ये आश्रय या शब्दाचा अर्थ अधिष्ठान सांगितलेला असून संपूर्ण विश्वाचा आधार किंवा अधिष्ठान हे या भागवत पुराणात सांगितले आहे. अधिष्ठान असलेले हे परमतत्त्व आहे. ते अविनाशी आहे. असे तात्विक चिंतन व्यावहारिक उदाहरणाची जोड देऊन आज डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी प्रवचनात केले. श्रोते मोठ्या औत्सुक्याने ऐकत होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष- विनायक चतुर्थी |
| दि. २८ जुलै २०२५ | नागचतुर्थी उपवास |
| विक्रम संवत् २०८२ | शिवपूजन, शिवामूळ तांदूळ |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. चतुर्थी (२३.२३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पूर्वा (१७.३४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - परिघ (२६.५२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (१०.५७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : आपण फार कार्यरत व व्यस्त रहाल. व्यापार नोकरीमध्ये हितचिंतकांची मदत मिळेल. कोणतेही काम विचारपूर्वक करा. कुटुंबातील वातावरण आनंदी

**वृषभ** : आध्यात्मिक अंगीकरल्यामुळे मन शांत राहील. आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे मनोधैर्य वाढेल. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल.

**मिथुन** : नवीन कामाच्या संधी मिळतील. बुद्धी किंवा तर्काने आपल्या कामात यश मिळेल. घरातील व्यक्तिंचे आपणास सहकार्य मिळेल. कायद्याच्या प्रकरणात बेजबाबदारपणा दाखवू

**कर्क** : व्यापारासाठी केलेला प्रवास फायदेशीर राहील. आर्थिक समस्या दूर होईल. शत्रू आपली प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करतील.

**सिंह** :व्यापारात यश मिळेल. गृहपयोगी वस्तुंची खरेदी कराल. कुटुंबात, समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. नवीन योजनेमुळे फायदा होईल.

**कन्या** : पराक्रमात वाढ होईल. शुभ कार्यासाठी पैसा खर्च होईल. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. कौटुंबिक समस्येकडे विशेष लक्ष द्या.

**तुळ** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांकडून शुभ बातमी मिळेल. मोठ्या व प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप येईल. व्यापारीक निर्णय घेण्यास उशीर करू नका.

**वृश्चिक** : प्रेम संबंधाात यश मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. बऱ्याच दिवसापासून अडकलेले काम पूर्ण होईल.

**धनु** : कर्ज काढावे लागेल. मितभाषी बना. कुटुंबात किंवा कामाच्या ठिकाणी निष्कारण वाद होण्याची शक्यता आहे.

**मकर** : आज आपल्याला रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. आज अचानक पैसा आल्यामुळे खर्चात वाढ होईल. व्यापार विस्तारासाठी प्रयत्न यशस्वी होतील.

**कुंभ** : आपल्या योजना असफल होतील. मान प्रतिष्ठेला देखील धक्का पोहचू शकतो. निष्कारण कोणत्याही गोष्टीवर वाद करू नका.

**मीन** : आत्मविश्वासामुळे कठीण काम देखील पार पडणार आहे. घरगुती समस्या आज दूर होतील. व्यवसायात विशेष फायदा होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. नवीन योजना आमलात आणण्याचा

# १६ हजार विद्यार्थ्यांची आधार कार्ड नोंदणीच नाही

## शाळा अनुदानावर गदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

आधार कार्ड अपडेट न झाल्यामुळे शिक्षकांनाच 'फेल' करण्याची अफलातून संचमान्यता शालेय शिक्षण विभागाने आणली आहे. त्यामुळे ज्यांचे या विषयाशी घेणे-देणे नाही, अशा शिक्षकांच्या नोकऱ्या धोक्यात आले आहेत.

मुलाचे आधार कार्ड असले पाहिजे, त्याची निश्चिती झाली तरच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित केली जाईल, असा निकष संचमान्यतेत आहे. मात्र कुठे मुलांचे ठसे जुळत नाहीत, कुठे नावाचे स्पेलिंग चुकलेले असते, तर कुठे जन्मतारीख जुळत नाही. त्यामुळे 'आधार' असूनही अशी मुले शिक्षण विभागाच्या लेखी 'निराधार' होतात. इकडे विद्यार्थी वर्गात असूनही सरकार मात्र 'देता आधार, का करू अंधार', असा इशारा शिक्षकांना देत आहे.

> राज्यातील असंख्य शाळेमध्ये आधार कार्ड बाबतीत अडचणी निर्माण होत आहेत. जर आधार कार्ड अपडेट झाले नाही तर त्यांची नोंद प्रणालीवर होत नाही. त्यामुळे विद्यार्थांचा इयत्ता व पटसंख्या कळत नाही. तसेच दहावी, बारावी व शिष्यवृत्ती परीक्षा वेळीसुद्धा अडचण निर्माण होईल तसेच पटसंख्या कमी दिसल्यास याचा परिणाम शाळेच्या अनुदानावर तसेच सेवक संचवर होतो. त्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठेवण्याची शक्यता आहे. शिक्षकाची भविष्यांची शासनाने गांभीर्याने विचार करावा.
> **- प्रशांत शिरगुर, राज्य उपाध्यक्ष, पवित्र पोर्टल शिक्षक भरती व स्पर्धा परीक्षा विद्यार्थी असोसिएशन**

AADHAAR
माझा आधार, माझी ओळख

शिक्षकांनी मात्र या कामामध्ये अनेक अडचणी येत असल्याचे सांगितले. त्याची सरकारने दखल घेण्याची मागणी केली आहे. जन्मदाखला मध्ये चूक झाली असेल तर त्याप्रमाणे आधार कार्ड नोंदणी होते जन्म दाखला शाळेत दुरुस्ती करता येत नाही.यामुळे संचमान्यतेत विद्यार्थी व्हॅलीड होत नसल्याने शिक्षक अतिरिक्त होण्याची शक्यता आहे. राज्यात आधार कार्ड अपडेट केल्यावरच विद्यार्थ्यांची पटसंख्या समजते. त्यानुसार शाळेच्या पटसंख्यानुसार त्या शाळेमध्ये किती शिक्षकांची आवश्यकता असले पाहिजे त्यामुळे पटसंख्यानुसार शिक्षकांच्या जागा वाढवले किंवा कमी केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जन्मतारीख, बोटाचे ठसे किंवा फोटो चुकीच्या पद्धतीने अपलोड होता कामा नये ते दुरुस्ती करण्याचे काम संबंधित शैक्षणिक विभागाला देण्यात आली आहे. दुरुस्ती झाल्यावरच संचमान्यता दुरुस्ती होत असते.

> **सर्वाधिक आधार नोंदणी पंढरपुरात**
> जिल्ह्यातील ४६९८ शाळापैकी ६,८२,५७९ विद्यार्थ्यांपैकी १५, ६६१ विद्यार्थ्यांची आधार नोंदणी अद्याप झालीच नाही. तर, २४ हजार ६८ विद्यार्थ्यांचे आधार अपडेटेशन प्रलंबित आहे. आधार नोंदणीचे सर्वात कमी काम उत्तर सोलापूर ९०८१ व शहर दोन ९०.२८ टक्के झाले आहे. आधार अपडेटेशन नसणारे सर्वाधिक ३१७७ विद्यार्थी शहर दोन भागामध्ये आहे. सर्वाधिक आधार नोंदणीचे काम पंढरपूर ९४.६६ टक्के झाले आहे. त्यानंतर माळशिरस ९४.४१ टक्के झाले आहे

# नागपंचमीनिमित्त वेळापूरमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २७ जुलै-**

वेळापूर महादेव देवालय ट्रस्ट यांच्या वतीने भक्ती निवास येथे नागपंचमी सणानिमित्त सण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून महिलांसाठी व मुलींसाठी खास स्पर्धांचे आयोजन करून सण साजरा करण्यात येणार आहे. सणोत्सवात महिलांचा सहभाग वाढावा या उद्देशाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

महिलांसाठी विशेष दहीहंडी स्पर्धा ही महोत्सवाची मुख्य आकर्षण ठरणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या पथकासाठी पैठणी साडीचे पहिले बक्षीस ठेवण्यात आले आहे. याशिवाय, सोमवार २८ जुलै रोजी सकाळी ११:०० ते दुपारी २:०० या वेळेत रांगोळी आणि मेहंदी स्पर्धा होणार आहेत. तसेच भक्ती निवास येथे महिलांसाठी, मुलींसाठी झोका खेळण्यासाठीची सोय करण्यात आली आहे . रंगांची उधळण आणि सर्जनशीलतेचा मेळ घालणाऱ्या या स्पर्धांमध्ये महिलांची उत्स्फूर्त सहभागाची अपेक्षा आहे. तसेच मंगळवार २९ जुलै रोजी दुपारी १:०० वाजल्यापासून संगीत खुर्ची, फॅन्सी ड्रेस, उखाणे स्पर्धा तसेच फनी गेम-१ आणि फनी गेम-२ अशा मनोरंजक स्पर्धांचे आयोजन केले आहे. महादेव देवालय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख तसेच पांडुरंग माने-देशमुख यांनी पंचक्रोशीतील सर्व महिलांना आणि मुलींना या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे.



# श्रीमंतयोगी प्रतिष्ठानतर्फे सॅनिटरी पॅड वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित १० उपक्रम राबविण्यात येणार असून त्या अंतर्गत मासिक पाळीबाबत जनजागृती शिबिर घेण्यात आले. यावेळी १५० विद्यार्थिनींना मोफत सॅनिटरी पॅड वाटप करण्यात आले. श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने कुंभारी रोड, वंदना पार्क जवळ साईबाबा प्रशालेत मासिक पाळी, सॅनिटरी पॅडबाबत शिबिर घेण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींना मोफत सॅनिटरी पॅड वाटप करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मासिक पाळीबाबत मार्गदर्शक राहुल बिराजदार, सामजसेविका लक्ष्मी गज्जम, ॲड. नीता मंकणी, उद्योजिका वर्षा पाथरकर, साईबाबा प्रशालेचे मुख्याध्यापक तिपन्ना कोळी, संस्थेचे संस्थापक महेश कासट आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळू जाधव तर आभार प्रदर्शन अंजली भांडवले यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनुश्री कासट, अक्षता कासट, भारती जवळे, अश्विनी म्हंता, शुभांगी लचके, अर्चना बंडगर, सायराबानू लाडलेमशाक, संतोष अलकुंटे, आभिजीत व्हानकळस, राजेश केकडे, दिपक करकी, स्वप्निल बिराजदार, भारत सन्नाके, गंगाधर बहिरगोंडे आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

> **वर्षभरात दहा सामाजिक उपक्रम राबविणार : महेश कासट**
> श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित वर्षभरात १० उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत पहिला उपक्रम अन्नधान्य वाटप, दुसरा विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप आणि आता मुलींना मोफत सॅनिटरी पॅड वाटप उपक्रम राबविण्यात आला. अशाच पद्धतीने समाज उपयोगी विविध कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे प्रतिष्ठानचे संस्थापक महेश कासट यांनी सांगितले.

# आयुर्वेदिक महाविद्यालयात स्मार्ट गर्ल कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

राष्ट्रीय पातळीवर भूकंप, दुष्काळमुक्ती, शिक्षण, मूल्यवर्धन यासारख्या लोकोपयोगी काम करणाऱ्या भारतीय जैन संघटनेचे किशोरवयीन मुलींसाठी उपयुक्त असा कार्यक्रम स्मार्ट गर्ल कार्यशाळेचे उद्घाटन सेठ गोविंदजी रावजी आयुर्वेदिक महाविद्यालयात करण्यात आला. ही कार्यशाळा बिजेएस स्मार्ट सिटी महिला विभागातर्फे आयोजित करण्यात आला आहे.




या कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थानी जैन संघटनेचे राज्य अध्यक्ष केतन शहा होते. प्रमुख पाहुणे म्हणून आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विना जवळे, डॉ. शांतिनाथ बागेवाडी, विभागीय अध्यक्ष माया पाटील, विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभूते, आयोजक स्मार्ट सिटीचे अध्यक्ष निशा गांधी, सचिवा पल्लवी मेहता, निर्मला मेहता, स्मार्ट गर्लचे ट्रेनर सुवर्णा कटारे, रमेश पाटील, डॉ. सविता चौगुले,मुख्य कार्यालयातून ज्ञानेश्वर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात णमोकार महामंत्र व धन्वंतरी प्रार्थना करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वललाने कार्यशाळेची उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षीय मनोगतात केतन शहा म्हणाले की, किशोरवयीन मुली या कार्यशाळेतून स्वतः आत्म निर्भरता व विकसित होऊन दोन कुटुंब म्हणजे लग्नापूर्वीचे आई-वडिलांचे कुटुंब व लग्नानंतरचे सासरचे कुटुंब सुधारतील त्यामुळे समाज सुधारेल पर्यायाने राष्ट्राचा विकास होईल असे मत व्यक्त केले.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ऐश्वर्या ढबू या विद्यार्थिनीने केले.

# विश्व हिंदू परिषदेच्या जिल्हा सह मंत्रीपदी कदम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. २७ जुलै-**



विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत व्यापक बैठक पुणे येथे २६ आणि २७ जुलै रोजी आयोजित करण्यात आली. या बैठकीत प्रांतातील विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आल्या. त्यामध्ये बापूसाहेब कदम यांची विश्व हिंदू परिषद सोलापूर जिल्हा सहमंत्री म्हणुन नियुक्ति करण्यात आली. गेल्या अनेक वर्षापासून बापूसाहेब कदम हे विश्व हिंदू परिषद बार्शी प्रखंड मंत्री म्हणुन हिंदू समाजासाठी उत्कृष्ट काम करत आहेत. आता त्यांना सोलापूर जिल्ह्यात काम करण्याची संधी मिळाली आहे. त्यांचे अभिनंदन होत आहे.

# महिला शेतकरी उत्पादक कंपनीकडून शेतमालाची निर्यात प्रेरणादायी : सीईओ जंगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

महिलांच्या शेतकरी उत्पादक कंपनी, स्वयंसहाय्यता बचत गट यांच्या शेतीमालाला भाव मिळण्यासाठी आणि महिलांचे जीवन समृद्ध होण्यासाठी उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कार्यरत आहे. बचत गटाच्या महिलांनी महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने शेतमालाची होत असलेली निर्यात ही निश्चित प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.



उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, टेकनोसर्व आणि KD एक्सपोर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने करमाळा तालुक्यातील साऊली शेतकरी महिला उत्पादक कंपनीने २१ टन केळी इराण येथे निर्यात करण्यात आली.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक संदीप कोहिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली २१ टन केळी ही इराण या देशात निर्यात करण्यात आली. यावेळी उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, जिल्हा व्यवस्थापक संतोष डोंबे, मृत्युंजय, चंद्रवीर, किरण डोके, तालुका अभियान व्यवस्थापक अवधूत देशमुख, सुषमा बिचुकले, संचालक प्राजक्ता पोरे, दिपाली पंढरे, सुवर्णा खबाले, मुक्ता सोमासे, तबस्सुम शेख, मनिषा बोराडे उपस्थित होत्या.

# संगणकामुळे डिजीटल साक्षरता निर्माण होते

## डॉ. अकबर नदाफ; सलगर जि.प. शाळेत संगणक जनजागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

संगणकाचे ज्ञान हे प्रत्येक विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. या जनजागृती करणे प्रत्येक काळाजी गरज आहे. याचे ज्ञानामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजीटल साक्षरता निर्माण होईल व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याचे महत्त्व समजून पुढील भविष्यात त्याचा त्यांना उपयोग करून भविष्य उज्वल होईल, असे प्रतिपादन रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीचे अध्यक्ष रोटे डॉ. अकबर नदाफ यांनी सांगितले.

मंगळवेळा तालुका येथील सलगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत डिजिटल साक्षरता आणि शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटी यांच्यावतीने चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी संगणक जनजागृती घेण्यात आला. सलगर हे गाव सोलापूरपासून सुमारे ९० किमी अंतरावर आहे.

यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक सिध्दप्पा बिराजदार, उपशिक्षक सिध्देश्वर करपट्टी, शरद पाटील, राजू पाटील, सरपंच सुहास कदम, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश जाधव आदी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना संगणकाचे मूलभूत ज्ञान दिले आणि संगणकाचे भाग, त्यांचा वापर, तसेच संगणकाचे कृषी, आरोग्य आणि संरक्षण क्षेत्रातील महत्त्व याबद्दल समजावून सांगितले. त्यांनी संगणकाच्या वापरास ग्रामीण जीवनाशी जोडून विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण केली. या उपक्रमास एकूण ८७ विद्यार्थ्यांनी सहभागी होते. असे प्रत्येक जिल्हा परिषदे शाळेत व्हायला पाहिजे कारण यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणक व डिजीटल शिक्षणबद्दल सखोल माहिती होऊन सध्या जगात याचे महत्त्व किती आहे हे त्यांना माहिती असे मुख्याध्यापक सिध्दप्पा बिराजदार यांनी सांगितले. त्यांनी रोटरी क्लबच्या तांत्रिक जनजागृतीसाठी आमच्या शाळेत हे कार्यक्रम घेतल्याबद्दल रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीचे आभार मानले. शेवटी रोटे. भारत कदम यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# वृत्तपत्र लेखकच अंत:करणातील वेदना जाणू शकतो

## डॉ. इरेश स्वामी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

वृत्तपत्रातील संपादकीय जेवढे महत्त्वाचे तेवढेच वाचकांचा पत्रव्यवहारही महत्त्वाचे सदर महत्वाचे आहे, कारण वृत्तपत्र लेखनच जनसामान्यांच्या वेदना जाणू शकतो, असे मत सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. ईरेश स्वामी यांनी व्यक्त केले.

सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच आयोजित पुरस्कार सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते, मनपाचे माजी महापौर यु.एन. बेरिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात मंचचे अध्यक्ष फैय्याज शेख, कार्यवाह सुनील पुजारी, प्राचार्य सुरेश ढेरे, उपप्राचार्य डॉ. प्रा. सुहास पुजारी, प्रा. धनंजय शहा यांची प्रमुख उपस्थिती होती. मंच अध्यक्ष फैय्याज शेख यांनी प्रास्ताविक केले. व्यासपीठावरील पाहुण्यांच्या स्वागत सन्मानानंतर, उपाध्यक्ष मयुरेश कुलकर्णी यांनी पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा परिचय करुन दिला. स्व. सुमतीबाई येळेगावकर स्मृति- पुरस्कार प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे, प्रा. धनंजय शहा यांना स्व. मीर इसहाक शेख स्मृति-पुरस्कार उपप्राचार्य डॉ. प्रा. सुहास पुजारी यांना प्रदान करण्यात आला. स्व. रंगनाथ लोहार साहित्य पुरस्कार ज्येष्ठ गायक दीपक कलढोणे यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार त्यांच्या वतीने त्यांचे शिष्य वर्धराज मिर्जी यांनी स्वीकारला. सदस्य डॉ.रामचंद्र धर्मसाले यांना पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. प्राचार्य डॉ. ढेरे, उपप्राचार्य डॉ. पुजारी प्रा. शहा यांची भाषणे झाली. कलढोणे यांचे मनोगत मिर्जी यांनी वाचून दाखविले.



अध्यक्षीय समारोप भाषण बेरिया यांनी केले. मंच सदस्य प्रांजली मोहीकरांनी सूत्रसंचालन केले तर सुनील पुजारींनी आभार मानले. यावेळी अरुणकुमार धुमाळ, रंगसिद्ध कोरे, अशोक खानापुरे, अशोक म्हमाणे, विठ्ठल वठारे, प्रेमचंद मेने, श्रीवल्लभ करकमकर, डॉ. रामचंद्र धर्मसाले, मल्लिनाथ किणगी, नसीमा पठाण, महेजबीन मुल्ला, आबेदा शेख, ॲड. कमरुन्निसा बागवान, समीर शेख, बाबा शेख, भूषण लोहार उपस्थित होते.

# बांधकामासाठी वापरण्यात येणारे साहित्य चोरीला

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २७ जुलै-**

येथील माढा कॉलनीतील गुगळे प्लॉटिंगमध्ये सुरु असलेल्या एका बांधकाम साईटवरुन २२ हजार ६६० रुपयांचे बांधकाम साहित्य चोरट्याने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी एजाज साबिर तांबोळी (वय - ३८, व्यवसाय व्यापारी, रा. मल्लाप्पा धनशेट्टी रोड, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

तांबोळी यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी माढा कॉलनीतील गट क्र. १०८१/२ ब, प्लॉट क्र. १४ येथे बांधकाम सुरु केले असून, त्यासाठी त्यांनी २१ जुलै रोजी अन्वर बागवान यांच्याकडून सुमारे दोन हजार ठोकळा विटा घेतल्या होत्या. २२ जुलै रोजी त्यापैकी २०० विटांचा वापर कंपाऊंडच्या बांधकामासाठी करण्यात आला. काम पूर्ण झाल्यानंतर सायंकाळी ६ वाजता उरलेल्या अंदाजे १८०० विटा तसेच खोरे, पाट्या, टिकाव यासारखे साहित्य सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले होते. मात्र, दुसऱ्या दिवशी २३ जुलै रोजी सकाळी काम सुरु करण्यासाठी गेले असता, बांधकामावरील विटा आणि साहित्य बेपत्ता आढळून आले. आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला असता ते कुठेही आढळून न आल्याने चोरट्याने मुद्दाम लबाडीने साहित्य चोरल्याचा संशय तांबोळी यांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### सोन्या मारुती गणेशोत्सव अध्यक्षपदी केदार सोहनी

**सोलापूर, दि. २७ जुलै-**

मानाचा सोन्या मारुती गणेशोत्सव मंडळ उत्सव अध्यक्षपदी केदार सोहनी तर कार्याध्यक्षपदी आकाश शाबादी यांची सर्वानुमते बैठकीत निवड करण्यात आली. या बैठकीत अनेक महत्वाच्या विषयावर चर्चा करुन गतवर्षीचा लेखा जोखा सादर करण्यात आला. यंदाचे उत्सव पदाधिकाऱ्यांमध्ये उपाध्यक्षपदी शुभम हळदे, याकुब कुरेशी, खजिनदार अभिजित हळदे, राम क्षिरसागर, संघटक सुहास महिंद्रकर, सचिव जितेंद्र टेंभुर्णीकर, सहसचिव वैभव जोशी, सुहास माने, मिरवणूक प्रमुख श्रीकांत अनगरकर, राजु कुरेशी, विजय नारायणपेठकर, जयकुमार देगांवकर, युवराज शेळके, लेझीम प्रमुख सोपान महिंद्रकर, रोहित उत्तरकर, ओंकार वाले, सागर शहापुरकर, अभिजित छत्रबंद, प्रसिद्धीप्रमुख अभिषेक रंपुरे, रिदम देशपांडे, संदीप शहापुरकर, शिवानंद येरटे, वर्गणी प्रमुख नंदकुमार कुमठेकर, युवराज केंगनाळकर, गणेश भोसले, श्रीराम महिंद्रकर, मकरंद जाधव, पुजा समिती ओंकार वाले, राचप्पा स्वामी, ओंकार स्वामी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. याप्रसंगी विलासराव महिंद्रकर, चंद्रकांत सोहनी, राम तडवळकर, अशोक महिंद्रकर, अरुणराव महिंद्रकर विनायक महिंद्रकर, प्रसाद कुमठेकर, दळदे, विकी माने, ज्ञानेश्वर महिंद्रकर, देविदास उत्तरकर, विकी छत्रबंद, अनिरुद्ध पाटील, संतोषकुमार घोडके, सुभाष माने, बडवणे, शहापुरकर, सागर बडवणे, सुनील शहापुरकर, मंठाळकर, शिवा शहापुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



### उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त खाऊ वाटप

**अक्कलकोट, दि. २७ जुलै-**

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनां चांगले आरोग्य व दिर्घायुष्या करिता रवि डोके मित्र परिवार यांच्यावतीने शिवसैनिकांच्या उपस्थितीमध्ये बुधवार पेठ येथील स्वामीच्या समाधी मठात आरती करण्यात आली. मूकबधिर निवासी शाळेत माजी शहरप्रमुख व शिक्षण मंडळ सदस्य रवी डोके यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. याप्रसंगी माजी तालुकाप्रमुख मनोज पवार, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष आयाज जमादार, माजी शहर प्रमुख स्वामीराव मोरे, शेतकरी सेनेचे बापू गवडागुजा, माजी शहर प्रमुख स्वामीराव मोरे, माजी उपप्रमुख श्रीशैल पाटील, गंगाधर धोत्रे, संतोष गद्दी, चंद्रकांत पाटील, धनराज चव्हाण, मुख्याध्यापक कोरे, स्वामी, सुतार, सय्यद शिंदे उपस्थित होते.




### आपुलकी प्रतिष्ठानतर्फे ३० गरजूंना अत्यावश्यक वस्तूंचे किट भेट

**सांगोला, दि.२७ जुलै-**

मूळच्या सांगोला येथील रहिवासी व सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबईच्या असिस्टंट इंजिनियर मृण्मयी श्रीराम जोशी यांनी आपल्या ३० व्या वाढदिवसानिमित्त मदत करण्याचे ठरवून त्यांनी सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानच्या माध्यमातून चादर, बेडशीट, टूथपेस्ट, टूथब्रश, फिंगरकेक, साबण व पेन अशा वस्तूंचे किट ३० गरजू मुलींना भेट दिले. यावेळी मृण्मयी जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जोशी कुटुंबीयांचा आपुलकी कडून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.भीमाशंकर पैलवान यांनी केले. कार्यक्रमाला आपुलकी प्रतिष्ठान सदस्य त्याचबरोबर श्रीराम जोशी, मंजिरी जोशी, नंदकुमार राऊत, लाभार्थी मुली व त्यांचे पालक उपस्थित होते.

# उजनीतून १५ हजार विसर्ग सुरू

## नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२७ जुलै-**

भीमा खो-यासह घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस सुरू असल्याने उजनी धरण साखळीतील आठ धरणातून सुरू असलेल्या विसर्गात वाढ होत शनिवार दि.२६ रोजी सायंकाळी सहा वाजता १२ धरणातून पाणी सोडण्यात आले. त्यामुळे उजनीत बंडगार्डनहून १२४०१ ने येणाऱ्या विसर्गात वाढ होऊन २२०५५ क्युसेकने तर दौंड ६२७५ ने सुरु असलेल्या विसर्गात तिप्पट वाढ होऊन १७२२५ क्युसेकने उजनीत पाणी जमा होऊ लागले आहे.

शुक्रवारी रात्री उजनीतून रात्री १० हजार क्युसेकने सुरु असलेल्या विसर्गात शनिवारी दुपारी तीन वाजता ५ हजार ने वाढ करून उजनीच्या नदीपात्रात १५ हजार क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला आहे. नीरा नरसिंगपूर मध्ये १७२७९ क्युसेक वेगाने पाणी वाहत आहे.

धरणातून सोडलेला विसर्ग : भीमा नदीत विसर्ग १५ हजार क्युसेक, वीज निर्मिती विसर्ग १६०० क्युसेक, मुख्य कालवा ११०० क्यूसेक, भीमा-सीना बोगदा ४०० क्यूसेक, सिनामाढा सिंचन योजना १८० क्युसेक, दहीगाव सिंचन योजना ८० क्युसेक्स, वीर धरणातून नीरा नदीत ५३२८ क्युसेक विसर्ग सोडण्यात आलेला आहे. बंडगार्डन २२०५५ क्युसेक, दौंड १७२२५ क्युसेक, नीरा-नरसिंगपूर-१७२७९क्युसेक, पंढरपूर-३८७४ क्युसेक.

पंढरपूर विसर्ग ३८७४ क्युसेकने वाहत असून रविवारी संध्याकाळपर्यंत पंढरपूरात जवळपास २० हजार क्युसेकने विसर्ग राहीला. घाटमाथ्यावर व उजनी धरण साखळीतील धरण क्षेत्रासह भीमा खोऱ्यात पावसाची संततधार कायम राहिल्यास मोठ्या प्रमाणावर विसर्ग सोडण्याची शक्यता असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पाच वाजता सोडलेला विसर्ग : वडज ५००, विसापूर २४, चिल्हेवाडी १३८८, कळमोडी २६६४, चासकमान ७७८०, वडीवळे २६९४, आंद्रा १७२९, पवना ७१७०, कासार साई १४००, मुळशी १२२००, वरसगाव १६७२, खडकवासला १७१०. शनिवार २६ जुलै २०२५ सायंकाळी ६ वा. पाणी पातळी ४९६.६७० मिटर, एकूण साठा - ११४.७६ टीएमसी, उपयुक्त साठा ५१.१० टीएमसी, टक्केवारी ९५.३९ टक्के, दौंड येणारा विसर्ग २०३२८ क्यूसेक.

# सांगली जिल्हाधिकाऱ्यांचा एचआयव्ही बाधितांसाठी पुढाकार

## जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या पुढाकारातून वधू-वर मेळावा; २५० जणांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ जुलै-**

सांगलीमध्ये एचआयव्ही पॉझिटिव्ह लोकांसाठी जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या पुढाकारातून वधू-वर परिचय मेळावा घेण्यात आला. यामध्ये सांगली, कोल्हापूर, सातारा यासह मराठवाडा, विदर्भ, गुजरात, कर्नाटक व मध्य प्रदेशातूनही सुमारे २५० विवाह इच्छुक एचआयव्ही पॉझिटिव्ह लोक सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी सांगली व आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम

### नाविन्यपूर्ण प्रयोग

हाती घेण्यात आला. पुढील पंधरा दिवसांत एकमेकांना संमती दिलेल्या वधू-वरांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त होणारा आहे. त्यानंतर त्यांच्या विवाहाचे दिवशी त्यांना काही भेट देता येईल का यासाठी प्रायोजक शोधण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. सांगलीच्या मराठा सेवा संघाने त्यांचे सभागृह व इमारत या उपक्रमासाठी मोफत दिली. त्याबद्दल सेवा संघाचे जिल्हाधिकारी काकडे यांनी धन्यवाद मानले. शासनाचा कोणताही खर्च न होता हा उपक्रम जिल्हाधिकारी काकडे यांनी राबवला. या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी पुढाकार घेतल्याबद्दल जिल्हाधिकारी काकडे यांचे समाजातून अभिनंदन होत आहे.

# वेळापूरमध्ये २२ अवैध दारू विक्रेत्यांना दणका

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २७ जुलै-**

वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीत चोरून वारंवार अवैध दारू विक्री करणारे इसमांवर प्रतिबंध व्हावा व त्यांनी भविष्यात अवैध दारू विक्री करू नये याकरिता त्यांच्याकडून जास्तीत जास्त रक्कमेचे व दीर्घ मुदतीचे बंधपत्र घेण्याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज यांच्यामार्फत उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलूज यांच्याकडे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ९३ प्रमाणे एकूण २२ प्रस्ताव जून २०२५ मध्ये पाठविण्यात आले होते. उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस यांच्या कार्यालयाकडून वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील २२ अवैध चोरून दारू विक्री करणारे इसमांची सुनावणी नोटीस बजावणी करिता वेळापूर पोलीस स्टेशन येथे प्राप्त झाले होते. सदरची सुनावणी नोटीस संबंधित इसमांना शनिवार रोजी बजावण्यात आल्या आहेत. उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलूज यांच्या कार्यालयाकडून नमूद प्रस्तावाची सुनावणी होणार आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दरम्यान २८ अवैध चोरून दारू विक्रेते यांच्याविरुद्ध प्रस्ताव पाठवून त्यांना माळशिरस तालुक्यात न राहण्याबाबत व न येण्याबाबत उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस यांच्याकडील प्राप्त आदेश बजावून त्यांना माळशिरस तालुक्यातून बाहेर पाठवले होते.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज नारायण शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी तसेच वेळापूर पोलीस अंमलदार यांनी सदरची कारवाई केली आहे.

> वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीत चोरून अवैध धंदे करणारे इसमांची माहिती मिळताच त्यांच्यावर तात्काळ कारवाई करून गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी पथक नेमण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज नारायण शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी तसेच वेळापूर पोलीस अंमलदार यांनी सदरची कारवाई केली आहे.
>
> **- भाऊसाहेब गोसावी**
> **वेळापूर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी**

# गुटखाबंदीची प्रभावी अंमलबजावणी होणार का?

## तरुणाईला वाचवणार का? सर्वसामान्यांचा सरकारला सवाल

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.२७ जुलै-**

महाराष्ट्रात गुटख्याची विक्री व तस्करी करणाऱ्यावर शासन यापुढे मोका अंतर्गत कारवाई करणार असल्याचे अन्न व प्रशासनमंत्री नरहरी झिरवळ यांनी नुकत्याच झालेल्या अधिवेशनात घोषणा केली.पण याची संपूर्ण महाराष्ट्रात प्रभावीपणे अमंलबजावणी होऊन व्यसनाधीन तरुणाई व इतर यावर चपराक बसेल का? या निर्णयामुळे खरेतर तरुण पिढीतील, शाळा, कॉलेज मधील व्यसनाधीन मुलांच्या पालकांना खरेतर अतिशय आनंद झाला आहे. पण याची प्रभावीपणे अमंलबजावणी होणार का प्रश्न ते शासनाला विचारीत आहेत.

याबाबत खरेतर शासन गुटखा विक्रेत्यावर कारवाई करते पण तो गुटखा कुठून येतो तो खरा गुन्हेगार आहे. सदरच्या गुटखा व्यापाऱ्यावर निश्चित कोणाचा वरदहस्त आहे हे पाहणे अत्यंत गरजेचे असून जोपर्यंत गुटख्याच्या मोठ्या प्रमाणावर विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई होत नाही तोपर्यंत महाराष्ट्रात गुटखा विक्री बंद होणार नाही. शेजारच्या कर्नाटक राज्यातून मोठ्या प्रमाणावर गुटखा महाराष्ट्रात येतो असे व्यापाऱ्यामधुन बोलले जात आहे. महाराष्ट्रात शहरी तसेच ग्रामीण भागात गुटख्याची मोठ्या प्रमाणावर विक्री सुरू आहे. यावर कोणाचाच वचक नाही. शासनाच्या गुटखाबंदीच्या निर्णयाची शहर व ग्रामीण भागात फक्त चर्चा सुरु आहे. तोपर्यंतच विक्रेत्यांनी दुपटीने दरवाढ केली आहे. तर काहीजण गुटखाच मिळत नाही या नावाखाली प्रचंड दरवाढ करत आहेत. याची महाराष्ट्रात प्रभावीपणे अमंलबजावणी झाली तर व्यसनाधीन झालेली तरुणाई निश्चित वाचेल.




सोलापूर : येथील द्वारकाधीश मंदिरात गुणवंत विद्यार्थ्यांसह उपस्थित मान्यवर.

# ब्राह्मण समाजातील गुणवंतांचा ब्रह्म प्रतिष्ठानकडून गौरव

## द्वारकाधीश मंदिरात सोहळा; शहर, जिल्ह्यातील १३० विद्यार्थ्यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ जुलै-**

येथील ब्रह्म प्रतिष्ठानकडून सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील ब्राह्मण समाजातील १३० गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र आणि शैक्षणिक साहित्य देऊन सन्मान करण्यात आला. ब्रह्म प्रतिष्ठानकडून दरवर्षी हा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमाला समाजातून यंदा जोरदार प्रतिसाद मिळाला.

द्वारकाधीश मंदिरात शनिवारी (ता. २६) सायंकाळी समाजातील पहिली ते महाविद्यालयीन स्तरातील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.

इंडियन मॉडेल स्कूलचे संस्थापक ए. डी. जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुख्याध्यापक नितीन कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर ब्रह्म प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुहास देशपांडे, वामन कुलकर्णी, द्वारकाधीश मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक, प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुजाता देशपांडे यांची उपस्थिती होती. सुहास देशपांडे यांनी प्रास्ताविकात ब्राह्मण समाजातील गुणवंतांचा सत्कार करण्यामागची भूमिका विशद केली. कार्यकारिणी सदस्य दत्ता आराध्ये यांनी सूत्रसंचालन केले. भरत काटीकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वाती कुलकर्णी, श्रीपाद दीक्षित, राघवेंद्र कुलकर्णी, सुनील देशपांडे, पियुषा देव आदींनी परिश्रम घेतले.

### बांधकामावर पाणी मारताना करंट लागून तरुण जखमी

**सोलापूर** - बांधकामावर पाणी मारताना करंट लागून तरूण जखमी झाला. सुनिल भानुदास गायकवाड (वय २९, रा. वडजी, ता. दक्षिण सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २७ जुले रोजी दुपारी १२ च्या सुमारास सुनिल गायकवाड हा भगवान नगर झोपडपट्टी मध्ये घराच्या बांधकामावर पाणी मारण्यासाठी बोअरचे बटन चालू करण्यासाठी गेल्यावर त्याच्या हातास करंट लागून गंभीर जखमी झाला. त्यामुळे सुनिल गायकवाड यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### घरजागेच्या वादातून मारहाणीत एक जखमी

**सोलापूर** - घरजागेच्या वादातून झालेल्या मारहाणीत एकजण जखमी झाला. विजय किसनसिंग चौधरी (वय ४५, रा. सत्यनारायण सोसायटी, जुळे सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २७ जुलै रोजी दुपारी १२ च्या सुमारास राहत्या घराजवळ घरजागेच्या वादातून विजय चौधरी यास लक्ष्मण माळी, श्रीकांत कोळी व इतर ३ जणांनी मिळून माती काढण्याचा टिकाव व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. त्यामुळे विजय यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# माळशिरसमध्ये रोजगार हमीची बिले दीड वर्षापासून प्रलंबीत

## लवकरच तोडग्याचे नायब तहसीलदारांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२७ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामाची कुशल बिले शेतकऱ्यांनी रितसर मागणी करुनही जानेवारी २०२४ पासून अद्यापही मिळालेली नाहीत. शेतकरी याबाबत तहसील कार्यालयात तसेच पंचायत समिती कार्यालयात जवळपास दीड वर्षापासून हेलपाटे मारीत आहेत.

यामध्ये सोलापूर जिल्हयातील माळशिरस तालुका वगळता इतर सर्वच तालुक्यातील बिले शेतकऱ्यांना तीन वेळा मिळाली आहेत. फक्त माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांनचीच बिले मिळाली नाहीत. याला जबाबदार कोण असा प्रश्न लाभार्थी शेतकऱ्यांनमधून प्रशासनाला विचारला जात आहे. माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांनाच वेगळे नियम आहेत का असा प्रश्न लाभार्थी शेतकऱ्यांनमधुन प्रशासनाला विचारला जात आहे. याबाबत शेतकऱ्यांनी अक्षरशः तहसीलदार, गटविकास अधिकारी व इतर अधिकाऱ्यांचे उंबरठे झिजविले आहेत. तसेच याबाबत खा.धैर्यशील मोहिते - पाटील, आमदार उत्तमराव जानकर, माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्याकडे सुद्धा याबाबत आपली कैफीयत मांडली आहे. तरीही अधिकाऱ्यांनी बिलाचा प्रश्न मार्गी लावला नाही. याबाबत भाजपचे नेते तथा माजी पंचायत समिती सदस्य के .के. पाटील यांनी या शेतकऱ्यांच्या बिलाबाबत नायब तहसीलदार कदम यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांची कूशल बिले राहील्याचे मान्य करीत लोकसभा निवडणुक, विधानसभा निवडणुकीच्या कामात गुंतलो असल्यामुळे तर गेल्या आठवड्यात माळशिरस वगळता जिल्हयातील इतर सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांची बिले मिळाली आहेत पण माळशिरसचे तहसीलदार रजेवर असल्यामुळे डिएसी लॉगीन न झाल्यामुळे गेल्या आठवडयात बिले मिळु शकली नाहीत असे सांगितले. आपण याबाबत लवकरच तोडगा काढु असे त्यांनी सांगितले.



# पंढरपुरात शासकीय सेवेत रुजू झालेल्यांचा राष्ट्रवादीतर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ जुलै-**

एमपीएससीद्वारे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागात सहाय्यक अभियंता झालेल्या राहुल धनवडे तसेच भाळवणी येथे आरोग्य सेवकपदी निवड झालेल्या अमित बागल यांचा पालकांसह राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उद्योग व व्यापार विभागातर्फे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

धनवडे व बागल यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सर्व विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन करावे अशी अपेक्षा श्री. फाटे यांनी व्यक्त केली.

यावेळी श्री विठ्ठल अर्बन बँकेचे सचिव रमेश फाटे, मॅनेजर संग्राम कापसे, एन.पी.कन्ट्रक्शन कंपनीचे मॅनेजर निवृत्ती भाटकर, विनायक शिंदे, ज्ञाने'येर पवार, किशोर नपते, शरद थिटे, समाधान कांबळे, समाधान बागल, आरोग्यसेवक अमित बागल यांच्या मातोश्री वर्षाराणी बागल, स्वप्नाली घोडके, हर्षा सुतार, श्रीधर पिसे, शुभम करे यांच्यासह श्री विठ्ठल अर्बन बँकेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# वैराग परिसराला पावन करणारे संतनाथाचे संजीवन समाधी मंदिर

**श्रावण विशेष**

**तभा वृत्तसेवा। रामदास पवार**
**वैराग, दि. २७ जुलै-**

श्री सच्चिदानंद संतनाथ महाराज हे वैराग नगरीचे आराध्य दैवत असून महाराजांचा प्रवास हा नेपाळ प्रांतातून सुरू झाला. संतनाथ महाराज हे नाथ संप्रदायातील असून मच्छिंद्र गोरक्षनाथ यांच्या रूपात विराजमान आहेत. संतनाथ महाराज मार्गक्रमण करीत करीत ते महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या सानिध्यात आले. त्यानंतर वैराग येथील नगरीत साधनेस जाण्याचा आई तुळजाभवानीने आदेश दिला. त्यावेळी वैराग नगरी दंडकारण्यामध्ये विराजमान होती.

या दंडकारण्यामध्ये हिंस्र पशु, पक्षी ही होते. एक नदी ही वाहत होती. त्यामुळे संतनाथ महाराजांचा मुक्काम या नगरीत वाढला. संतनाथ महाराजांनी याच अभयारण्यात आपली साधना सुरू केली. त्यावेळी काही गुराखी पशु चालण्यासाठी अभयारण्याच्या आसपास येत होते. त्यामध्ये तात्याबा घोंगडे हे देखील होते. तात्याबा घोंगडे यांना साधुसंतांची सेवा करायला खूप आवडत असे, त्यांनी संतनाथ महाराजांना पाहिल्यानंतर त्यांच्या सेवेत रममाण झाले. त्यांची भक्ती आणि निष्ठा पाहून पुढे संतनाथ महाराजांनी त्यांच्यावर प्रसन्न होऊन लक्ष्मीपुत्र असे वरदान दिले. त्यानंतर संतनाथ महाराजांची जाण्याची वेळ आली त्यावेळेस घोंगडे यांनी संतनाथ महाराजांना थांबण्याची विनंती केली. त्या विनंतीचा मान करून महाराजांनी सध्याच्या मंदिरात संजीवन समाधी घेतली. संतनाथ महाराजांना अष्टसिद्धी प्राप्त असल्यामुळे एकाच वेळी आठ ठिकाणी प्रकट होऊ शकत, त्यांच्या आशीर्वादानेच तात्याबा घोंगडे यांनी संतनाथ महाराजांची बरीच मंदिरे व घाट बांधले. आजही ती बघायला मिळतात. संतनाथ महाराजांच्या संजीवन समाधीनंतर तेथे भव्य दिव्य मंदिर उभारण्यात आले. त्यांच्यानंतर नाथ संप्रदायाचे अनेक विद्वान साधुसंत या मंदिरात येऊन गेले आहेत. त्यात फुलनाथ, भूतनाथ त्रिवेणीनाथ महाराजांचा समावेश आहे. महाराजांच्या या यात्रेचा इंग्रजांच्या गॅझेट बुकमध्ये देखील समावेश आहे. राज्यातील सर्वात मोठी चौथ्या क्रमांकाची यात्रा अशी नोंद या गॅझेट मध्ये आढळते.हे मंदीर प्राचीन असुन मंदीराची संपूर्ण बांधणी हेमाडपंथी दगडी आहे. हे मंदिर इ.स १६०२ मधील असुन मराठा कालखंडातील उल्लेख आढळतो. या मंदिरात संतनाथ महाराज यांची संजीवन समाधी घेतली आहे.असा इतिहासात दाखला मिळतो.या मंदीरावर उत्कृष्ट दगडी कलाकृती पाहून मन प्रसन्न होते.मंराच्या आतील मोकळ्या परीसरात नयनरम्य फुलांचा बगीचा भाविक भक्तांच्या सहकार्यतुन साकरण्यात येत आहे. श्री सच्चिदानंद संतनाथ महाराजांचा संजीवन समाधी सोहळा म्हणजे यात्रा श्रावण शुध्द नारळी पौर्णीमेला हा मुख्य दिवस संजीवन समाधी सोहळा म्हणून साजरा केला जातो. श्रावण महिन्यातच यात्रेचे पाच दिवस कार्यक्रम चालतात सर्व मानकरी एकत्र येऊन ही यात्रा साजरी केली जाते. सर्व जाती धर्माच्या लोकांना या यात्रेत मानकरी म्हणून मानाचे स्थान दिले जाते. संतनाथ महाराजांच्या अनेक आख्यायिका प्रसिद्ध असून भाविक भक्तांच्या मदतीला धावून येणारे जागृत देवस्थान म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे.



श्री सच्चिदानंद संतनाथ महाराज

CMYK

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड,
परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मचाले यांना सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी पदोन्नती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२७ जुलै-**

गुळपोळी (ता. बार्शी) चे सुपुत्र पोलीस निरिक्षक समाधान हनुमंत मचाले यांची सहायक निरीक्षकपदी पदोन्नती झाली आहे. समाधान मचाले हे पोलीस उपनिरीक्षक पिंपरी चिंचवड आयुक्तालय निगडी पोलीस स्टेशन पुणे येथे कार्यरत होते. त्यांच्या पदोन्नती सोबतच बदलीही करण्यात आली असून त्यांना आता पुण्यातील अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, पुणे येथे पदोन्नती झाली आहे. पाच हजार पोलीस उपनिरीक्षकांना सहायक निरीक्षकपदी पदोन्नती मिळाली आहे. ३४१ पोलिसांना पदोन्नती मिळाली आहे. यासोबतच त्यांच्या बदल्याही करण्यात आल्या आहेत. पोलीस महासंचालकांनी याबाबत



आदेश जारी केले आहेत. समाधान मचाले हे पुणे शहर ७ वर्ष तर पिंपरी चिंचवड १ वर्ष सेवा केली आहे. त्यांचा प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ सेवाभाव आजच्या तरुण पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे. पदोन्नती झाल्याबद्दल सर्व स्तरावरुन शुभेच्छाचा वर्षाव व अभिनंदन होत आहे.

## महत्वाचे...

### आषाढी वारीतील सेवेबद्दल सरपंचांचा आज होणार पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

**पंढरपूर, दि.२७ जुलै -**

आषाढी यात्रा २०२५ अंतर्गत पुणे , सातारा व सोलापूर जिल्ह्यातील पालखी मार्गावर तसेच पंढरपूर शहर या ठिकाणी भाविकांना चांगली सेवा दिलेबद्दल सोमवारी दि. २८ जुलै रोजी शासकीय अधिकारी, पालखी मार्गावरील सरपंच तसेच कर्मचारी यांचा सन्मान करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सकाळी साडेअकरा वाजता येथील कराड रस्त्यावरील श्रीयश पॅलेस, नवीन कराड नाक्या जवळ पंढरपूर येथे आयोजिण्यात आलेला आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### लघुउद्योग देश विकासाचा पाया बनवा; कृषीकन्यांचे आवाहन

**वेळापूर, दि.२७ जुलै-**

देशातील लघु उद्योगाचा विकास व्हावा अशी इच्छा सगळ्यांच्या मनात असली पाहिजे या उद्योगाचे स्वरूपच बदलले पाहिजे, लघु उद्योगाचा विकास होऊन तो देश विकासाचा पाया बनावा असे मत कृषीकन्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित रत्नाई कृषी महाविद्यालय अकलूज आयोजित ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत व्यक्त केले. एखाद्या उद्योगात टिकून राहायचे असेल, व्यवसायात यशस्वी व्हायचं असेल तर सतत व्यवसायाचा विकास करत राहणे गरजेचे आहे. व्यवसायासाठी आपल्याला काही महत्त्वपूर्ण परवाने जरुरीचे आहेत याबद्दल कृषीकन्यांनी माहिती दिली. घरबसल्या आपण बजेटमध्ये सोपे असतील असे कित्येक पदार्थ चे व्यवसाय करू शकतो. त्यात केळी वेफर्स, पनीर बनवण्याच्या योग्य पद्धत सांगणे महिलांना कामातून वेळ काढून करण्या योग्य या व्यवसायाचे महत्त्व पटवून दिले. अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. जी.नलावडे, प्रा. एम.एस. एकतपुरे, कार्यक्रम समन्वयक अधिकारी प्रा. एम.एम. चंदनकर, कार्यक्रम अधिकारी प्रा. एच.व्ही. कल्याणी यांच्या मार्गदर्शनानुसार कृषिकन्या श्रुती पाटोळे, योगिता भोईटे, सानिका जगदाळे, प्रतीक्षा शिखरे, साक्षी कहाकर, रोहिणी रेड्डी, प्रणोती देशमुख, तनुजा घुले, वैशाली खिलारे यांनी प्रात्यक्षिक दिले.



### प्रा.प्रबुद्धचंद्र झपके डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्काराने सन्मानित

**सांगोला, दि.२७ जुलै-**

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांना सोलापूर येथील ड्रीम फाऊंडेशनचा डॉ.कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सोलापूर येथे द्वारकाधिश मंदिरात रविवार दि.२७ जुलै रोजी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या १० व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ.अशोक नगरकर व मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. शैक्षणिक उपक्रम राबवत गुणवत्ता आणि संस्कारक्षम विद्यार्थी घडवण्याचा ध्यास घेत त्यांनी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचा गुणवत्तेचा आलेख उंचावत ठेवला आहे. या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यापूर्वी प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचा तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पुरस्कारासह जीवनगौरव पुरस्काराने सन्मान झाला आहे.



### सिंहगडमध्ये ओरिएंटेशनमध्ये मार्गदर्शन

**पंढरपूर, दि. २७ जुलै -**

येथील एस. के. एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशनतर्फे द्वितीय वर्ष बी.टेक विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय प्रारंभिक मार्गदर्शनपर कार्यक्रम झाला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी मागदर्शन केले. विभागप्रमुख डॉ. अल्ताफ मुलाणी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मुलाणी यांनी विभागाची ओळख, संस्थेचे ध्येय व मूल्ये, तसेच येणाऱ्या शैक्षणिक वर्षातील संधी आणि जबाबदाऱ्या याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी यांनी महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी परिश्रम घेतले.

# ‘दक्षिण’मध्ये घरकुल उद्दीष्टपूर्तीसाठी धावाधाव

### सुट्टीच्या दिवशीही काम; बीडीओंचा ग्रामसेवकांकडे पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

राज्यातील बेघरांना निवारा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ड्रीम प्रोजेक्ट असणाऱ्या पंतप्रधान व मोदी आवास योजनेतील घरकुल उद्दीष्ट पूर्तीसाठी दक्षिण पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी शंकर कवितके यांनी कार्यालयीन सुट्टीत शनिवार व रविवारीही ग्रमसेवकांच्या बैठका घेऊन टार्गेट पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला आहे.



सध्या शनिवार व रविवारी दोन दिवस ग्रमसेवकांच्या बैठका आयोजित करून दक्षिणमधील घरकुल टार्गेट पूर्ण करण्यासाठी ते कार्यालयात ठाण मांडून कामकाज करीत आहेत. त्यामुळे दक्षिणचे बीडीओ बेघरांना घरकुल मिळवून देण्यासाठी दक्ष असल्याने त्यांचे कौतुक होत आहे. अक्कलकोटचे गटविकास अधिकारी शंकर कवितके यांनी दक्षिणचा पदभार घेतल्यापासून दक्षिणसाठी २०२४-२५ मध्ये ४ हजार ९३१ व २०२५-२६ मध्ये ५ हजार ४८५ घरकुल मंजूर झाली आहेत. प्र.बीडीओ कवितके यांनी तालुक्यातील घरकुल टार्गेट पूर्ण करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार वारंवार ग्रामसेवाकांच्या बैठका आयोजित करून गरजू लाभार्थ्यांना घरकुल मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवला आहे. सरकारने दोन टप्यात जिल्ह्यात एक लाखापर्यंत घरकुल मंजूर केल्यानंतर दक्षिण तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी १० हजार ४१६ घरकुल मंजूर झाले. त्यानंतर बीडीओ कवितके यांनी विस्तार अधिकारी व ग्रामसेवकांच्या बैठका घेऊन घरकुल उद्दीष्ट पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. फेब्रुवारी महिन्यातील घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी व जून महिन्यात नव्याने मंजूर झालेल्या घरकुलांचे बांधकाम सुरू करण्यासाठी सध्या ग्रामसेवकांच्या बैठकांचा सपाटा सुरू आहे.



**गरजूंना निवारा मिळवून देण्याचे उद्दीष्ट**

दक्षिणमधील बेघरांना निवारा मिळवून देण्यासाठी सरकारने १० हजार ४१६ घरकुल मंजूर केले आहेत. अक्कलकोट व दक्षिण असे दोन तालुक्यांचा पदभार असल्याने शनिवार व रविवार सुट्टीच्या दिवशी बैठक घेऊन ग्रामसेवकांना घरकुलांचे उद्दीष्ट पूर्ण करण्याचे काम होत आहे. बांधकाम पूर्ण केलेल्यांना बिल देण्यसाठी व नवीन लाभार्थ्यांना बांधकाम पूर्ण करण्यासाठी सूचना देण्यात आली आहे.

**- शंकर कवितके, प्रभारी गटविकास अधिकारी, दक्षिण सोलापूर**



**वरीष्ठांच्या आदेशानुसार कामकाज**

कार्यालयीन कामकाजाबरोबर घरकुल उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी बीडीओ शंकर कवितके यांचा पाठपुरावा सुरू आहे. वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार शनिवार व रविवार सुट्टीतही एक हजारपेक्षा अधिक लाभार्थ्यांची पूर्तता करण्याचे काम केले आहे. बीडीओंच्या आदेशानुसार ग्रामसेवक प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचुन उद्दीष्टपूर्तीसाठी प्रयत्न करीत आहेत.

**- गुलाबचंद शहा, ग्रामपंचायत अधिकारी, बोरामणी**

पहिल्या टप्यातील घरकुलांचे बांधकाम पुर्ण करून दुसऱ्या व तिसऱ्या टप्यातील बिल देण्यासाठी प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. याशिवाय महिन्यापूर्वी मंजूर झालेल्या घरकुलांचे बांधकाम सुरू करण्यासाठी कर्मचारी व ग्रामसेवकांकडून वेळोवेळी माहीती घेऊन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम सुरू करण्यसाठी ते बैठका घेत आहेत.

**सरपंचांचे घरकुल उद्दीष्टासाठी सहकार्य अपेक्षित**


ग्रामपंचायत पातळीवर संबंधित गावातील सरपंचांनी कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी गावप्रमुख या नात्याने सरपंचांनी सहकार्य करणे अपेक्षित आहे. त्यामुळे संबंधित सरपंचांनी गावातील लाभार्थ्यांकडून कागदपत्रांची पूर्तता वेळेत करणे गरजेचे आहे.

## जिल्ह्यातील ११ ग्रामपंचायतींना कार्यालय बांधण्यास निधी मंजूर

### चेतनसिंह केदार सावंत यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२७ जुलै-**

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज सुलभ होण्यासाठी ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा घटकांतर्गत नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत आणि नागरी सुविधा केंद्र खोली बांधण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्ह्यातील ११ ग्रामपंचायतीना निधी मंजूर केला असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.



ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या तीन हजारपेक्षा अधिक आहे आणि त्यांना स्वमालकीची ग्रामपंचायत इमरत नाही, अथवा धोकादायक व मोडकळीस आलेली आहे अशा ग्राम पंचायतींचे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना केंद्र शासनाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात दिल्या होत्या. संचालक, पंचायत राज यांनी वरील निकषानुसार ग्रामपंचायतींची यादी मागविली होती. वार्षिक कृती आराखड्यानुसार अशा नवीन ग्रामपंचायत इमारत व नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामास पायाभूत सुविधा घटकांतर्गत मान्यता दिली आहे.

बार्शी तालुक्यातील मालवंडी, करमाळा तालुक्यातील घोटी, झरे, पोथरे, माढा तालुक्यातील बेंबळे, अरण, सांगोला तालुक्यातील आलेगांव, पाचेगाव बु., वासुद, घेरडी, जुनोनी या ग्रामपंचायतींना इमारत बांधकामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी निधी मंजूर केला आहे.

**- चेतनसिंह केदार सावंत, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

## श्रीपतपिंपरीचे अमोल ताकभाते निलंग्याचे बीडीओ

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२७ जुलै-**

श्रीपतीपिंपरी (ता. बार्शी) येथील अमोल ताकभाते यांची निलंगा तालुक्याच्या गटविकास अधिकारीपदी नियुक्ती झाली आहे. यापूर्वी माढा पंचायत समितीचे सहायक गटविकास अधिकारी म्हणून ते कार्यरत होते. त्यांना बढती मिळाल्यानंतर बार्शीतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



श्री. ताकभाते हे बार्शीच्या शिवाजी महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून ते अधिकारी बनले. सर्वात पहिली पोस्टींग चंद्रपूर जिल्ह्यात झाली होती. बढतीबद्दल मित्र परिवाराकडून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## सांगोल्यातील कडलास नाका ते एसटी स्टँड येथील दुभाजकावर उपायोजना करा

### अशोक कामटे संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २७ जुलै-**

सांगोल्यातील वासूद चौक ते कडलास नाका रस्ता दुभाजक येथे उपाययोजना तात्काळ करावी या मागणीचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता यांना शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने देण्यात आले आहे अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष निलकंठ शिंदे यांनी दिली.

शहरातील कडलास नाका ते वासूद चौक येथील रस्ता दुभाजकाची अनेक वर्षापासून दयनीय दुरावस्था झाली आहे. या दुभाजकावर कोणतीही रिफ्लेक्टर नाहीत व उंची कमी असल्याने वारंवार अपघाताच्या घटना घडत आहेत. प्रसंगी वाहनधारकांना आपला जीव धोक्यात घालून वाहने चालवावी लागत आहे. त्यामुळे मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. रिफ्लेक्टर, स्ट्रीट लाईट बसवून या दुभाजकाची उंची वाढवावी व आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी संघटनेने केली आहे. या निवेदनाच्या प्रती तहसीलदार, मुख्याधिकारी, नगरपरिषद सांगोला यांनाही देण्यात आले आहेत. यावेळी सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते. सदरचा मार्ग राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे असल्याने या दुभाजक मार्गावरिल दुरुस्ती व इतर कामे करताना अडचणी येत आहेत. पण हा मार्ग लवकरच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरण झाल्यानंतर तात्काळ या दुभाजकाची समस्या व त्या अनुषंगाने दुरुस्तीची कार्यवाही



सदरचा रस्ता पीडब्ल्यूडी विभागाकडे असल्याने या परिसरात दुभाजकांमध्ये स्ट्रीटलाईट व इतर कामे करावयाची आहेत. पण त्याकरिता आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नाहरकत दाखला मागितला आहे. तो प्रलंबित आहे. मिळाल्यावर या दुभाजकावर सुशोभीकरण व स्ट्रीटलाईटची कामे सुरू करणार आहोत.

**- डॉ. सुधीर गवळी, मुख्याधिकारी, न.प.सांगोला.**

## धस पिंपळगावला सुजलाम, सुफलाम करण्यासाठी करणार जन्मभूमी प्रतिष्ठानच्या माध्यमातून मदत

### जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी घेतले धस पिंपळगावचे पालकत्व

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २७ जुलै -**

तालुक्यातील धस पिंपळगावला सुजलाम, सुफलाम बनवून राज्यातील आदर्श गाव बनवण्यासाठी विकसित गाव योजनेखाली धस पिंपळगाव दत्तक घेत असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी जाहीर केले. धस पिंपळगाव येथील पुरातन शिव मंदिराच्या आवारात जन्मभूमी प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या शिव वृक्ष लागवड या कार्यक्रमाच्या शुभारंभप्रसंगी कुलकर्णी बोलत होते. यावेळी पोलीस उपाधीक्षक जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, तालुका पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, भगवंत ब्लड बँकेचे चेअरमन शशिकांत जगदाळे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नानासाहेब धस, सरपंच तुळशीराम वायकर, माजी सरपंच ज्ञानेश्वर भालेकर, उपसरपंच अण्णासाहेब धस, ग्रामसेवक लोखंडे, सचिन धस, विजयसिंह पाटील, दादासाहेब चिपडे आदी मान्यवर उपस्थित होते.



धस पिंपळगावसाठी विविध उपक्रमातून वरदान ठरलेल्या जन्मभूमी प्रतिष्ठानच्या शिव वृक्ष लागवड कार्यक्रमासाठी आलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शशिकांत जगदाळे यांच्या आग्रहानुसार गावात आलो असल्याचे जाहीरपणे सांगत हे गाव पाहण्यासाठी राज्यातून लोक येतील, असे काम या गावात उभा करु, जन्मभूमी प्रतिष्ठानने गावात राबवलेल्या शिव मंदिर सभामंडप, माहेरची साडी, ग्रंथालय आधी उपक्रमांचे मुक्तकंठाने कौतुक करत या गावात पाण्याचे सिंचन करण्यासाठी विशेष प्रयत्न करु, अशी ग्वाही दिली. तसेच रेन हार्वेस्टिंग व जलसंधारणयातून गावातील शेती समृद्ध करत गावातील शेतकऱ्यांना विविध पिकांच्या लागवडीसाठी मार्गदर्शन करुन, विक्री व्यवस्थापन बनवून शेतकऱ्यांना जागेवरच योग्य भाव मिळेल अशी व्यवस्था करु, कमी व अवकाळी पाऊस यामुळे अडचणीत येणाऱ्या शेतकऱ्याला या संकटातून कायमस्वरुपी बाहेर काढण्यासाठी विविध फळांपासून सेंद्रिय शेतीपर्यंत अनेक आघाड्यांवर सक्षम बनवून गाव सुखी समाधानी व आनंदी बनविण्याचा निर्धार यावेळी कुलकर्णी यांनी व्यक्त केला. गावातले वाद-विवाद मिटवून कोणीही भांडण करु नये असा सल्ला देत कुलकर्णी यांनी गावकऱ्यांना जन्मभूमी प्रतिष्ठानच्या माध्यमातून होत असलेल्या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नानासाहेब धस यांनी प्रास्ताविकामध्ये गावात राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी प्रतिष्ठानच्यावतीने शिवमूर्ती भेट देऊन तर कार्यक्रमाला आल्याबद्दल ऋणनिर्देश करणारी स्मृतीचिन्ह ग्रामपंचायतच्यावतीने कुलकर्णी यांना देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कुलकर्णी यांच्या हस्ते शिव मंदिर सभा मंडपासाठी जमीन देणाऱ्या कृषीभूषण बाबासाहेब पाटील यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी सूत्रसंचालन प्रतिष्ठानचे सचिव स्वप्निल धस यांनी तर वैभव जगदाळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनाजी वाघमोडे, सुरज चंदनशिवे,सोहेल शेख, राहुल धस, डॉ. पवार, राम गरड यांनी परिश्रम घेतले.

## सारीका सलगर यांना आदर्श हिरकणी नारीरत्न पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २७ जुलै-**

थोर साहित्यिक डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मंगळवेढा येथील साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव मंडळाच्या वतीने दिला जाणारा २०२५ चा आदर्श हिरकणी नारीरत्न पुरस्कार निंबोणीच्या सारीका सलगर यांना जाहीर झाला आहे.



विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना व संस्थांना साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव मंडळाचे विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. सारीका सलगर या स्वतः डमडम चालवित आहेत. त्या गेल्या १५ वर्षापासून डमडम चालवित सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम करीत आहेत.

आजपर्यंत त्यांनी अनेक गरजू महिलांच्या पुढे जावून त्यांच्या अडीअडचणी सोडविल्या आहेत. त्यांना यापूर्वी विविध संस्थाकडून नऊ ते दहा पुरस्कार मिळाले आहेत. त्यांनी महिलांबाबतच्या विविध प्रश्नांवर वेळोवेळी प्रकाश टाकलेला आहे. शुक्रवार दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मंगळवेढा येथे त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचे मंडळाचे अध्यक्ष आकाश अवघडे यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### संजय धनशेट्टी यांच्या कार्याचा गौरव

**सोलापूर, दि. २७ जुलै-**

नवराष्ट्र बेस्ट एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर पुरस्काराने सन्मानित

नवभारत वृत्तपत्र समूहाच्या नवराष्ट्र बेस्ट एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर पुरस्काराने जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर संजय धनशेट्टी यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला . क्रीडा व युवक मंत्री दत्ता मामा भरणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आला. पुणे येथील तारवाडे क्लार्क वन येथील हॉटेल मध्ये शनिवारी हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. २०१२-२०१३ साली टंचाईमध्ये चांगले काम केल्याबद्दल तत्कालीन जिल्हाधिकारी गेडाम व तत्कालीन गृह मंत्री श्री शिंदे साहेब भारत सरकार ह्यांच्या हस्ते गौरवण्यात आले होते. २०१२ साली जिल्ह परिषदमध्ये आदर्श उपभियांता म्हणून ही गौरवण्यात आले होते.

### कालिका गणपती मंडळाच्या अध्यक्षपदी शशिकांत बिराजदार

**सोलापूर, दि. २७ जुलै-**

उत्तर कसब्यातील मसरे गल्ली येथील श्री कालिका गणपती मंडळ २०२५-२६ गणेशोत्सव करिता उत्सव अध्यक्षपदी शशिकांत बिराजदार यांची सर्वानुमतेल निवड करण्यात आली. यावेळी मंडळाचे मार्गदर्शक सिध्दाराम काशेट्टी, बसवराज गाबणे, अरुण मोरे, बाळासाहेब



तरकसबंद, शंकर कुलकर्णी तसेच अमर पाटील, लक्ष्मण कलागते, नागेश वडणे, गुरुशांत मोकाशी, सचिन लिगाडे, आनंद तोंडारे, सचिन भैरोपाटील, सचिन शिवशक्ती, गिरीश करकंटी, राजू शिवशेट्टी, यशोधन हरकारे, सचिन खंडरे, ओंकार म्हेत्रे उपस्थित होते. **इतर पदाधिकारी** पुढीलप्रमाणे - उपाध्यक्ष : सुनील हिरेमठ, रोहन गाबणे, कार्याध्यक्ष : ऋषिकेश पाथरीकर, खजिनदार : अजित पाटील, वैभव उळागड्डे, सचिव : महेश पंडित, प्रथमेश तुळजापुरकर, पूजा प्रमुख : रितेश पाथरीकर, रितेश भोगडे, आकाश पाथरीकर, योगेश मलगोंडा, वर्गणी प्रमुख: दिपक जाधव, प्रथमेश पाथरीकर, सिध्देश म्हेत्रे, स्पर्धा प्रमुख : दिपक राऊत, हेमंत हरकारे,अजित कुलकर्णी, संतोष घोडके, मिरवणूक प्रमुख : विठ्ठल कलागते, रणजित मोरे, शुभम उळागड्डे, महेश शिवशेट्टी, महाप्रसाद नियोजन प्रमुख : नागराज वेर्णेकर, गिरीश करकंटी, चेतन कुलकर्णी मल्लिकार्जुन पोतदार, प्रसिध्दी प्रमुख : चेतन लिगाडे, राकेश सुतार, रितेश हणमशेट्टी, अजिंक्य तोंडारे




### सुरवसे प्रशालेत श्रावण शुभारंभ; शारदा मातेचे पूजन

**सोलापूर, दि. २७ जुलै-**

श्रावण शुभारंभ शारदा मातेच्या पूजनाने होटगी रोडवरील सुरवसे प्रशालेमध्ये श्रावणाचा शुभारंभ सरस्वती मातेच्या पूजनाने झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी सजावट करून शारदा मातेच्या मूर्तीची पूजा केली. यावेळी प्राचार्या गीतांजली पिरगोंडे, शुभांगी सगर, जागृती सर्जेराव, शिल्पा शटकार, अपर्णा रास्ते, लक्ष्मी विरशेट्टी, सुज्ञानी म्हेत्रे, सुजित आग्रे, प्रदीप रेसबुड उपस्थित होते.

### महानगरपालिका सेवक पतसंस्थेच्या चेअरमनपदी शिरशेट्टी; पाटील व्हाईस चेअरमन

**सोलापूर, दि. २७ जुलै-**

सोलापूर महानगरपालिका वरिष्ठ श्रेणी सेवक पतसंस्थेच्या





चेअरमनपदी दाविद शिरशेट्टी व व्हा. चेअरमनपदी चतुरसेन पाटील यांची सर्वानुमते निवड झाली. पतसंस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेच्या अध्यक्षस्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणून सहकारी संस्थेचे सहाय्यक निबंधक भवर दत्तात्रय शहाजी होते. यावेळी सुरवसे सुभाष, विराजदार नागनाथ, देशमुख दिलीप , काकडे अंजली, सद्दीवाल विशालसिंह, विराजदार अशोक, गदवालकर राहुल, बंडगर लक्ष्मण, मोरे विद्यादेवी, इचगे शोभा, शिरसट शेषराव, बारड नागेश , केरूरकर प्रशांत आदी उपस्थित होते.

## निधन वृत्त...



### जनाबाई कुसेकर

**अक्कलकोट, दि. २७ जुलै-**

उडगी (ता. अक्कलकोट) येथील रहिवाशी जनाबाई दशरथ कुसेकर (वय ८५) यांचे रविवार, दि. २७ जुलै रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि. २८ जुलै रोजी दुपारी अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.



### मल्लिकार्जुन दिंडोरे

**सोलापूर, दि. २७ जुलै-**

संगमेश्वर महाविद्यालयातीन निवृत्त प्रयोगशाळा सहाय्यक व जुना संतोष नगर येथील मल्लिकार्जुन रेवणसिद्धप्पा दिंडोरे (वय ८०) यांचे रविवारी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुले व नातवंडे असा परिवार आहे.

# ‘बिझनेस टायटन्स’ पुरस्काराने महावितरणचा सन्मान

### प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत उत्कृष्ट कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

घरगुती वीज ग्राहकांना सुमारे २५ वर्ष मोफत वीज उपलब्ध करून देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी




महावितरणचा ‘रेडिओ सिटी बिझनेस टायटन्स अवॉर्ड’ने शनिवारी (दि. २६) फुकेत (थायलंड) येथे गौरव करण्यात आला. या सन्मानाबद्दल अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

‘विकसित भारत’चे उद्दिष्ट व भविष्यातील भक्कम अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या सुमारे १५० खासगी कंपन्या व सार्वजनिक उपक्रमाच्या कंपन्यांचे संचालक व प्रतिनिधींसाठी फुकेत येथे परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत ज्येष्ठ अभिनेते बोमन इराणी यांच्या महावितरणला पुरस्कार प्रदान करण्यात आला. महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार व विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी हा पुरस्कार स्विकारला.



देशातील १ कोटी घरगुती ग्राहकांना मोफत वीज उपलब्ध करून देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना जाहीर केली आहे. सुमारे ७५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूकीतून स्वतः ची वीज निर्मिती करण्यासाठी निवासी कुटुंबांना सक्षम करण्यात येत आहे. आतापर्यंत महाराष्ट्रात २ लाख ४२ हजार ७१४ घरगुती ग्राहकांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून, त्याची क्षमता ९१९ मेगावॅट आहे. तर या योजनेत सहभागी ग्राहकांना आतापर्यंत तब्बल १६८५ कोटी ४२ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या या उल्लेखनीय राष्ट्रीय कामगिरीची दखल घेत महावितरणचा गौरव करण्यात आला.

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत घरगुती ग्राहकांना छतावरील १ ते ३ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे दरमहा सुमारे १२० ते ३६० युनिटपर्यंत वीज मोफत मिळविण्याची संधी आहे. एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट व त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान थेट मिळत आहे. विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदराने कर्जाची सोय उपलब्ध आहे. गृहनिर्माण संस्था, घरसंकुलांसाठी विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन व कॉमन उपयोगासाठी ५०० किलोवॅटपर्यंत प्रति किलोवॅट १८ हजार रुपये असे कमाल ९० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे.

### शास्त्री नगरात एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २७ जुलै -**

शास्त्री नगर परिसरात एका व्यक्तीने दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. जाकीर अब्दुलसत्तार पल्ले (वय ४२, रा. मजरेवाडी, सोलापूर सध्या रा. शास्त्री नगर, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. २७ जुलै रोजी पहाटे पाचच्या पूर्वी जाकीर पल्ले यांनी राहत्या घरी अज्ञात कारणावरून जिन्याच्या लोखंडी सिलिंगला गळफास घेतला. ही बाब नातेवाईकांच्या निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी जाकीर यांना खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. राजेंद्र सैनी यांनी जाकीर पल्ले यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## मासिक पाळी म्हणजे सृष्टीचा उत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

मासिक पाळी ही शरीरातली एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. पण समाजात अजूनही या विषयी मोकळेपणाने बोलले जात नाही. म्हणून अनेकांच्या मनात ‘‘वयात येणं’’ म्हणजे काय ? शरीरात नेमके काय बदल



होतात ? या बदलांचा मनावर काय परिणाम होतो ? असे कधीही न विचारलेले प्रश्न, या वयात पण मनात खोल रुतलेले होते. दि. २६ जुलै २०२५ रोजी पी.एम. श्री. जि.प. शाळा, देगाव (मुली ) इयत्ता सहावी, सातवीतील मुलींसोबत मासिक पाळी या विषयावर राहुल बिराजदार यांनी संवाद साधतं पाळी म्हणजे विटाळ नव्हे तर ती सृष्टीचा उत्सव आहे असे त्यांनी सांगितले.

अनेक प्रश्नांची उत्तरे सहज समजतील अशा कृतियुक्त संवादातून मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. दैनंदिन जीवनातील अनेक उदाहरणं दिली, हसवलं, विचारायला प्रोत्साहन दिलं, आणि एकंदरीत त्यांनीही विश्वासाने मन मोकळं केलं. त्या दीड तासात, किशोरवयीन मुलींचं त्यांच्या शरीराशी असणारं मैत्रीचं नातं जोडायला मदत केली. शेवटी पाळी म्हणजे विटाळ नव्हे तर ती सृष्टीचा उत्सव आहे..! असा विचार बिंबवत पाळी गीताने सत्राचा शेवट केला. या सत्रात विशेषतः केंद्रप्रमुख आदरणीय लतीफ तांबोळी यांची सरप्राईज्ड व्हिझिट प्रेरणादायक ठरली. हे सत्र घेण्यासाठी दुसऱ्यांदा शाळेत बोलविल्याबद्दल शिक्षिका जयश्री मेलगे-पाटील यांचे विशेष आभार मानले. तसेच सहकार्याबद्दल मुख्याधापक लंबे, बिराजदार, कुलकर्णी आणि शरीराशी मैत्री केलेल्या किशोवयीन मुलींचे ही आभार मानले.

## बुद्धीला कष्टाची जोड दिल्यास जीवन समृद्ध : डॉ. चनगोंडा हविनाळे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै -**

जीवनात ध्येय ठेवून मार्गक्रमण केले पाहिजे. ज्यांना जी आवड आहे त्यात करिअर करावं, बुद्धीला झेपतं ते व्हावं. बुद्धीच्या जोरावर सर्वांगीण विकास होतो. त्यासाठी शिक्षणाची गरज आहे. हाच विचार वंदनीय दी. शि. कमळे गुरुजी यांचा होता. त्यासाठी त्यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यात शाळा, महाविद्यालय काढून विशेष करून मुलींच्या, वंचितांच्या शिक्षणाची सोय केली. गुरुजींनी समाजकारणातून लोकांना समृद्ध करण्यासाठी शिक्षणाचे माध्यम वापरले. अनेक दानशुरांच्या मदतीने यांच्या माध्यमातून संस्थेचे वैभव उभा केले. बुद्धीला कष्टाची जोड दिली की समृद्धीकडे वाटचाल होते, हा विचार मांडून चोवीस वर्षापूर्वी महाविद्यालय उभा केले, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ या संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सी. जी. हविनाळे यांनी केले.ते मंद्रूपमधील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. महाविद्यालयाचा वर्धपान दिन व नवोदित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ कार्यक्रमवेळी बोलत होते. यावेळी संस्था सहसचिव प्रा. सुबोध कोळी, संस्था विश्वस्त नागेश बिराजदार, समन्वयक प्रा.डॉ. जवाहर मोरे आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप व माजी प्रभारी प्राचार्य डॉ. जे.एल. मोरे यांचा सन्मान करण्यात आला. तासिका तत्त्वारील प्राध्यापकांचेही स्वागत करण्यात आले. सिद्धाराम तरडे या विद्यार्थ्यांने आपले अनुभव कथन केले. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ.दिपक देडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. एल. एम. कट्टिमनी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एम. टी. म्हेत्रे यांनी आभार मानले.

## महादेवांच्या वामांग भागातून प्रकटलेले तत्व म्हणजेच अर्धनारीश्वर रूप

### उत्तमजी महाराज यांचे प्रतिपादन

### संगीतमय शिवपुराण महाकथेत उलगडले आध्यात्मिक पैलू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

प्रकृतीतत्त्वाचे निर्माते भगवान महादेव आहेत. महादेवांनीच आपल्या वामांग भागातून स्त्रीतत्व म्हणजे साक्षात जगदंबा मातेचे स्वरूप प्रकट केले. त्यानंतर अविमुक्त काशी वृंदावन व पंढरपूर वैकुंठाचे निर्माण केले. जगाचा विनाश झाला तरी देवाने निर्मिलेल्या या पवित्र भूमी अशाच राहतील, असे प्रतिपादन उत्तमजी महाराज यांनी केले.

मारवाडी युवा मंच मिडटाउन महिला शाखा आणि राजश्री लड्डा परिवारातर्फे श्रावण मासानिमित्त तुळजापूर वेस येथील माहेश्वरी सांस्कृतिक भवनात आयोजित संगीतमय महाशिवपुराण कथेदरम्यान त्यांनी रविवारी अर्धनारी नटेश्वर या प्रकरणावर विवेचन केले. ज्या ठिकाणी भगवान महादेवांनी तपस्या केली त्याच ठिकाणी नारद मुनींनी तपस्या करून कामविजय प्राप्त केला. परंतु ते स्वतःचा अहंकार कमी करू शकले नाहीत. त्यांचा अहंकार कमी करण्यासाठी भगवान महादेवांनी दिलेला सल्ला त्यांनी ऐकला नाही. भगवान विष्णूंनी विश्वमोहिनीच्या रूपाची लीला रचली. महाराजांच्या अहंकाराम



ुळे त्यांना प्राप्त झालेले मर्कट ग्रुप म्हणजे मनुष्याला अहंकार प्राप्त झाल्यानंतर विनाशकारी विचाराकडे नेण्यासारखे आहे. भगवंताच्या लिलेची प्रचिती आल्यानंतर अहंकार नष्ट करण्यासाठी नारद मुनींनी शिवभक्ति केली, असेही उत्तमजी महाराज म्हणाले. याप्रसंगी अध्यक्षा राणी होलाणी, कार्यक्रम प्रमुख ज्योती चंडक, सुनिता बजाज, नंदा लाहोटी, शोभा मालू, विजया भैय्या, राजश्री लड्डा, रामेश्वर करवा, गोविंद लाहोटी, गोविंद चंडक, श्रीकांत बजाज, विलास बजाज, श्रीकांत लड्डा, लक्ष्मीकांत लड्डा आदी उपस्थित होते.

## कौशिक आश्रमच्या शिबिरात ३८४ जणांचे रक्तदान

**पुणे, दि. २७ जुलै-**

कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान या संस्थांच्या वतीने रविवारी आयोजित रक्तदान शिबिरात ३८४ जणांनी रक्तदान केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चौथे सरसंघचालक प्रो. राजेंद्रसिंहजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रतिवर्षी हे शिबिर आयोजित करण्यात येते. मित्रमंडळ कॉलनीतील कौशिक आश्रम येथे हे शिबीर भरवण्यात आले होते. ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक बबन पोतदार, प्रथितयश स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ डॉ. लीना पाटणकर, संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. सुरेश जाधव आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनील राऊत यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. डॉ. हेडगेवार रक्तकेंद्र सोलापूर आणि जनकल्याण रक्तकेंद्र पुणे यांच्या सहयोगाने हे शिबिर आयोजिण्यात आले होते.



### सचिन कदम यांचे ८३ वे रक्तदान

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील वरिष्ठ अधिकारी सचिन कदम यांनी शिबिरात भाग घेत ८३ वे रक्तदान केले. महाविद्यालयात १९९१ मध्ये अकरावीत प्रवेश घेतला तेव्हापासून कर्तव्याच्या भावनेतून रक्तदान करत असल्याचे त्यांनी सांगितले.

संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य सुहासराव हिरेमठ, ज्येष्ठ प्रचारक श्रीधरपंत फडके, रक्ताचे नाते या संस्थेचे राम बांगड तसेच विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिबिराला भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. संस्थेचे कार्यवाह राजाभाऊ पानगावे यांनी प्रास्ताविक, नागेश पाटील यांनी सूत्रसंचालन आणि मंदार सहस्त्रबुद्धे यांनी आभार मानले.

## डॅनफॉस इनोव्हेशन सेंटर आणि ‘वालचंद’यांच्यात करार

### ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

अभियांत्रिकी क्षेत्रातील उद्योगसमन्वय आणि नाविन्यपूर्ण शिक्षणासाठी एक महत्त्वाची पायरी उचलत डॅनफॉस इनोव्हेशन सेंटर, पुणे आणि वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (डब्ल्यु.आय.टी.), सोलापूर यांच्यात नुकताच सामंजस्य करार (MOU) करण्यात आला. या कराराअंतर्गत महाविद्यालयात अत्याधुनिक ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ ची स्थापना केली जात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. विजय आठवले यांनी दिली.

या उपक्रमात डॅनफॉस इंडिया इनोव्हेशन सेंटरचे प्रमुख व सिनियर डायरेक्टर श्री. राहुल वळे, परीक्षण विभागाचे प्रमुख श्री. श्रीधर कृष्णस्वामी आणि युनिव्हर्सिटी रिलेशन मॅनेजर मनोज घोडमारे, अनिल घेगडे यांचे विशेष योगदान लाभले असून सेंटर ऑफ एक्सलन्सचा एक भाग म्हणून डॅनफॉसच्या सहकार्याने सुमारे १.३ कोटीस रुपचे खर्चाचा १५० किलोवॅट क्षमतेचा अत्याधुनिक हायड्रॉलिक टेस्ट स्टँड डब्ल्यु. आय.टी. मध्ये कार्यान्वित केला जात आहे. या स्टँडच्या सहाय्याने हायड्रॉलिक मोटर्स, पंप्स आणि व्हॉल्व्हस यांची कार्यक्षमता तपासता येणार असून,



विद्यार्थ्यांना उद्योगसदृश प्रशिक्षण, प्रात्यक्षिके व संशोधनासाठी नवे क्षितिज उपलब्ध होणार असल्याचे ही डॉ. आठवले यांनी स्पष्ट केले.

डॅनफॉस इनोव्हेशन सेंटर यांच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी इंटेलिजेंट हायड्रॉलिक सिस्टिम्स या नाविन्यपूर्ण विषयावर निवडक अभ्यासक्रम (इलेक्टिव्ह कोर्स) सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना मासिक स्टायपेंडसह इंटर्नशिपची संधी मिळणार असून, गुणवत्ताधिष्ठित विद्यार्थ्यांसाठी नोकरीच्या संधीही निर्माण होणार आहेत. ही सुविधा मेकॅनिकल, कॉम्प्युटर सायन्स, आय.टी., इलेक्ट्रॉनिक्स आणि ई टीसी या शाखांतील विद्यार्थ्यांसाठी खुली राहणार आहे.

या उपक्रमामागे प्राचार्य डॉ. विजय आठवले आणि डॉ. भाग्येश देशमुख यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण टीमचे विशेष योगदान असून, वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी आणि समस्त विश्वस्तमंडळ यांनी या उपक्रमाचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### संशोधनाची गुणवत्ता अधिक उंचावणार

प्राचार्य डॉ. विजय आठवले यांनी याबाबत सांगतात, उद्योगांसोबतच्या सहकार्यामुळे डब्ल्युआयटी मध्ये शिक्षण व संशोधनाची गुणवत्ता अधिक उंचावणार आहे. हे केंद्र विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिकच नव्हे तर व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करण्याची अमूल्य संधी देईल.

## जनावरे चोरल्याच्या संशयाने विचारणा करण्यास गेलेल्या दोघांना कुमठे गावात मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै -**

सोलापूर - जनावरे चोरल्याच्या संशयाने विचारणा करण्यास गेलेल्या दोघांना कुमठेगावात मारहाण करण्यात आली. विशाल मनोज जाधव (वय १९, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. १, सोलापूर) आणि करण अशोक श्रीराम (वय १९, रा. मौलाली चौक, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. २६ जुलै



रोजी दुपारी विशाल जाधव व करण श्रीराम हे दोघे कुमठेगाव येथे जनावरे चोरल्याच्या संशयाने विचारणा करण्यास गेले होते. त्यावेळी सुरेश कोळी व युवराज कोळी आणि इतर दोघांनी मिळून विशाल जाधव व करण श्रीराम यांना दगडाने व लाकडाने मारहाण केली. त्यामध्ये दोघेही जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# शुभमन गिलचे संयमी शतक

### जडेजा आणि सुंदरची अप्रतिम खेळी

◆ **मँचेस्टर, २७ जुलै**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथ्या सामन्याच्या पाचव्या दिवशी भारताने पुढे डाव सुरू करताना संयमाने फलंदाजी करीत इंग्लंड संघावर आघाडी घेतली. कर्णधार शुभमन गिल आणि केएल राहुल यांनी इंग्लंडच्या गोलंदाजांचा धैर्याने सामना करीत सामना अनिर्णीतावस्थेकडे नेण्याचा प्रयत्न केला. वॉशिंग्टन सुंदर ७५ आणि रवींद्र जडेजा ८९ धावांवर नाबाद होते.

पाचव्या दिवसाच्या खेळासाठी केएल राहुल (८७) आणि शुभमन गिल (७८) मैदानावर उतरले तेव्हा त्यांच्याकडून भारताला मोठी आशा होती. पण तीन धावांची भर पडताच केएल राहुल बाद झाला. त्याला बेन स्टोक्सने बाद केले. केएल राहुलने २३० चेंडूंमध्ये ८ चौकारांसह ९० धावा केल्या. त्यानंतर आलेला वॉशिंग्टन सुंदर आणि गिल यांनी धावफलक हलता ठेवला. या दोघांची जोडी चांगली जमली होती. या दरम्यान गिलने आपले शतक पूर्ण केले. त्याने १०३ धावा केल्या. त्याला जोफ्रा आर्चरने बाद केले. केएल राहुल आणि शुभमन गिल यांनी १८८ धावांची भागीदारी केली. त्यानंतर वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जडेजा यांनी चौथ्या कसोटीच्या पाचव्या दिवशी दमदार अर्धशतकी खेळी करत भारतीय संघाचा संघर्ष पुढे नेला. रविवारी चहापानाच्या विश्रांतीपर्यंत ११ धावांची अल्प आघाडी घेतली होती.



शतक झळकविल्यानंतर बॅट उंचावून आनंद साजरा करताना कर्णधार शुभमन गिल

जडेजा (१०२ चेंडूत नाबाद ५३) आणि वॉशिंग्टन (१३९ चेंडूत नाबाद ५८) यांनी पाचव्या गड्यासाठी शतकी भागीदारीदरम्यान दृढ हेतूने फलंदाजी केली. दोघांच्या खेळामुळे इंग्लंडच्या गोलंदाजांना चांगलाच घाम गाळावा लागला. दिवसाच्या दुसऱ्या सत्रात भारताने एकही गडी न गमावता ९९ धावा केल्या. त्यामुळे संघाची धावसंख्या गडी बाद ३२२ पर्यंत पोहोचली.

सुंदरने स्टोक्सच्या षटकात सलग चेंडूवर एक षटकार आणि एक चौकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले, त्यानंतर लगेचच जडेजाने सहा डावांमध्ये एक चौकार मारून आपले पाचवे अर्धशतक पूर्ण केले आणि इंग्लंडच्या कर्णधाराच्या षटकात १५ धावा केल्या.

इंग्लंडचा डावखुरा फिरकी गोलंदाज लियाम डॉसनला भारतीय डावखुऱ्या फलंदाजांना पुरेसे आव्हान देऊ शकला नाही. जोफ्रा आर्चरलाही दुपारच्या भोजनानंतर कोणतेही यश मिळू शकले नाही.

इंग्लंडकडून ख्रिस वोक्सने २, जोफ्रा आर्चर आणि बेन स्टोक्सने १ गडी बाद केला. पाचवा कसोटी सामना ३१ जुलैपासून ओव्हल येथे होणार आहे. पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत इंग्लंडने २-१ अशी आघाडी घेतली आहे. ◀(वृत्तसंस्था)



जम्मूमधील पलौरा येथील बीएसएफ कॅम्पमध्ये खेलो इंडिया योजनेअंतर्गत आयोजित सायकल रॅलीमध्ये रविवारी बीएसएफच्या जवानांनी सहभाग घेतला

## महत्त्वाचे

### राज्य कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदी रोहित पवार

**पुणे** : महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्यासोबत सचिवपदी विजय बराटे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांचीही निवड बिनविरोध करण्यात आली. याबद्दल रोहित पवार म्हणाले, आतापर्यंत प्रत्येक स्तरावर केलेल्या कामगिरीची ही पोचपावती आहे. ही माझ्यासाठी सुवर्णसंधी आहे. कुस्तीला पुन्हा गतवैभव मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नांची शर्थ करणार आहे. त्यांनी सर्व जिल्हा संघटना आणि मतदारांचे आभार मानले. रोहित पवार म्हणाले, स्व. यशवंतराव चव्हाण, स्व. मामासाहेब मोहोळ आणि शरद पवार यांच्या विचारांच्या या संघटनेचे नेतृत्व करण्याची संधी माझ्यासारख्या कार्यकर्त्याला मिळत आहे, हे माझे भाग्य आहे.

### लेला फर्नांडिस आणि कालिनस्काया अंतिम फेरीत



**वॉशिंग्टन** : लेला फर्नांडिस हार्ड कोर्ट टेनिस स्पर्धेच्या डीसी ओपनच्या अंतिम फेरीत प्रवेश करेल आणि हंगामातील तिचे पहिले डब्ल्यूटीए जेतेपद जिंकेल, तर अॅना कालिनस्काया तिच्या कारकीर्दीतील पहिल्या जेतेपदावर लक्ष केंद्रित करेल. यूएस ओपन २०२१ ची उपविजेती फर्नांडिसने शनिवारी झालेल्या उपांत्य फेरीत १२ एसेस मारत २०२२ ची विम्बल्डन विजेती एलेना रायबाकिना हिचा तीन तास आणि १६ मिनिटांत ६-७, ७-६, ७-६ असा पराभव केला. तथापि, कालिनस्काया हिने फर्नांडिसच्या अर्धपेक्षा कमी वेळेत एम्मा राडुकानू हिचा ६-४, ६-३ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत पोहोचलेल्या फर्नांडिस आणि कालिनस्काया बिगरमानांकित खेळाडू आहेत. पुरुष एकेरीत, सातव्या मानांकित अॅलेक्स डी मिनॉरने कोरेन्टिन मौटेचा ६-४, ६-३ असा पराभव करून स्पर्धेच्या दुसऱ्या अंतिम फेरीत प्रवेश केला जिथे त्याचा सामना चौथ्या मानांकित बेन शेल्टन आणि १२ व्या मानांकित अलेजांद्रो डेव्हिडोविच फोकिना यांच्यातील सामन्यातील विजेत्याशी होईल.

### आर्यन आणि लिहित पुढील फेरीत पोहोचण्यात अपयशी

**सिंगापूर** : येथे सुरू असलेल्या जागतिक अॅक्वाटिक्स चॅम्पियनशिप २०२५ मध्ये भारताचे युवा जलतरणपटू आर्यन नेहरा आणि एसपी लिहित यांना त्यांच्या संबंधित स्पर्धांच्या पुढील फेरीत पोहोचण्यात अपयश आले. आर्यन नेहराने पुरुषांच्या ४०० मीटर फ्रीस्टाईल स्पर्धेत ४:००.३९ मिनिटे वेळ नोंदवली. तो त्याच्या हीटमध्ये सातव्या आणि एकूण ३७ व्या स्थानावर राहिला. या स्पर्धेत फक्त अव्वल ८ जलतरणपटूंनी अंतिम फेरीत प्रवेश केला. या श्रेणीत, ऑस्ट्रेलियाचा सॅम्युअल शॉर्ट ३:४२.०७ मिनिटांच्या सर्वात जलद वेळेसह यादीत अव्वल स्थानावर होता. दुसरीकडे, एसपी लिहितने १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक स्पर्धेत १:०१.९९ मिनिटे वेळ घेत एकूण क्रमवारीत ४० वे स्थान मिळवले. या स्पर्धेतील अव्वल १६ जलतरणपटूंनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. तुर्कीच्या नुसरत अल्लाहवेर्दीने १:०१.११ मिनिटांच्या वेळेसह सर्वात जलद हीट पूर्ण केली. भारतासाठी आजचा दिवस संमिश्र होता, जलतरणपटूंना अनुभव मिळाला पण पुढच्या फेरीत प्रवेश करण्याच्या आव्हानात ते कमी पडले.

# अंकिताला ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये रौप्य पदक

◆ **राईन रुहर (जर्मनी), २७ जुलै**

भारताची उदयोन्मुख खेळाडू अंकिताने रविवारी जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आणि महिलांच्या ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये रौप्यपदक जिंकले. २३ वर्षीय अंकिताने ९:३१.९९ सेकंदांचा वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवला, जो तिच्या ९:३९.०० सेकंदांच्या जुन्या विक्रमापेक्षा जवळजवळ सात सेकंदांनी चांगला आहे.

ती फिनलंडच्या इलोना मारिया मोनोनेन (९:३१.८६ सेकंद) हिच्यापेक्षा फक्त मिलिसेकंदांनी मागे होती. जर्मनीच्या आदिया बुडेने ९:३३.३४ सेकंदात शर्यत पूर्ण करून कांस्यपदक जिंकले. यापूर्वी शुक्रवारी अंकिताने हीट १ मध्ये ९:५४.७९ सेकंदांसह पहिले स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. भारतीय महिला ४४०० मीटर रिले संघाने (अनाखा बिजूकुमार, देवयानीबा जाला, रशदीप कौर, रूपल) हंगामातील सर्वोत्तम ३:३५.०८ सेकंद वेळ नोंदवली परंतु पाचव्या स्थानावर राहिला. या स्पर्धेत जर्मनीने ३:२९.६८ सेकंद वेळ नोंदवून सुवर्णपदक जिंकले.

रिले स्पर्धांमध्ये भारताच्या आशा आता पुरुषांच्या ४४०० मीटर, ४१०० मीटर आणि महिलांच्या ४१०० मीटर रिलेवर अवलंबून आहेत. चालण्याच्या स्पर्धांमध्ये भारताची कामगिरी निराशाजनक होती. एकाही खेळाडूला अव्वल १० मध्ये स्थान मिळाले नाही. ◀(वृत्तसंस्था)

# तिरंदाज जाधवला सुवर्ण, चित्रावेलला तिहेरी उडीत रौप्य पदक

### जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धा

◆ **आयसेन (जर्मनी), २७ जुलै**

साहिल जाधवने शनिवारी येथे पुरुषांच्या कंपाऊंड वैयक्तिक गटात चमकदार कामगिरी केली आणि सुवर्णपदक जिंकले. त्यामुळे भारतीय तिरंदाजांनी जागतिक विद्यापीठ खेळांच्या (डब्ल्यूयूजी) तिरंदाजी स्पर्धेत पाच पदकांसह आपली मोहीम संपवली.

तत्पूर्वी, महिला कंपाऊंडच्या रोमांचक अंतिम फेरीत दक्षिण कोरियाच्या मून यूनविरुद्ध दबावाखाली सर्वोत्तम कामगिरी करण्यात परनीत कौर अपयशी ठरली आणि तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. या दोन व्यतिरिक्त, भारताने रिकर्व्ह आर्चरच्या निराशाजनक कामगिरीची भरपाई देखील केली. कंपाऊंड आर्चरने मिश्र संघाचे सुवर्ण, पुरुषांचे सांघिक रौप्य आणि महिलांचे सांघिक कांस्यपदक जिंकले. भारताच्या २४ वर्षीय प्रवीण चित्रावेलने तिहेरी उडीत १६.६६ मीटरची शानदार उडी मारून रौप्य पदक जिंकले. त्यामुळे या प्रतिष्ठित स्पर्धेत देशाच्या पदकांची संख्या दोन सुवर्ण, तीन रौप्य आणि तीन कांस्यपदकांवर पोहोचली.



भुवनेश्वरची ही खेळाडू ऑस्ट्रेलियाच्या कॉनर मर्फीपेक्षा मागे राहिली, तिने हंगामातील सर्वोत्तम १६.७७ मीटर उडी मारली. पुरुष आणि महिला दोन्ही ४४०० मीटर रिले संघांनी अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवून उत्कृष्ट कामगिरी केल्याने भारत आपली पदकांची संख्या आणखी वाढवू शकतो.

जाधवने अंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी केली, १५ पैकी १४ शॉट्स मारून १० गुण मिळवले. त्याचा शेवटचा शॉट नऊ गुणांचा होता, त्याने रोमांचक अंतिम फेरीत ग्रेट ब्रिटनच्या अजय स्कॉटला १४९-१४८ असा पराभव केला.

स्कॉटने तीन एक्स (मध्यभागी १०-पॉईंट शॉट्स) ने सुरुवात केली तरीही, जाधवने संयम राखला आणि पाचव्या फेरीच्या शेवटच्या शॉट्सपूर्वी तो चुकला नाही. एका रोमांचक उपांत्य फेरीच्या सामन्यात जाधवने आपल्याच देशाच्या कुशल दलालवा शूट-ऑफमध्ये पराभव केला.

दोन्ही तिरंदाज १४८-१४८ अशा बरोबरीत राहिल्यानंतर, जाधवने शूट-ऑफमध्ये १० गुण मिळवले पण जाधवचा बाण मध्यभागी होता. त्यानंतर दलालला कांस्यपदकाच्या सामन्यातही निराशेचा सामना करावा लागला. त्याला पोलंडच्या प्रझेमिस्लव कोनेकिकडून १४८-१५० असा पराभव पत्करावा लागला. यापूर्वी महिलांच्या अंतिम फेरीत, दक्षिण कोरियाच्या तिरंदाजाने परनीतला फक्त एका गुणाने हरवून १४७-१४६ असा विजय मिळवला. ◀(वृत्तसंस्था)



सिंगापूर येथे सुरू असलेल्या जागतिक जलतरण अजिंक्यपद स्पर्धेत रविवारी चीनचे झी पेइलिंग आणि झू योंगझिन यांनी मिश्र १० मीटर चित्तथरारक अंतिम फेरीत भाग घेत प्रात्यक्षिके सादर केलीत

# ऑलिम्पिकमध्ये जम्मू-काश्मीरचे खेळाडू पदक मिळवू शकतात

### बिल्किस मीरचा विश्वास

◆ **श्रीनगर, २७ जुलै**

बर्फाच्छादित उत्तर, हिमनद्यांमधून उगम पावणाऱ्या नद्या आणि खेळाडूंची नवीन पिढी पाहता, राज्यातील खेळाडूंमध्ये हिवाळी क्रीडा आणि जलक्रीडा क्षेत्रात देशासाठी ऑलिम्पिक पदके जिंकण्याची क्षमता आहे, असा विश्वास जम्मू-काश्मीरच्या अव्वल खेळाडूंपैकी एक असलेल्या बिल्किस मीरने व्यक्त केला आहे.

पॅरिस ऑलिम्पिक (२०२४) मध्ये ज्युरी सदस्य म्हणून देशाचे प्रतिनिधित्व करणारी पहिली भारतीय महिला मीर म्हणाली की, तिला जम्मू आणि काश्मीर आणि देशाला क्रीडा व्यासपीठावर पाहायचे आहे आणि या दिशेने तिचे प्रयत्न सुरू आहेत. श्रीनगरची ३८ वर्षीय खेळाडू मीरने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खेळाडूंशी नियमित संवाद साधण्याचे कौतुक केले आणि म्हटले की हा खेळाडूसाठी एक मोठा क्षण आहे आणि क्रीडा संस्कृती निर्माण करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे.



एका मुलाखतीत जलक्रीडा खेळाडू मीर म्हणाली, जम्मू आणि काश्मीर आणि देशाला जागतिक स्तरावर अव्वल स्थानावर पाहण्याचे माझे स्वप्न आहे. ऑलिम्पिकमध्ये जलक्रीडा आणि हिवाळी खेळांमध्ये भारताचे यशस्वी नेतृत्व करण्याची क्षमता जम्मू आणि काश्मीरमध्ये आहे कारण आपल्याकडे नैसर्गिक संसाधने आहेत तसेच आवश्यक प्रतिभा देखील आहे. त्याला वाढविणे आवश्यक आहे.

प्रसिद्ध कायाकिंग आणि कॅनोइंग खेळाडू मीर म्हणाली की, मी उत्तराखंड, मध्य प्रदेश, मणिपूर आणि देशाबाहेरील इतर अनेक ठिकाणी तरुण खेळाडूंना प्रशिक्षण दिले आहे परंतु आमच्या मुलांना (जम्मू आणि काश्मीर खेळाडू) आशियाई खेळ आणि ऑलिम्पिकमध्ये जाण्याची भरपूर क्षमता आहे आणि मला वाटते की त्यांचे भविष्य उज्ज्वल आहे. सरकारने प्रख्यात खेळाडू आणि कामगिरी करणाऱ्यांशी संवाद साधावा कारण त्यांच्याकडे त्यांच्या खेळांमध्ये कौशल्य आहे आणि ते भविष्यासाठी ब्लूप्रिंट तयार करण्यास मदत करू शकतात. ◀(वृत्तसंस्था)

### कायदेशीर लढा जिंकला

भ्रष्टाचारविरोधी विभागाने दाखल केलेला एफआयआर रद्द करण्यासाठी तीन वर्षांचा कायदेशीर लढा जिंकल्यानंतर मीर अलिकडेच चर्चेत आली होती. जम्मू आणि काश्मीर उच्च न्यायालयाने अधिकाऱ्यांना कडक शब्दांत फटकारले होते आणि म्हटले होते की सत्तेत असलेले लोक अशा प्रतिभावान लोकांना त्रास देण्यासाठी कोणतीही कसर सोडत नाहीत असे दिसते.

# कोनेरू हम्पी-दिव्या देशमुख सामना टायब्रेकरमध्ये

### आज होणार जलद-ब्लिट्झ सामना

◆ **बटुमी, २७ जुलै**

रविवारी जॉर्जियातील बटुमी येथे झालेल्या हाय-स्टेक्स सामन्यातील दुसऱ्या क्लासिकल सामन्यात ग्रँडमास्टर कोनेरू हम्पी आणि नागपूरची इंटरनॅशनल मास्टर (आयएम) दिव्या देशमुख यांनी सामना बरोबरीत राखून टायब्रेकमध्ये पोहोचला.

दोन्ही खेळाडूंनी दोन क्लासिकल सामन्यांमध्ये बरोबरी साधली असल्याने, आता सोमवारी महिला विश्वचषक २०२५ चा विजेता कोण असेल हे ठरवण्यासाठी जलद-ब्लिट्झ सामना खेळला जाईल. दुसऱ्या सामन्यात पांढऱ्या सोंगट्यांसह खेळताना हम्पीने चांगली सुरुवात केली. तथापि, दिव्याने शांतपणे आणि आत्मविश्वासाने लढा दिला.



मधल्या खेळाचा उलगडा होताच, दोन्ही खेळाडूंनी नियमित अंतराने गोलची देवाणघेवाण केली आणि स्थिती सोपी होऊ लागली. दोन्ही बाजूंना कोणताही स्पष्ट फायदा न मिळाल्याने, हे स्पष्ट झाले की दोघेही अनावश्यक जोखीम घेण्यास तयार नव्हते. या निकालामुळे सोमवारी एका रोमांचक टाय-ब्रेकसाठी पाया तयार झाला. आता फॉरमॅट रॅपिड आणि ब्लिट्झ गेममध्ये बदलेल, जे वेगवान असतात आणि खेळाडूंच्या कौशल्यांच्या वेगळ्या आयामांची चाचणी घेतात. अंतर्ज्ञान आणि घड्याळ व्यवस्थापन आणखी महत्त्वाचे बनते. ◀(वृत्तसंस्था)

### अटवाल, जीव आणि ज्योतीला सीनिअर ओपनमध्ये स्थान

◆ **सनिंगडेल (यूके), २७ जुलै**

अर्जुन अटवाल, जीव मिल्खा सिंग आणि ज्योती रंधावा या भारतीय गोल्फ त्रिकूटाने येथे झालेल्या आयएसपीएस हांडा सीनियर (५० वर्षांवरील) ओपनमध्ये स्थान मिळवून इतिहास घडवला. मेजर (टॉप लेव्हल गोल्फ स्पर्धेत) तीन भारतीय खेळाडूंनी एकत्रितपणे स्थान मिळवण्याची ही पहिलीच वेळ आहे. पहिल्या दिवशी ६७ चा कार्ड खेळणारा अटवाल दुसऱ्या दिवशी दोन ओव्हर ७२ चा कार्ड खेळल्यानंतर ३६ व्या स्थानावर आहे. जीव (७१-६९) ४९ व्या स्थानावर आहे तर रंधावा (७०-७१) एका षटकाच्या गुणांसह स्थान मिळवण्यात यशस्वी झाला. ◀(वृत्तसंस्था)



# भारतीय हॉकीची आर्थिक अनुदानात वाढ

### भारतीय हॉकीच्या शताब्दीनिमित्त महोत्सव

◆ **महाबलीपुरम, २७ जुलै**

हॉकी इंडियाने येथे होणाऱ्या १५ व्या अधिवेशना दरम्यान राष्ट्रीय आणि तळागाळातील स्पर्धांना पाठिंबा देण्यासाठी आर्थिक अनुदानात मोठी वाढ जाहीर केली आहे.

हॉकीला आता वरिष्ठ पुरुष आणि वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी प्रत्येकी ७० लाख रुपये वाटप केले जातील, तर ज्युनियर पुरुष, ज्युनियर महिला, सब ज्युनियर पुरुष आणि सब ज्युनियर महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी प्रत्येकी ३० लाख रुपये वाटप केले जातील. या व्यतिरिक्त, जिल्हा आणि राज्यस्तरीय स्पर्धांच्या आयोजनाला पाठिंबा देण्यासाठी प्रत्येक राज्याला २५ लाख रुपये दिले जातील. या वाढीव अनुदानांचा उद्देश पायाभूत सुविधा मजबूत करणे, स्पर्धांचा दर्जा सुधारणे आणि स्थानिक पातळीवर आर्थिक अडचणी कमी करून व्यापक सहभाग सुनिश्चित करणे आहे, असे हॉकी इंडियाने रविवारी एका प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे.



या मदतीचा फायदा हजारो उदयोन्मुख खेळाडू, प्रशिक्षक आणि तळागाळातील अधिकाऱ्यांना होईल अशी अपेक्षा आहे. भारतीय हॉकीच्या १०० वर्षांच्या पूर्तीनिमित्त अनेक ऐतिहासिक घोषणा करण्यात आल्या, ज्यामध्ये ७ नोव्हेंबर रोजी देशव्यापी महोत्सवाचा समावेश आहे. या मैलाच्या दगडाचे स्मरण करण्यासाठी, हॉकी इंडिया ३६,००० हून अधिक खेळाडू (१८,००० पुरुष आणि १८,००० महिला) सहभागी होऊन १,००० सामने (देशाच्या प्रत्येक जिल्ह्यात एक पुरुष आणि एक महिला सामना) घेऊन देशव्यापी उत्सवाचे आयोजन करणार आहे.

हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की म्हणाले, भारतीय हॉकीची १०० वर्षे साजरी करताना, आम्ही केवळ आमच्या सुवर्ण वारशाचा सन्मान करत नाही तर भविष्यासाठी एक मजबूत पाया देखील रचतो. ◀(वृत्तसंस्था)

# सातत्यपूर्ण विजेते निर्माण करणारी रचना हवी : शरथ कमल

◆ **नवी दिल्ली, २७ जुलै**

भारतीय टेबल टेनिसमध्ये तरुण प्रतिभांना वरिष्ठ स्तरावर यशस्वीरीत्या प्रगती करण्यास मदत करण्यासाठी एक सुव्यवस्थित प्रणाली आवश्यक आहे, असे मत अनुभवी टेबल टेनिसपटू शरथ कमलने व्यक्त केले.

अलिकडचे निकाल उत्साहवर्धक असले तरी, ४३ वर्षीय खेळाडू शरथ कमल वृत्तसंस्थेशी बोलता म्हणाला की, दीर्घकालीन विकासाला चालना देणाऱ्या प्रणालीशिवाय केवळ प्रतिभा पुरेशी नाही. आपण एक किंवा दोन चांगल्या सुरुवातीवर अवलंबून राहू शकत नाही. आपल्याला अशी रचना हवी आहे जी सातत्यपूर्ण विजेते निर्माण करेल.

बऱ्याच तरुणांमध्ये प्रतिभा आहे परंतु मुख्य समस्या संक्रमणाचा टप्पा आहे. जोपर्यंत आपण योग्य प्रणाली स्वीकारत नाही तोपर्यंत आपण ज्युनियर चॅम्पियन्सना वरिष्ठ चॅम्पियन बनताना पाहणार नाही, यावर शरथ कमलने भर दिला. भारताने २०२४ च्या आशियाई चॅम्पियनशिपमध्ये तीन कांस्यपदके जिंकली. ज्यामध्ये अहिका आणि सुतीर्था मुखर्जी यांनी महिला दुहेरीत ऐतिहासिक पहिले पदक जिंकले तर महिला सांघिक स्पर्धेत पहिल्यांदाच कांस्यपदक मिळाले.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये, महिला संघाने पहिल्यांदाच उपांत्य पूर्व सामन्यात प्रवेश केला आणि उप उपांत्य पूर्व सामन्यात जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकाच्या रोमानियन संघाला पराभूत केले.

एकेरी सामन्यांमध्ये, मणिका बत्रा आणि श्रीजा अकुला या दोघींही उप उपांत्य पूर्वमध्ये पोहोचण्यात यशस्वी झाल्या. शरथ कमल म्हणाला की, खरे आव्हान सातत्य आहे. एका पदकाचे दोन झाले पाहिजेत आणि ते पाच किंवा सहापर्यंत वाढवावे लागेल. हे सातत्य एका पद्धतशीर योजनेतून येईल. आपण सर्व या दिशेने प्रयत्न करत आहोत. मला आशा आहे की आपल्याला लवकरच पद्धतशीर बदल दिसेल. ◀(वृत्तसंस्था)

# अंतिम संघ कर्णधारानेच निवडावा

### सुनील गावसकर यांचे परखड मत

◆ **मँचेस्टर, २७ जुलै**

अंतिम अकरा खेळाडू निवडण्याचा निर्णय शुभमन गिलला घेण्याचा अधिकार नव्हता. हा निर्णय पूर्णपणे कर्णधाराचा असावा आणि मुख्य प्रशिक्षकासह इतर कोणाचाही त्यावर प्रभाव नसावा, असे परखड मत भारताचे माजी दिग्गज फलंदाज सुनील गावस्कर यांनी मांडले.

डावखुरा फिरकी गोलंदाज कुलदीप यादवची संघात सतत निवड न झाल्याने जोरदार वादविवाद सुरू झाला आहे. विशेषतः जो रूटने सुरू असलेल्या चौथ्या कसोटीत विक्रमी शतक झळकावल्यानंतर जिथे तो रिकी पॉन्टिंगला मागे टाकून कसोटी क्रिकेटमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला. रूटच्या नावावर आता १३,४०९ धावा आहेत आणि सचिन तेंडुलकर (१५,९२१ धावा) त्याच्या पुढे आहे.

२०१८ मध्ये मँचेस्टर आणि लॉर्ड्स येथे झालेल्या मर्यादित षटकांच्या दोन सामन्यांमध्ये रूटला तीन चेंडूत बाद केल्यानंतरही, कुलदीपला आतापर्यंत संपूर्ण कसोटी मालिकेतून वगळण्यात आले आहे. हेडिंग्ले कसोटीत भारताने पुढील ११ षटकांत ४७१ धावा केल्या असूनही, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी फलंदाजीमध्ये योगदान देऊ शकणाऱ्या गोलंदाजांवर भर दिला आहे, अशी सर्वसाधारण भावना आहे.



गावस्कर यांचे मत होते की, कुलदीप संघाचा भाग असायला हवा होता. त्याला संघात ते मिळायला हवे होते. तो कर्णधार आहे. लोक त्याच्याबद्दल आणि त्याच्या कर्णधारपदाबद्दल बोलतील. म्हणून निर्णय प्रत्यक्षात त्याचाच असावा. अंतर्गत मतभेद किंवा निवडीचे मुद्दे जाणूनबुजून लपवून ड्रेसिंग रूममध्ये सर्व काही ठीक आहे हे दाखवता येते. मला माहीत आहे की या गोष्टी उघडपणे बाहेर येऊ शकत नाहीत जेणेकरून सर्व काही ठीक आहे हे दाखवता येईल. सत्य हे आहे की कर्णधार जबाबदार आहे. तो संघाचे नेतृत्व करेल. ही एक सामान्य गोष्ट आहे.

गावस्कर म्हणाले की, त्यांच्या कर्णधारपदाच्या काळात गोष्टी वेगळ्या होत्या, तेव्हा संघ निवड पूर्णपणे कर्णधाराचा विशेषाधिकार होता आणि प्रशिक्षकाची संकल्पना अस्तित्वात नव्हती कारण सर्व काही व्यवस्थापक आणि सहायक व्यवस्थापक होते. भारताने आतापर्यंत सुरुवातीच्या आणि चालू असलेल्या चौथ्या कसोटीत वेगवान गोलंदाज अष्टपैलू शार्दुल निवडले आहे तर नितीश कुमार रेड्डी दुसऱ्या आणि तिसऱ्या सामन्यात संघात होता. तथापि, त्यांचे गोलंदाजीचे योगदान कमी आहे. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# महाविकास आघाडीबाबतचे निर्णय स्थानिक कार्यकारिणीला

## शरद राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांची माहिती



**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २७ जुलै-**

'आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक महाविकास आघाडी म्हणून लढवायची की नाही, याचा निर्णय घेण्याचा अधिकार स्थानिक कार्यकारिणीला दिला आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणून तसा अधिकार स्थानिक पदाधिकाऱ्यांना दिला आहे,' अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आगामी निवडणुकीतील महाविकास आघाडीसंदर्भात भाष्य केले. पक्षातील ज्येष्ठ नेत्यांची समिती स्थापन करा आणि प्राथमिक स्वरूपात चांगल्या उमेदवारांची यादी महिन्याभरात द्या. त्यावर तातडीने निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

प्रदेशाध्यक्षपदी शशिकांत शिंदे आणि प्रदेश सरचिटणीसपदी आमदार रोहित पवार यांची निवड झाल्याने पुणे शहर राष्ट्रवादीकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. शहराध्यक्ष प्रशांत जगताप, आमदार बापूसाहेब पठारे, ज्येष्ठ नेते अंकुश काकडे, रवींद्र माळवदकर, श्रीकांत पाटील, माजी स्थायी समिती अध्यक्षा अश्विनी कदम यावेळी उपस्थित होते.महापालिकेसाठी सत्ताधारी पक्षाने प्रभाग रचना बदलली आहे. विधानसभा निवडणुकीत उमेदवारीबाबतचा निर्णय शेवटच्या क्षणी झाला. त्यामुळे काही उमेदवारांना पराभव पत्करावा लागला. महापालिका निवडणूक महाविकास आघाडी म्हणून लढवायची, की नाही, याचा निर्णय प्रदेश स्तरावर होईल. मात्र, तो लवकरात लवकर घ्यावा, अशी मागणी प्रशांत जगताप यांनी केली होती. हा धागा पकडून शशिकांत शिंदे यांनी तसे अधिकार स्थानिक पातळीवर देत असल्याचे जाहीर केले.

रोहित पवार म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी लोकांचे प्रश्न घेऊन पुढे जावे लागले. लोकांची कामे करणाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल झाले, तर नेते त्यांच्या मागे उभे राहतील. आत्ताची वेळ संघर्षाची आहे.

# शंकरनगरच्या नागपंचमी महोत्सवात २५ हजार महिला सहभागी होणार

## ●२८ व २९ जुलै रोजी आयोजन, पारंपारीक खेळांचे होणार सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २७ जुलै-**

महाशिवरात्री यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने शंकरनगर येथे २८ व २९ जुलै रोजी होणाऱ्या नागपंचमी महासोळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे .केवळ महिलांसाठी होणाऱ्या या उत्सवात २५ हजार पेक्षा जास्त महिला उपस्थित राहतील असे या कार्यक्रमाच्या प्रमुख आयोजक स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी सांगितले.

येथील शिवपार्वती मंदिराच्या आवारात गतवर्षी नागपंचमी निमित्त केवळ आणि केवळ महिलांसाठी पारंपारिक खेळांचा महोत्सव आयोजित केला होता. गतवर्षी १२ महिलांनी याचा आनंद लुटला होता. यंदा या सोहळ्याला आणखी मोठे स्वरूप देऊन महिलांना पारंपारिक खेळ खेळण्याची पर्वणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. २८ व २९ जुलै रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत हा नागपंचमी उत्सव सोहळा संपन्न होणार आहे. पावसाळी वातावरण बघता सुमारे २५ हजार महिला व संबंधित खेळांची मांडणी करण्यायोग्य भव्य असा वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आला आहे. स्वरूपाराणी मोहिते पाटील म्हणाल्या, टीव्ही. मोबाईल याच्या पलीकडे जाऊन महिलांना पारंपारिक खेळाचा मनमुराद आनंद मिळावा, आपली संस्कृती जोपासावी या साठी सदरच्या सोहळ्याचे आयोजन केले आहे.



यामध्ये नागपंचमीचा झोका, फेर, फुगडी, झिम्मा, पिंगा, काठवठकणा या सह विवीध पारंपारिक खेळांचा समावेश आहे. यावर्षी मात्र मोठ्या प्रमाणावर हा सोहळा साजरा होत आहे. या सोहळ्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, युवा नेते सयाजीराजे मोहिते पाटील यांचेही सहकार्य असल्याचे स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी सांगितले. मराठी संस्कृतीचा वारसा, नव्या पिढीला दाखवण्यासाठी उपक्रम भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विख्यात असलेले जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम होत असल्याचे स्वरूपारानी यांनी सांगितले. जयसिंह मोहिते पाटील यांनी आनंद यात्रा, विज्ञान यात्रा, लिमका बुक मध्ये नोंदलेला महा लेझीम, शंभर वर्षांपूर्वीचे गाव दाखवणारा आनंद मेळावा, श्रावण महिन्यात सव्वा कोटी शिवलिंग निर्मितीचा धार्मिक कार्यक्रम, महाआरती कार्यक्रम, ''रयतेचा राजा, राजा शिवछत्रपती '' हे महानाट्य आदी अनेक मोठमोठे कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्या पार्श्वभूमीवर मराठी संस्कृतीचा वारसा नव्या पिढीला दाखवण्यासाठी आम्ही हा कार्यक्रम सलग दुसऱ्या वर्षीही आयोजिला असल्याचे स्वरूपारानी मोहिते-पाटील यांनी सांगितले. तरी परिसरातील व तालुक्यातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.



# अकलूज जुन्या बसस्थानक परिसराला तळ्याचे स्वरुप

## प्रवाशांची हैराणी, तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २७ जुलै-**

अकलूज येथील जुन्या बसस्थानकाच्या परिसरात सर्वत्र मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. थोडासा पाऊस आला तरी पाण्याने सर्व डबकी तयार होतात. यातून प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागते. ये-जा करणेही अडचणीचे ठरतेय. अनेकदा ज्येष्ठ नागरिक घसरून पडल्याने जायबंदी झाले आहेत.

सुमारे २० वर्षांपूर्वी येथील मूळ बसस्थानक यशवंतनगर रोडवरील नवीन जागेत हलवण्यात आले आहे. तेव्हापासून हे बसस्थानक पूर्वेकडील लातूर, अहिल्यानगर, शिर्डी, श्रीरामपूर, सोलापूर, करमाळा, टेंभुर्णी या मोठ्या शहरांबरोबरच माळीनगर, बाभूळगाव, संगम, श्रीपूर, बोरगाव, जांबुड, गणेशगाव आदी छोट्या-मोठ्या खेड्याकडे जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांसाठी याचा वापर केला जातो. या भागात जाणाऱ्या सगळ्या बसेस या जुन्या बसस्थानकावर येतात. याठिकाणी स्वतंत्र वाहतूक नियंत्रक ही नियुक्त आहे. शिवाय पूर्व बाजूला प्रवाशांसाठी स्वतंत्र शेडही उभारले आहे. मात्र या एवढे खड्डे पडले आहेत की, थोडा पाऊस झाला तरी खड्डे पाण्याने भरतात, प्रवाशांना त्यातूनच जाऊन एसटीत बसावे लागते.

## महत्त्वाचे...

### कुंभारी येथे शिवनाम जप सोहळ्यास उत्साहात प्रारंभ

**सोलापूर, दि. २७ जुलै**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील श्री शंभू महादेव देवस्थान येथे श्रावणमासानिमित्त वेदमूर्ती शिवय्या स्वामी यांच्या दिव्य सान्निध्यात २१ लाख शिवनाम जप व शिवलिलामृत पारायण सोहळ्यास उत्साहात व भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. यात असंख्य भाविक सहभागी होत असून संपूर्ण महिनाभर हा सोहळा चालणार आहे. नामजपाने मनाला शांती लाभते. जीवनाचे सार्थक होते. सर्व अडचणी आणि समस्यावर मात करण्याची पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. या नामजपातून मनाला शांती मिळते. त्यामुळे भाविकांनी नामजप सोहळ्यात सहभागी होऊन ईश्वराचे नामस्मरण करावे, असे आवाहन शिवय्या स्वामी यांनी यावेळी केले आहे. या शिवनाम जप सोहळ्याचे नियोजन ग्रामपंचायत सदस्य शिवानंद अंदोडगी पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले असून यशस्वीतेसाठी श्री शंभू महादेव देवस्थान ट्रस्ट व कमिटीचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.








### मुळेगावतांडा येथे तालुका पोलिसांतर्फे सेंद्रीय शेती कार्यशाळा

**सोलापूर, दि. २७ जुलै -**

सोलापूर तालुका पोलिस ठाण्याच्यावतीने मुळेगाव तांडा (ता. दक्षिण सोलापूर) येथे सेंद्रीय शेती विषयक कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचे संकल्पेनेतुन जिल्हयातील शेतकरी बांधवाकरीता सेंद्रीय शेतीचा विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने रविवारी मुळेगावतांडा येथे विकसित गाव अभियान व ऑपरेशन परिवर्तन अंतर्गत सेंद्रिय शेती या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी सुमारे १५० शेतकरी उपस्थित होते. सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी मुळेगाव तांडा येथील नागरिकांनी अवैध दारू व्यवसायापासुन परावृत्त होऊन रोजगारासाठी सेंद्रीय शेतीकडे वळावे असे आवाहन केले. जळगावचे कृषी तज्ञ प्रकाश पवार, अभय गायकवाड आणि कृषी विद्यार्थी यांनीही मार्गदर्शन केले. सरपंच विजय राठोड यांनी गावक-यांच्या वतीने अवैध व्यवसाया पासुन परावृत्त करण्याचे आश्वासन दिले. पोलिस उपनिरीक्षक महेश घोडके यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. बोरामणी दुरक्षेत्राचे पोलीस उपनिरीक्षक फैयाज बागवान, पोलीस हवालदार राहुल महिंद्रकर व पोलीस नाईक अशिफ शेख व मुळेगाव तांडा येथील सरपंच विजय राठोड यांनी परिश्रम घेतले.

# सर्व आश्वासने पाळली तर यापुढेही विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

## ▸▸आमदार अभिजित पाटील | यंदा १५ ते २० लाख टन गाळप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ जुलै-**

सर्व सभासदांनी विद्यमान संचालकावर विश्वास ठेवून कारखान्याची सूत्रे आमच्याकडे सोपवलेली आहेत. तेव्हापासून ज्या-ज्या वेळी आपणास बोलल्याप्रमाणे दिलेली सर्व आश्वासने पाळलेली असून, यापुढेही आपल्या विश्वातास तडा जाऊ देणार नाही. तसेच येत्या गाळप हंगामात १५ लाख ते २० लाख मेट्रिक टनापर्यंत गाळप करण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न असेल, असे प्रतिपादन श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आमदार अभिजित पाटील यांनी केले.



श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा २०२५-२६ हंगामासाठी मिल रोलरचे पूजन संपन्न झाले. या वेळी कारखान्याच्या व्हाइस चेअरमन प्रेमलता रोगे, संचालक कालिदास साळुंखे, सीताराम गवळी व विठ्ठल रणदिवे यांच्या हस्ते मिल रोलरचे पूजन करण्यात आले. या वेळी कारखान्याचे ज्येष्ठ संचालक दिनकर चव्हाण, सचिन पाटील, तुकाराम मरके, प्रा. महादेव तळेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या वेळी आमदार पाटील म्हणाले, आपण पिकवलेल्या उसाची संपूर्ण नोंद देऊन पुढील हंगामात आपले कारखान्याकडे ऊस गाळपास देऊन सहकार्य करावे. मागील हंगामात गळीतास आलेल्या उसास २८०३ रुपये प्रतिटन याप्रमाणे उसाची बिले, तोडणी व वाहतूकदार यांची कमिशनसह सर्व बिले अदा केली आहेत. तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व मयत कर्मचाऱ्यांचे फायनल पेमेंट ठरल्याप्रमाणे अदा केलेले आहे. कामगारांची उर्वरित थकीत देणी यावर तोडगा काढून टप्प्याटप्प्याने अदा करण्यास संचालक मंडळ कटिबद्ध आहे. तसेच सन २०२५-२६ गळीत हंगामाचे नियोजन पूर्ण केले आहे. ऊस तोडणी वाहतूक ठेकेदारांना पहिला अॅडव्हान्स हप्ता अदा केलेला आहे. दुसरा हप्ता लवकरच देत आहोत. कारखान्याची ऑफ सिझनमधील दुरुस्ती व देखभालीची कामे प्रगतिपथावर असून, गळीत हंगामात कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ नयेत या दृष्टीने सर्व खातेप्रमुखांनी कामकाज करून घ्यावे, कारखाना वेळेवर चालू करण्यासाठी प्रयत्नशील राहावे. सूत्रसंचालन नितीन पवार यांनी केले. या वेळी प्रसंगी कारखान्याचे सर्व संचालक, कार्यकारी संचालक आर. बी. पाटील, जनरल मॅनेजर डी. आर. गायकवाड कारखान्याचे सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग, कार्यकर्ते, सभासद उपस्थित होते.

# गायक मुकेश यांच्या स्मृतींना गाण्यातून उजाळा

## व्यंकटेश संगीत विद्यालयात सामूहिक गायन उपक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ जुलै-**

सोलापूर नामवंत गायक स्वर्गीय मुकेश यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांनीच विविध चित्रपटात गायन केलेल्या गाणी गात सोलापुरातील पंधरा कलाकारांनी त्यांना अभिवादन केले. पंधरा गायकांनी संगीत ट्रॅकवर गायन केले. जीना या मरना यहा ' या गाण्यावर सगळयाच कलाकारांनी एका सुरात बहारदारपणे गायन केले. नंतर ज्योत से ज्योत' या गाण्याने समारोप झाला. विजापूर रोड व्यंकटेश संगीत विदयालयाच्यावतीने गायक मुकेश यांच्या स्मृती दिनानिमित्त मधूर गंध मोहक स्वरांचा' हा कार्यक्रम आयोजित केला होता.



डॉ. संदीप होळकर यांच्या हस्ते शुभारंभ झाला. रेल्वेचे अधिकारी रंजन शर्मा प्रमुख पाहुणे होते. संगीत विद्यालयाचे प्रमुख संदीप कुलकर्णी यांनी आयोजन केले होते. मंगळवारी सायंकाळी पावसाच्या सरी कोसळत होत्या. ॲम्फी थिएटर सभागृहात मात्र गायक मुकेश यांनी गायन केलेल्या सुरांत श्रोते चिंब झाले होते.फुल तुम्ही भेजा है खत मे' (अस्मिता आणि राघव येडगे) यांनी गायन केले.दिल की नजर से (मदन सुनील) यांनी तर अंजली कुर्डूकर व किरण सुतार यांनी मैना भुलूंगा' या गाण्याला रसिक टाळयाचा गजरात दाद दिली. दुनिया बनाने वाले' या गीताला रसिक आनंदले होते. धीरे, धीरे बोल', चंदन सा बदन' ही गाणी सादर होत असताना सुहाना सफर' या गीतामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. ओ मेहबूबा', मेरे दिल के पास'.. मैरा प्यार भी तू है', एक प्यार का नगमा' या गाण्यावर टाळ्यांचा कडकडाट झाला. सावन का महिना... गाण्याने श्रावणाची चाहूल बाहेर पाऊस पडत होता. श्रावण महिना चार दिवसांवर आला आहे अशा आल्हाददायक वातावरणाची चाहूल सावन का महिना'''' या गाण्याने उपस्थितांना देऊन गेला. श्रीकांत सुतार व अरुणा गुजर यांनी गीत गायन केले.चांदसी मेहबूबा, बोल राधा बोल, तोबा ये मतवाली चाल, डम डम डिगा डिगा, क्या खूब लगते हो अशी एकापेक्षा एक सरस गाणी सादर केले. यांनी केले गायन... रवींद अफजूलपूरकर, शैलजा पांढरे, नागोजी, अर्चना माने, मल्हारी पाटील, अस्मिता कुलकर्णी, अरुणा गुजर, अश्विनी कुलकर्णी आदी कलाकारांनी गायन केले. मधुर गंध कार्यक्रमात कलाकारांनी गायक मुकेश यांची गाणी सादर केली.

# आधुनिक वाचन संस्कृतीचा पाया संत साहित्याने घातला : डॉ. मोरे

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २७ जुलै-**

'आधुनिक वाचन संस्कृतीचा पाया खऱ्या अर्थाने संत साहित्याने घातला,' असे प्रतिपादन राज्य साहित्य संकृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी शनिवारी केले.



'पुस्तकांचा मान्सून सेल' या उपक्रमाच्या निमित्त 'वाचन-विचार' या विषयावर डॉ. मोरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. 'अक्षरधारा'चे रमेश राठिवडेकर आणि रसिका राठिवडेकर या वेळी उपस्थित होते. डॉ. मोरे म्हणाले, 'पाचशे वर्षे आपला साहित्य व्यवहार संतांच्या लेखणीवर आधारलेला होता. संतांचे साहित्य घ्यायचे आणि त्याचे निरूपण करण्याची मोठी परंपरा इथे होती. त्यांनी लोकांचे वैचारिक भरणपोषण केले.

संत नामदेवांनी उत्तर भारतात वारकरी संप्रदायाचा विचार पोहोचवला. त्याचप्रमाणे कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून वारकऱ्यांनी संतांच्या विचाराचा प्रचार, प्रसार केला. त्याचा परिणाम देशातील इतर भाषांच्या साहित्यातही दिसून येतो. मराठी भाषेत बाळशास्त्री जांभेकर यांनी ज्ञानेश्वरीची पहिली आवृत्ती छापली आणि तिथून मुद्रण संस्कृतीची मुहूर्तमेढ रोवली गेली.' 'वारकरी संप्रदाय, संप्रदायाच्या बाहेरचे लोक आणि अभ्यासक यांनी तुकोबांच्या अभंगांचा, त्यावर आधारलेल्या साहित्याचा अभ्यास केला. त्याचीही मोठी परंपरा या राज्यात आहे. त्या परंपरेचा मागोवा घेताना संस्कृतीचा इतिहासही वेगळ्या दृष्टिकोनातून पाहता येतो, कारण तुकोबा हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक पुरुषच आहेत,' असे मत डॉ. मोरे यांनी व्यक्त केले.

# बासरीची सुमधूर सुरावट अन् परिपक्व गायनाने रसिक तृप्त

## ▸▸ सांस्कृतिक राजदूत प्रा. श्रीराम पुजारी यांची जन्मशताब्दी वर्षपूर्तीची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका विदुषी कलापिनी कोमकली यांचे भावपूर्ण, परिपक्व गायन आणि प्रवीण गोडखिंडी यांच्या संमोहित करणाऱ्या बासरीवादनाने सोलापुरचे सांस्कृतिक राजदूत प्रा. श्रीराम पुजारी यांच्या जन्मशताब्दी वर्षपूर्तीची सांगता रविवारी झाली.

प्रा. पुजारी यांची जन्म शताब्दी वर्षपूर्ती आणि श्रीराम पुजारी प्रतिष्ठानच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त हिराचंद नेमचंद वाचनालय आणि श्रीराम पुजारी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या सांगीतिक कार्यक्रमाचे किर्लोस्कर सभागृहात आयोजन करण्यात आले होते. प्रवीण गोडखिंडी यांनी आपल्या बासरीवादन मैफलीची सुरुवात राग मारवाने केली. गायकी अंगाने विलंबित एकताल आणि द्रुत तीनताल प्रभावीपणे सादर केला. रागातील बारकावे पेश करत नजाकतीने वादन करून सुरांची आराधना करत रंगत गेलेले वादन रसिकांच्या मनाचा ठाव घेणारे ठरले. याच रागात किराणा घराण्याच्या गायकीची बासरीतून 'बंगरी गयी मोरी' ही बंदिश ऐकविली. त्यानंतर बासरीवर क्वचितच ऐकविला जाणारा राग रामदासी मल्हार अतिशय ताकदीने सादर केला. गोडखिंडी यांनी आपल्या मैफलीची सांगता राग हंसध्वनीमधील मध्यलय, रूपक, झाला, तीनताल सादर करून केली. या सादरीकरणात त्यांनी स्वत:ची निर्मिती असलेल्या 'मंद्र बांसुरी'चे सूरही रसिकांना ऐकविले. यशवंत वैष्णव यांनी समर्पक तबलासाथ केली.



कार्यक्रमाच्या उत्तरार्धात विदुषी कलापिनी कोमकली यांची गायन मैफल रंगली. त्यांनी राग नंदमधील बंदिशीने सुरूवात केली. 'गोविंद बीन बजाये' ही मध्यलयीतील बंदिश सादर करताना पंडित कुमार गंधर्व यांना विदुषी अंजनीबाई मालपेकर यांनी शिकविलेला नंद रागाचा अनोखा विस्तार सादर केला. नंतर द्रुत लयीत 'अजहु आए शाम' ही पारंपरिक रचना प्रभावीपणे सादर करून रसिकांना आनंदित केले. त्यानंतर पंडित कुमार गंधर्व यांनी राग नंदमध्येच रचलेली अनोखी मांडणी असलेली 'अब तो आजा रे' ही बंदिश सादर केली. तेव्हा रसिकांनी त्यास भरभरून दाद दिली. त्यानंतर कलापिनी कोमकली यांनी मिश्र खमाजमधील 'बांके सावरियाँ..' ही ठुमरी सादर करून त्याला जोडून 'राम बिन..' ही रचना ऐकविली. मैफलीत पुढे संत तुकाराम महाराज यांचा 'माझे मज कळो येती अवगुण' हा अभंग आणि 'मुझे रे रघुवीर की सुद आए' हे लोकभजन सादर केले. 'जमुना किनारे मेरो गांव, सावरे सावरे..' या कुमार गंधर्व यांनी संगीतबद्ध केलेली सुप्रसिद्ध रचना सादर केली. मयंक बेडेकर (तबला), अभिषेक शिनकर (संवादिनी) यांनी साथसंगत केली.

पुजारी यांची जन्मशताब्दी माझ्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे, असे सांगून कलापिनी कोमकली म्हणाल्या, रामकाकांना आवडायचे तेच संगीत आज मी ऐकविले आहे. जन्मशताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात माझा हातभार लागणे रामकाकांना आवडेल या भावनेतून मी पुढाकार घेतला. कार्यक्रमाच्या आयोजक ललिता दातार आणि सहकाऱ्यांचे त्यांनी कौतुक केले. कलाकारांचा सत्कार श्रीराम पुजारी प्रतिष्ठानच्या सचिव ललिता दातार, सुयश गुरुकुलचे संस्थापक विश्वस्त केशव शिंदे यांनी केला तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजुषा गाडगीळ यांनी केले.

# १४ हजार पुरुष 'लाडकी बहीण योजने'चे लाभार्थी

## ●छाननीत उघड झाला धक्कादायक प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २७ जुलै-**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तेव्हा एकनाथ शिंदे होते. तेंव्हा ऑगस्ट २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु झाली होती. या योजनेच्या अंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात आले. या योजनेचा लाभ पात्र नसणाऱ्या महिलांनी तर घेतलाच शिवाय १४ हजारांहून अधिक पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतल्याची धक्कादायक बाब या योजनेच्या छाननीतून समोर आली आहे. अपात्र महिलांना या योजनेतून काढून टाकण्यात आले आहे.

१४ हजार २९८ पुरुषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला असून त्यांना दरमहा २ कोटी १४ लाखांहून अधिक रक्कम वाटली गेली. जी रक्कम सध्याच्या घडीला २१ कोटी ४४ लाखांच्या घरात आहे. ऑगस्ट २०२४ पासून छाननी होईपर्यंत हा लाभ पुरुषांना मिळाल्याचे समोर आले आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीतील माहिती तपासल्यावर आणखी धक्कादायक गोष्टी समोर आल्या.




२ लाख ३६ हजार १४ लाभार्थ्यांच्या नावांमध्ये संशय आहे. ते पुरुष असून त्यांनी महिलांच्या नावाने लाभ घेतला असावा, असा संशय आहे. ज्या १४,२९८ पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतला, त्यांना दरमहा मिळणारं १५०० रुपये मानधन आता बंद करण्यात आलं आहे. योजनेत झालेल्या या गैरप्रकारामुळे महिलांच्या योजनेतून पुरुषांनी अर्ज करुन पैसे कसे मिळवले, हे शोधण्यासाठी आता कागदपत्रांची छाननी सुरू करण्यात आली आहे. नियमानुसार ६५ वर्षांवरील व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळत नाही. तरीही, २ लाख ८७ हजार ८०३ वयोवृद्ध महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. या महिलांनांही या योजनेच्या अंतर्गत कोट्यवधी रुपये मिळाल्याचं छाननीत लक्षात आलं आहे. एका कुटुंबातील दोनपेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळत नाही. असे असतानाही, ७ लाख ९७ हजार ७५१ कुटुंबांतील दोनपेक्षा जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. त्यांना १,१९६ कोटी ६२ लाख रुपये मिळाले असल्याचे समोर आलं आहे. एनडीटीव्हीने हे वृत्त दिले आहे. दरम्यान सरकारने २६.३४ लाख लाडक्या बहिणींना अपात्र केले असले तरी पात्र असलेल्या सुमारे २.२५ कोटी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना जून २०२५ महिन्याचा सन्मानानिधी वितरित करण्यात आला आहे, असेही आदिती तटकरे यांनी सांगितले.

**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
SJSB Multi-State Scheduled Coop.Bank
मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com

**जाहीर नोटीस**

आमच्या बँकेच्या शिवाजी नगर बार्शी शाखेकडील पिग्मी एजंट यांनी दिलेला राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. तेंव्हा यापुढे कोणीही त्यांच्याशी बँकेच्या संबंधात कोणताही आर्थिक व्यवहार करू नये, तसेच या दरम्यान कोणताही खासगी व्यवहार केल्यास त्यास बँक जबाबदार असणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | पिग्मी एजंट नाव | शाखा | राजीनामा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. गणेश रामेश्वर कंबीरे | शिवाजी नगर, बार्शी | २५/०६/२०२५ |

सही/-
कनिष्ठ अधिकारी
बचत गट व पिग्मी विभाग

## महत्त्वाचे...

### 'सिंहगड' च्या रुतीका माणिकवारची कनका कंपनीत निवड

**पंढरपूर, दि. २७ जुलै**

कोर्टी (ता.पंढरपूर) येथील एस.के.एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील संगणक विभागातील व तुरोरी, (ता.धाराशीव) येथील रुतीका संजय माणिकवार हिची कनका सॉफ्टवेअर कंपनीमध्ये निवड झाली असून तीला ५ लाखाचे पॅकेज मिळाल्याची माहिती संगणक विभाग प्रमुख डॉ. सुभाष पिंगळे यांनी दिली. रुतीका माणिकवार हिची कॅम्पस मुलाखतीतून निवड झाल्याबद्दल प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उप-प्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. समीर कटेकर, डॉ. चेतन पिसे, डॉ. भालचंद्र गोडबोले, डॉ. श्याम कुलकर्णी, डॉ. श्रीगणेश कदम, डॉ. संपत देशमुख, डॉ. अल्ताफ मुलाणी, डॉ. बाळासाहेब गंधारे, डॉ. अतुल आराध्ये, डॉ. दिपक गानमोटे, डॉ. सोमनाथ कोळी, डॉ. सुभाष पिंगळे, डॉ.अनिल निकम, डॉ. शिवशंकर कोंडुरु, डॉ. यशवंत पवार, डॉ. सत्यवान जगदाळे, प्रा. अभिजित सवासे, प्रा. संदीप लिंगे आदीसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.





### सांगोल्यातील वाघमारे कराटे क्लासचे यश

**सांगोला, दि. २७ जुलै**

शोतोकान स्पोर्ट्स कराटे डेव्हलपमेंट असोसिएशन यांच्या तर्फे रविवार दि.२७ जुलै रोजी विद्यामंदिर इंग्लिश मिडियम स्कूल, सांगोला येथे घेण्यात आलेल्या ब्लॅक बेल्ट परीक्षेमध्ये श्वेताली सावंत, सोनल जवंजाळ, वैष्णवी गेजगे, आरोही सावंत, आरोही पवार, रीशांत बनसोडे, निवांश वाघमारे तर सीनियर ब्लॅक बेल्ट गटामध्ये शुभदा गव्हाणे, रोहित अरवळी, यश कोकरे या वाघमारे कराटे क्लासच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशिक्षक सुनील वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. सदर परीक्षा यशस्वी करण्याकरता निर्जेद्र चौधरी व श्रावणी वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

### घरगुती तक्रारीतून विवाहितेचा विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २७ जुलै**

घरगुती तक्रारीतून विवाहितेने विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सुधाराणी विष्णु कामाटी (वय २२, रा. ताई चौक, स्वागत नगर, सोलापूर सध्या रा. शिरनाथ, ता. चडचण, जि. विजयपूर, कर्नाटक) असे उपचारासाठी दाखल असलेल्या विवाहितेचे नाव आहे. रविवारी सकाळी राहत्या घरी सुधाराणी हिची नवऱ्यासोबत घरगुती तक्रार झाली. त्याचा राग मनात धरून सुधाराणी हिने गोचिड मारण्याचे विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे सुधाराणी हिस त्रास होऊ लागल्याने तिला उपचारासाठी लक्ष्मण अक्कलकोट यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### 'स्वेरीज' च्या राजान्ना अदेलीची 'वेबटेक डेव्हलपर्स' कंपनीत निवड

**सोलापूर, दि. २७ जुलै**

'वेबटेक डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकीत कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या राजन्ना लक्ष्मीनारायण अदेली यांची कॅम्पस म धून निवड करण्यात आल्याची माहिती म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांनी दिली. 'वेबटेक डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड' ही कंपनी सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट क्षेत्रातील एक अग्रगण्य कंपनी आहे. या नामांकित कंपनीच्या समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील राजन्ना लक्ष्मीनारायण अदेली या विद्यार्थ्यांची निवड केली असून त्यांना वार्षिक रु.४.३ लाख इतके पॅकेज मिळाले आहे. संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव प्रा. सूरज रोंगे तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून निवड झालेल्या राजन्ना लक्ष्मीनारायण अदेली यांचे अभिनंदन केले.



### कळमण येथे विवाहितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २७ जुलै**

कळमण (ता. उत्तर सोलापूर) येथे विवाहितेने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. दिपाली दत्ता गालाफाडे (वय २५, रा. कळमण) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. २६ जुलै रोजी रात्री दिपाली गालाफाडे या विवाहितेने राहत्या घरी घरगुती भांडणाच्या कारणावरून उंदीर मारण्याचे विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे दिपाली यांना उपचारासाठी नितीन क्षिरसागर यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### बँक कॉलनीत स्ट्रीटलाईटची मागणी

**सोलापूर, दि. २७ जुलै**

जुळे सोलापूर मधील ज्ञानेश्वरनगर जवळील बँक कॉलनीत शेवटच्या लेनमध्ये स्ट्रीट लाईट नसल्याने अंधाराचे साम्राज्य आहे.या लेनमध्ये अंधारामुळे व बाजूच्या रिकाम्या प्लॉटमध्ये वाढलेल्या झाडाझुडपांमुळे साप निघत आहेत. त्याचा तेथील रहिवाशांना त्रास होत आहे. गेल्या ३० वर्षापासून या लेनमध्ये स्ट्रीटलाईट नाही. महापालिकेच्या पोर्टलवर तक्रारींची नोंदही होत नाही. महत यांच्या घरापर्यंत स्ट्रीटलाईटची सोय करण्याची मागणी होत आहे.

# पाठखळ प्रकरणातील 'त्या' दोघा आरोपींना सोलापूरच्या कारागृहात केले वर्ग

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २७ जुलै**

पाठखळ प्रकरणातील त्या दोघा प्रेमी युगुलांना पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर पुन्हा न्यायालयात उभे केले असताना न्यायालयाने १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. दरम्यान सुरक्षेच्या दृष्टीने दोघा प्रेमीयुगुलांना मंगळवेढा जेलमधून सोलापूर येथील कारागृहात वर्ग करण्यात आले असल्याचे पोलीस सुत्रांकडून सांगण्यात आले.

पाठखळ येथे दि.१४ जुले रोजी यातील प्रेयसी किरण व प्रियकर निशांत या दोघांनी त्यांचे प्रेमप्रकरण उघड होवू नये या कारणास्तव रात्री २.३० वाजता एका वेडसर ६० वर्षीय महिलेस कडव्याच्या गंजीत जाळून मारले होते. या घटनेमध्ये




पोलीसांनी दोघाही आरोपींना अटक करुन न्यायालयात उभे केल्यानंतर दोन वेळा न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली होती. तपासादरम्यान आरोपी निशांत याने प्रेयसी किरण हिस मोटर सायकलवरुन कराडला जाण्यासाठी सांगोला मार्गे बिटा हद्दीत सोडून कराड येथील त्याचा मित्र याला माझ्या आत्याची मुलगी असून तिला कराड येथे घेऊन जा म्हंटल्यानंतर त्याने कराडला घेवून गेल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलीसांनी या दरम्यान गुन्हात वापरलेली मोटर सायकल जप्त केली आहे. सदर वेडसर महिला ही गोपाळपूरची असून पोलीसांनी तिचा व्हिडीओ मिळवून खात्री केली आहे. मयताचे घरी असलेले डोकीचे केस तपासणीसाठी ताब्यात घेतले आहेत. परवा पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर दोन्ही आरोपींना न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सध्या मंगळवेढा कारागृह आरोपीने खचाखच भरले असून सुरक्षेच्या दृष्टीने त्या दोघा आरोपींना सोलापूर येथील कारागृहात ठेवण्याचा निर्णय पोलीस प्रशासनाने घेतल्यामुळे तिकडे पाठविण्यात आले आहे.

# वाहनाने धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू

## अज्ञात वाहन चालका विरुध्द गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २७ जुलै**

मंगळवेढाजवळील सोलापूर बायपास रोडवर मोटर सायकल स्वारास अज्ञात चारचाकी वाहनाने धडक दिल्याने किरण बलभीम देवकुळे (वय ३४ रा.साठेनगर) ते गंभीर जखमी होवून उपचारादरम्यान मयत झाल्याने वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी स्वाती किरण देवकुळे (वय २५ रा.साठेनगर) यांचे मयत पती किरण देवकुळे हे दि.२५ जून रोजी ९ वाजता घरगुती कामानिमित्त एम.एच.१३ ई.जी. ३२७६ वरुन सोलापूर बायपासकडे जात असताना अज्ञात चारचाकी वाहन चालक क्रमांक एम.एच.१३ ए.सी.३८५३ हे वाहन चालवत असताना चालकाने परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन,निष्काळजीपणे,भरधाव वेगाने चालवून पाठीमागून मोटर सायकलस्वारास धडक देवून खाली पाडून जखमी केले. अधिक उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र दि.२८ जून रोजी १०.३० वाजता मयत झाले असून वाहनाचे ५ हजार रुपये नुकसानीस कारणीभूत ठरल्याने सदर अज्ञात चालकाविरुध्द मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून याचा तपास शहर पोलीस करीत आहेत.




श्री.रेवणसिद्धेश्वर पालखी मिरवणूक...

**सोलापूर : शहरातून जगद्गुरु श्री रेवणसिद्धेश्वर महाराजांची पालखी मिरवणूक रविवारी सकाळी काढण्यात आली.**

# पिलीव- सुळेवाडीत आधार केंद्र सुरु करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि २७ जुलै**

माळशिरस तालुक्यातील पिलीव ही मुख्य मोठी बाजारपेठ असुन याठिकाणी आसपासच्या दहा-बारा खेडेगावातील नागरिकांची ये-जा असते.सध्या शासनाच्या सर्व योजना मग तो शेतकरी, सर्व सामान्य नागरिक, महीला, विद्यार्थी यासाठी आधार आवश्यक आहे.

परंतु पिलीव येथे आधार कार्ड केंद्रच बंद असल्यामुळे या भागातील नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. याठिकाणी लहान मुले, विद्यार्थी किंवा सर्व सामान्य नागरिकांना आधार कार्ड काढण्यासाठी माळशिरस, अकलुज, वेळापुर याठिकाणी जावे लागत आहे.

त्याठिकाणी आधार कार्ड नाही निघाले तर हेलपाटे मारावे लागत आहेत यामुळे वेळ तर वाया जातोच शिवाय आर्थीक भुरदंड सोसावा लागत आहे. त्यामुळे पिलीव किंवा सुळेवाडी याठिकाणी नवीन आधार कार्ड सुरु करण्याची तातडतोब परवानगी देण्याची मागणी सुळेवाडी येथील युवा नेते विक्रम सुळे यांनी म ाळशिरसचे तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.




# जुन्नरच्या आमदाराचा करमाळ्यात निषेध

## रामोशी, पारधी समाजाबद्दल केले बेताल वक्तव्य

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२७ जुलै-**

जुन्नरचे आ.शरद सोनवणे यांनी जाहिर कार्यक्रमात रामोशी, पारधी व खालचा समाज चोर आहे. यांचे चोऱ्यांचे प्रमाण जास्त आहे असे बेताल वक्तव्य केल्यामुळे महाराष्ट्रातील समाज बांधवांच्या भावना दुखावल्याने सोनवणे विरूद्ध महाराष्ट्रभर संतापाची लाट आहे. मल्हार क्रांती संघटना करमाळा तालुक्याच्या वतीने पोलीस निरीक्षक व तहसीलदार यांना निवेदन देऊन जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी मल्हार क्रांतीचे तालुका अध्यक्ष धनाजी ढवळे, रासपचे सरचिटणीस अंगद देवकते उपस्थित होते.

यावेळी ढवळे म्हणाले की, आमदार शरद सोनवणे वर नागरी हक्क संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करून तात्काळ राजीनामा घेण्यात यावा.आ.सोनवणे यांनी माफी न मागितल्यास तीव्र आंदोलन करणार असल्याचे ढवळे यांनी सांगितले.पुढे बोलताना रासपचे देवकते म्हणाले की, आम दार हे अठरापगड समाजाचे सेवक असतात, सोनवणे यांनी राजे उम जी नाईक यांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होऊन रामोशी, पारधी समाज बांधवांची जाहीर माफी मागावी.अन्यथा त्यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात येतील. रामोशी सम ाज हा लढाऊ कष्टाळू क्रांतिकारी समाज आहे. ऐवढ्या समाजला चोर म्हणणे निंदनीय आहे. राष्ट्रीय समाज पक्ष रामोशी, पारधी समाजाच्या लढ्यात सहभागी राहणार असल्याचे अंगद देवकते यांनी म्हटले आहे.

यावेळी मल्हार क्रांती संघटनेचे तालुकाध्यक्ष धनाजी ढवळे,रासपचे अंगद देवकते, तालुकाध्यक्ष योगेश वाघमोडे, महेश आरणे, माऊली पिठे, मुन्ना ढवळे, अभिजीत मारकड, चिकलठाणचे बापू खराडे, सोमनाथ खराडे, सोमनाथ पांढरे, जनार्धन पवळ, संदीप मदने, अशोक पवळ, दादा शिंदेसह सम ाज बांधव उपस्थितीत होते.

# बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी बार्शीतील लॉज मालकाला जामीन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२७ जुलै-**

लातूर येथील एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये दि. १६ जुन २५ रोजी माझी मुलगी बेपत्ता झाली आहे, अशी फिर्याद पीडित मुलीच्या आईने दि. १९ मे २५ रोजी दिली होती. दि. १६ जून २५ रोजी पीडित मुलीने एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये तिला आरोपी नं. २ व ३ यांनी लातूर येथून रिक्षात घालून मुरुड, धाराशिव इत्यादी ठिकाणी घेऊन गेले. दि. २४ मे २५ पासून बार्शी येथील एस.टी. स्टँड समोरील लॉजमध्ये आरोपी नं. २ हिने पीडित मुलीला एका रुममध्ये ठेवले व चार दिवसासाठी निघून गेली. दि. २५ मे २५ रोजी लॉज मालकाने दुपारी दोनच्या सुमारास पीडित मुलीवर लैंगिक अत्याचार केला.

दि. २८ मे २५ रोजी आरोपी नं. २ ही लॉजवर परत आल्यानंतर पीडित मुलगी तिच्याबरोबर पिंपरी, चिंचवड, भोसरी इत्यादी ठिकाणी राहिली. दि. १५ जून २५ रोजी संधी साधून पुणे येथून पीडित मुलगी लातूर येथे एस.टी. ने आली. आल्यानंतर तिने लैंगिक अत्याचाराबद्दलची तक्रार पोलिसांकडे आईच्या म दतीने केली. पीडीतेच्या जबाबदावरुन एमआयडीसी पोलिसांनी बार्शीतील लॉज मालकाच्या विरुद्ध गुन्हा दाखल करुन दि. २० जून २५ रोजी लॉज मालकाला अटक करुन लातूर येथे नेण्यात आले. आरोपीच्यावतीने बार्शी येथील विधीज्ञ शिवाजी क्षीरसागर, पवन क्षीरसागर व अक्षय बिडबाग यांनी लातूर येथील विशेष न्यायालयामध्ये आरोपीला जाम ीन मिळावा यासाठी अर्ज दाखल केला.

न्यायालयाने सुनावणीपूर्वी जिल्हा सरकारी वकील, पीडित मुलगी व तपासणी अधिकारी यांचे म्हणणे मागवले. युक्तिवादाच्या वेळी लॉज मालकाच्यावतीने पीडित मुलगी, तिची आई व मामा यांची वेगवेगळ्या केसमध्ये असलेल्या सहभागाची माहिती कागदोपत्री पुराव्यासह कोर्टा समोर सादर करण्यात आली. प्रतिष्ठित लोकांची बदनामी करण्याच्या उद्देशाने व पैसे उकळण्यासाठी सदरील केस दाखल केल्याचे दिसून येते, पीडित मुलीने दि. २५ मे २५ पासून १६ जूनपर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी फिरुनसुद्धा झाल्या प्रकाराची माहिती कुणाला का दिली नाही? असा युक्तिवाद देखील करण्यात आला. बार्शीतील लॉज मालक हा एक प्रतिष्ठित तसेच कुठलीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेला समाजामध्ये चांगली प्रतिमा असलेला व्यक्ती असल्याने जामीनवर सुटका व्हावी असा युक्तिवाद केला. या प्रकरणातील पीडित मुलगी, तिची आई व मामा यांनी गेल्या वर्षीच वेगवेगळ्या केसेस करुन लैंगिक छळाच्या कायद्याचा गैरवापर केला असल्याचा युक्तिवाद विधीज्ञ शिवाजी क्षीरसागर यांनी केला. सदरील करण्यात आलेला युक्तिवाद ऐकून विशेष न्यायालयाने लॉज मालकाला जामीन मंजूर केला आहे.

# शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त सोलापुरात शिवसेनेकडून विविध सामाजिक उपक्रम

**● श्री सिद्धेश्वर महाराजांची महाआरती, गरजूना छत्री वाटप, रूपभवानी मातेचा महाअभिषेक व आरती, लाडू व महाप्रसाद वाटप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, २७ जुलै-**

शिवसेना पक्षप्रमुख आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आदरणीय उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसा निमित्त सोलापुरात शिवसेनेकडून विविध सेवाभावी, धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. या उपक्रमांनी शहरात शिवसेनेचा सेवा, संस्कृती आणि जनतेशी जोडलेपणाचा संदेश प्रभावीपणे पोचवला.कार्यक्रम ाची सुरुवात सोलापूरचे ग्रामदैवत श्री




सिद्धेश्वर महाराज यांच्या मंदिरात सामूहिक महाआरतीने झाली.

राणी लक्ष्मीबाई मंडईत गरजू आणि कामगार वर्गातील नागरिकांसाठी छत्री वाटपाचा उपक्रम शहरप्रमुख मा. महेश धाराशिवकर यांच्या वतीने जिल्हाप्रमुख डॉ प्रा अजय दासरी व जिल्हा संघटिका अमिता जगदाळे यांच्या हस्ते पार पडला. रूपभवानी मातेच्या मंदिरात भव्य म हाअभिषेक, ओटी भरण व महाआरती करण्यात आली. महिला जिल्हा संघटीका अमिता जगदाळे यांच्या हस्ते साडी-चोळी ओटी भरली गेली आणि उपस्थित महिला कार्यकर्त्यांनी भक्तिभावाने आरती केली. या वेळी सोलापूरकरांचे आरोग्य, सुख-समृद्धी व शिवसेनेच्या बळकटीसाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रम ाचा समारोप लाडू आणि महाप्रसाद वाटपाने करण्यात आला. हा उपक्रम विधानसभा प्रमुख श्री शशिकांत बिराजदार यांच्या वतीने राबवण्यात आला. सैकडो नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेत शिवसेनेच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. या सर्व उपक्रमांचे संयोजन शिवसेना सोलापूर जिल्हा आणि महिला आघाडी शहर शाखा यांनी संयुक्तपणे केले होते. याप्रसंगी जिल्हाप्रमुख डॉ. प्रा. अजय दासरी, उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, शहरप्रमुख महेश धाराशिवकर, नाना मोरे,जिल्हासंघटक शरणराज केंगनालकर, जगदीश कलकेरी, संताजी भोळे, अजय खांडेकर, रवी नायक, सुधीर संगेपाग, दत्ता रुपनभैरे, सुरेश शिंदे, जरगीस मुल्ला, बंटी बेलमकर, सुशील उपलप, राजू बिराजदार, पंकज गजाकोश, गणेश होटकर, राम पाचंगे, राम माने, सिद्राम चोपडे, अंबादास वासी, योगेश धनीवाले, नागेश सोलंकर, ज्ञानू जगताप, विष्णु भिसे, विश्वेश्वर गड्डम, राजेश मिनगुले, गिरीश मोरे अमर वायदांडे, रणजीत दिल्लीवाले, अनिल जाधव, दत्ता माने जिल्हा संघटिका अमि ता जगदाळे, विधानसभा समन्वयक मंगल मोरे, उपजिल्हा संघटिका उत्तर भारती म ोनोली, उपजिल्हा संघटिका मध्य ललिता झळके, शहर संघटिका सोनाली भोसले, विधानसभा संघटिका उत्तर विधानसभा संघटिका मध्य डॉ.शोभा थडकर, दिपाली पवार, उपशहर संघटिका नागू कनमुशे, कल्पना शेळवणे आदी उपस्थित होते

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमूर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)